



# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार १४ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





## उत्तराखंडमध्ये मोठी दुर्घटना,
## निर्माणाधीन बोगदा खचला, अनेक कामगार अडकले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** उत्तराखंडमध्ये बांधकाम सुरू असलेला बोगदा खचून मोठी दुर्घटना घडली आहे. राज्यातील चमोलीमध्ये पीपलकोटी परिसरातील मायापूर येथे बांधकाम सुरू असलेल्या टीएसडीसी बोगद्यात आज संध्याकाळी दगडमाती आणि पाणी भरले. त्यामुळे बोगद्यात काम करत असलेले सुमारे २० कामगार अडकले. दुर्घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, पोलीस, एसडीआरएफ, सीआयएसएफसह संबंधित एजन्सींनी मदत आणि बचाव कार्य सुरू केलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत आत अडकलेल्या १६ कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आलं आहे. तर उर्वरित कामगारांना बाहेर काढण्यासाठी काम सुरू आहे. या घटनेची माहिती मिळताच लष्कर, आयटीबीपी, एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथके घटनास्थळाकडे रवाना झाली आहेत. मदत आणि बचाव कार्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा वापर केला जात आहे. जिल्हा प्रशासनाकडून (पान २ वर)



## स्वातंत्र्यदिनी दहशतवादी हल्ल्याचा इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** येत्या १५ ऑगस्ट रोजी संपूर्ण देश ८० वा स्वातंर्त्यदिन साजरा करण्याच्या तयारीत असतानाच सुरक्षा यंत्रणांनी दहशतवादी हल्ल्याचा इशारा दिला आहे. येत्या दोन-तीन दिवसांत दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न होउ शकतो, अशी शक्यता गुप्तचर यंत्रणांनी वर्तवली आहे. या इशा-यानंतर सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या असून कश्मीरपासून दिल्लीपर्यंत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार आयएसआय आणि खलिस्तान समर्थक घटकांशी संबंधित पाकिस्तानस्थित एक नेटवर्क दिल्ली-एनसीआरमधील साथीदारांना आयईडी पोहोचवण्याचा प्रयत्न करू शकते. यामुळे सुरक्षा यंत्रणांनी दिल्ली-एनसीआरमध्ये सुरक्षा उपाययोजना अधिक कडक केल्या आहेत. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनुसार फरहतुल्ला घोरी याचे नावही समोर आले आहे. घोरी हा पाकिस्तानात वास्तव्यास असून भारतातील मोस्ट वान्टेड दहशतवादी मानला जातो. २००२ मध्ये गुजरातमधील अक्षरधाम मंदिरावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहभागी असल्याचा घोरीवर आरोप आहे. सुरक्षा यंत्रणा ब-याच काळापासून त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. दहशतवादी (पान २ वर)



## 200 कोटीच्या जमीन घोटाळ्यात खरे सुत्रधार पडद्यामागेच!

# कनिष्ठ नायब तहसीलदार निलंबित

**प्रदीप देशपांडे**

**अमरावती ता.१३ :** सुमारे २०० कोटी रुपये बाजारमूल्याच्या जमीन घोटाळ्यात महसूल खात्यातील बड्या धेंडांना सफाईने बाजूला सारीत आज सर्वात कनिष्ट नायब तहसीलदार(महसूल) टीना चव्हाण यांना निलंबित करण्यात आले आहे. स्वतःच्या अधिकारात नसताना तहसिलदाराचे अधिकार वापरून श्रीमती चव्हाण यांनी या जमिनीबाबतचे आदेश पारित केले.त्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करून याकाळात त्यांना निलंबित करण्यात येत असल्याचे या आदेशात म्हंटले आहे.

**तहसीलदारांनी हात झटकले म्हणतात, माझा काहीही संबंध नाही**

निलंबन काळात चव्हाण यांचे मुख्यालय अमरावतीच राहील व जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही, असेही आदेशात बजावले आहे.

हे आदेश निघाल्याचे कळल्यानंतर श्रीमती चव्हाण ढसाढसा रडल्या आणि सध्या आपण काहीच बोलत नाही. मात्र, हे प्रकरण नेमके काय आहे, कोणाच्या दबावातून आपण ते हाताळले, इतक्या तातडीने आदेश कसे काय पारित केले, याबद्दल सविस्तर खुलासा लवकरच करू, असे श्रीमती चव्हाण सदर प्रतिनिधी जवळ म्हणाल्या.




दरम्यान,अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे यांनी आजच्या 'जनमाध्यम' मधील वृत्तात त्यांचे नाव आल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करून 'तो मी नव्हेच' अशी भूमिका घेतली. गेली २ वर्षे या प्रकरणी तहासिलमध्ये खलबते सुरू होती,२०२४ च्या अखेरीस काही आदेश झाल्यावर थंड पडून असणाऱ्या या प्रकरणाला अचानक ३०.०३.२६ रोजी त्वरेने आदेश, दुसऱ्याच दिवशी त्याच्या प्रती देणे अन ०२.०४.२६ रोजी त्या जागेची विक्री, त्या नोंदणीसाठी रजिस्ट्रारला लेखी पत्र इत्यादी घडामोडी होत असताना तहसीलदार विजय लोखंडे यांना अजिबात खबरबात नव्हती, यावर कोणीच विश्वास ठेवण्यास तयार नाही. लोखंडे यांनी मात्र आपला काहीच संबंध नाही. सर्व आदेश नायब तहसिलदाराने दिल्याचे सांगून त्या विविध आदेशाच्या प्रतीच दिल्या. निवासी उपजिल्हाधिकारी काकडे यांनी हे प्रकरण जनमाध्यम ने उघड केल्याचे मान्य करत गेल्या १५ दिवसापासून आम्ही ते हाताळत आहोत, श्रीमती चव्हाण यांच्या निलंबनाचा प्रस्तावही पाठवला आहे, आपणही अमरावती तहसीलदार होतो व त्यामुळे आपल्याला तेथील 'कारभार' चांगला ठाऊक आहे, असे सांगितले. श्रीमती चव्हाण यांच्या निलंबनाचा आदेश आज ३.४४ वाजताच आल्याचे सांगून त्यांनी तो उपलब्ध करून दिला.

**श्रीमती टीना चव्हाण यांच्या निलंबन आदेशात हे जमीन प्रकरण कसे व किती बेकायदेशीर आहे ते स्पष्टपणे नमूद आहे. असे असतानाही व पूर्वीचे सर्व बेकायदेशीर आदेश रद्दबादल ठरविले असतानाही हा संपूर्ण व्यवहार रद्द का करण्यात आला नाही, याबाबत अनेक तर्कवितर्क व्यक्त होत आहेत.**

**महसूल खात्याला हाताशी धरून मौल्यवान जमिनीचे असें घोटाळे करायचे आणि दिवाणी दावे लावून ते वर्षानुवर्षे चालवायचे, असा धंदाच भू माफियांनी चालविला आहे. कोर्टात अनेक वर्षे खेटे घालून थकल्यावर आपोआप तडजोडीवर येऊन कमी रक्कमेत त्या जमिनी हडपायच्या असा त्यांचा धंदा आहे.**

**केवळ दिवाणी दावा करून हे भू माफिया वठणीवर येणार नाहीत. दिवाणी दावे वर्षोगणती चालतात व त्यातून भ्रष्ट महसूल अधिकारी आणि भूमाफियांचेच फावते.त्यामुळे या प्रकरणात फौजदारी तक्रार पोलिसात दाखल होणे आवश्यक आहे.**

**या जमीन घोटाळ्याबाबत रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ने राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार केल्याने तात्काळ सूत्रे हलली.त्वरेने विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, एसडीओ,तहसीलदार सर्वांना धावपळ करीत आम्ही दुरुस्त फेरफार नोंदवतो म्हणून विनवण्या करणे भाग पडले. यामध्ये एक तलाठी चव्हाण सुद्धा निलंबित झाला. दुसरा निलंबनाच्या वाटेवर आहे. वरिष्ठ मात्र सफाईने सुटले आहेत.**

## सर्वोच्च न्यायालय म्हणाले पॅकेज्ड फूडवर वॉर्निंग लेबल लावा:

**नवी दिल्ली**-सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी पॅकेज्ड फूड उत्पादनांच्या वार्निंग लेबलवर केंद्र सरकार आणि अन्न सुरक्षा प्राधिकरण यांना अंतिम इशारा दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, नमकीन, बिस्किट आणि चिप्सच्या पाकिटांवर जास्त साखर-मीठ आणि फॅटची चेतावणी देणारे वार्निंग लेबल लावण्याबाबत सरकार निर्णय घेउ शकत नसेल, तर आम्ही आदेश जारी करू. यापूर्वीही तुम्हाला कठोर पोषणविषयक वार्निंगबाबत निर्देश दिले होते, (पान २ वर)




## संसदेचे कामकाज संस्थगित

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी लोकसभेचे कामकाज केवळ एक मिनिट चालले. सभापती ओम बिरला यांनी वंदे मातरम् गाण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर कामकाज अनिश्‍चित काळासाठी तहकूब केले. पीएम मोदी-शाह, संपूर्ण मंत्रिमंडळ आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकसभेत उपस्थित होते. दुसरीकडे आज संसद परिसरात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांनी आंदोलन केले.



संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलै रोजी सुरू झाले होते. सुरुवातीपासूनच संसदेचे पावसाळी अधिवेशन वादळी ठरले. अधिवेशन सुरू झाल्यापासून जंतरमंतर येथील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेली पोलिस कारवाई आणि राम मंदिरातील लुटीवरून विरोधी पक्षांनी हल्लाबोल केला. अधिवेशनाच्या अखेरपर्यंत विरोधकांनी विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा मुद्दा लावून धरत लाठीहल्ल्याचा आदेश नेमका कुणी दिला, याचे उत्तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात द्यावे, अशी मागणी केली. यावरून संसदेत आणि संसदेबाहेर सत्ताधारी आणि विरोधकांत संघर्ष पाहायला मिळाला. अखेरच्या दिवशी तरी गृहमंत्री उत्तर देतील, अशी अपेक्षा होती. परंतु अखेरच्या दिवशी आज लोकसभेचे कामकाज केवळ १ मिनिट चालले. त्यानंतर कामकाज संस्थगित करण्यात आले. त्यामुळे विरोधक आक्रमक झाले.

लोकसभेत सकाळी कामकाजाची सुरुवात गदारोळात झाली. परंतु नंतर वंदे मातरमच्या घोषणेने काही काळासाठी शांतता प्रस्थापित झाली. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांचेही आज आगमन झाले. तथापि, त्यानंतर सभागृहाचे कामकाज अनिश्‍चित काळासाठी तहकूब करण्यात आले. दरम्यान, झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या विरोधात एनडीएच्या खासदारांनी आंदोलन केले. राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी उत्तराखंडमधील हल्द्वानीत त्यांच्या कार्यक्रमानंतर झालेल्या शुद्धीकरणाचा मुद्दा उपस्थित केला. सभागृहात एमएमडीआर दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. यानंतर कामकाज अनिश्‍चित काळासाठी तहकूब करण्यात आले.

**लोकसभेत ११४ पैकी ९६ तास कामकाज नाही-** लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात १९ बैठका झाल्या. सभागृहाचे कामकाज साधारणपणे सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत (पान २ वर)

## सुखबीरसिंग बादल यांच्यावर नांदेडात तलवारीने हल्ला

**नांदेड :** पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंह बादल यांच्यावर गुरुवारी नांदेड येथील प्रसिद्ध सचखंड गुरुद्वारा परिसरात एका अज्ञात इसमाने तलवारीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या अचानक झालेल्या हल्ल्यात बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली असून, त्यांना तातडीने उपचारासाठी शहरातील यशोसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे गुरु द्वारा परिसर आणि संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुखबीरसिंह बादल हे आपली पत्नी तथा खासदार हरसिमरत कौर बादल यांच्यासह बुधवारी (पान २ वर)




## सुगौली कराराची मूळ कागदपत्रे गायब?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह सरकारच्या काळात भारत-नेपाळ संबंधांना नवे वळण मिळाले आहे. लिपुलेख, कालापानी आणि लिम्पियाधुरा हे भारताचे भाग आपले असल्याचा दावा नेपाळ करत होता. मात्र, ज्या १८१६ च्या ऐतिहासिक 'सुगौली करारा'च्या आधारे तो हा दावा करत होता, त्या कराराचे मूळ अधिकृत दस्तऐवज स्वत? नेपाळ सरकारकडे उपलब्ध आहेत की नाही, यासंदर्भात शंका निर्माण झाली आहे. नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी नेपाळच्या संसदेत यासंदर्भात माहिती दिली. ते म्हणाले, (पान २ वर)






जाहिरात संकलन :-हरीश पुरोहित, तालुका प्रतिनिधी. दादी माँ ॲड, अचलपूर.



# अपयश अंतिम नसते, जिद्द अन् वेळेचे नियोजनच यशाची गुरुकिल्ली!

## -अमरावती जिप CEO सत्यम गांधी यांनी उलगडला संघर्षमय जीवनप्रवास

**अमरावती/प्रतिनिधीः-**

जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या 'Meet the Press' कार्यक्रमात जिल्हा परिषद CEO सत्यम गांधी यांचा जीवनप्रवास, प्रशासनाविषयीची भूमिका आणि अमरावतीच्या विकासाचे व्हिजन उलगडले.

प्रतिकूल परिस्थिती, आर्थिक अडचणी, आईच्या उपचारासाठी झालेले मोठे कर्ज, स्पर्धा परीक्षांतील अपयश आणि आरोग्याच्या अडचणी या सर्वांवर मात करत UPSC परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर दहावा क्रमांक मिळवून IAS अधिकारी होण्यापर्यंतचा प्रवास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (IAS) यांनी आज उलगडला. त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाने उपस्थित पत्रकारांशी झालेल्या 'Meet the Press' या विशेष संवादाला भावनिक तसेच प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले.

जिल्हा मराठी पत्रकार संघ, अमरावती यांच्या वतीने जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या या विशेष संवाद कार्यक्रमात सत्यम गांधी यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष अनिल अग्रवाल, समन्वयक प्रा.डॉ.लोभस घडेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन गांधी यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी उपस्थित पत्रकारांशी विविध विषयांवर मनमोकळा संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी केले. आपल्या बालपणाची आठवण सांगताना सत्यम गांधी म्हणाले की, घरची परिस्थिती बेताची होती. मात्र, आजोबांची इच्छा होती की घरातील कुणीतरी IAS व्हावे. पाचवीपासूनच आजोबांनी दररोज सकाळी वर्तमानपत्र वाचण्याची सवय लावली. 'एक प्याला दूध आणि पेपर' ही आजोबांनी लावलेली सवय आणि त्यांचे संस्कार आयुष्यभर सोबत राहिले, असे त्यांनी सांगितले.नवोदय विद्यालयाची परीक्षा आपण नापास झालो होतो, असे सांगत त्यांनी अपयश हे अंतिम नसते, तर त्यातून पुढील संधी शोधण्याची गरज असते, हा संदेशही दिला.

बारावीनंतर स्पर्धा परीक्षांकडे वळण्याचे निश्चित केले होते. NDA ची परीक्षा उत्तीर्ण



झाल्यानंतर तब्बल ११ दिवस वैद्यकीय चाचणी झाली; मात्र त्यामध्ये कलर ब्लाइंडनेस असल्याचे निदान झाले आणि तेथेही अपयश आले. मात्र या अपयशाने निराश न होता, 'आपल्यासाठी अजून एखादी संधी वाट पाहत आहे,' असा सकारात्मक विचार केला आणि UPSC ची तयारी सुरू केली, असे गांधी यांनी सांगितले. दिल्ली येथे जाऊन त्यांनी UPSC ची तयारी केली. 'टेस्ट मॅच नाही, तर T-२० खेळायची' या निर्धाराने तयारीला सुरुवात केली. कोणतेही काम करताना शंभर टक्के प्रयत्न केले पाहिजेत आणि आपण आपल्या क्षमतेत कमी पडता कामा नये, या विचाराने तयारी केल्याचे त्यांनी सांगितले.UPSC परीक्षेच्या तयारीदरम्यान तीन वेळा कोविडची लागण झाली. मात्र प्रत्येक वेळी पुन्हा उभे राहत तयारी सुरू ठेवली. मुलाखतीपूर्वीही कोविड झाला; तरीही मुलाखत दिली. अवघ्या १५ मिनिटांत मुलाखत संपली. 'मुलाखत चांगली झाली म्हणून लवकर संपली की खराब झाली म्हणून?' असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो; मात्र आपले यश निश्चित आहे, असा आत्मविश्वास त्यावेळी होता, असे गांधी यांनी सांगितले. आणि त्यानंतर UPSC मध्ये अखिल भारतीय स्तरावर दहावा क्रमांक मिळाला. डहाणू येथे प्रकल्प अधिकारी म्हणून पहिली नियुक्ती, त्यानंतर सांगली महानगरपालिकेचे आयुक्त आणि आता अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असा आपला प्रशासकीय प्रवास असल्याचे त्यांनी सांगितले.आपल्या आयुष्यातील अत्यंत भावनिक प्रसंग सांगताना गांधी म्हणाले की, त्यांच्या आईला गंभीर आजार झाला होता. आई वाचण्याची शक्यता कमी असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. मात्र कुटुंबाने उपचार सुरू ठेवले. उपचारासाठी मोठे कर्ज झाले. त्या वेळी ते दहावीत होते. कुटुंबाकडे जमीनही नव्हती. खाजगी सावकारांकडून कर्ज घेऊन आईचे उपचार सुरू होते.

एका पत्रकाराने 'गांधी आडनावाचा तुम्हाला फायदा होतो की तोटा?' असा प्रश्न विचारला. यावर मिश्कीलपणे प्रतिक्रिया देत त्यांनी सांगितले की, UPSC मुलाखतीतही याच विषयावर प्रश्न विचारण्यात आला होता; मात्र त्याचे स्वरूप वेगळे होते. 'या नावाची गरिमा कायम ठेवण्याचा मी नेहमी प्रयत्न करतो आणि भविष्यातही करत राहीन,' असे त्यांनी सांगितले.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या ४ गोवंशांना जीवदान, २ आरोपी अटकेत

## परतवाडा पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**

जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अवैध धंदे आणि गोवंश तस्करीवर कडक कारवाई सुरू आहे. याच मोहिम अंतर्गत परतवाडा पोलिसांनी कत्तलीसाठी नेण्यात येत असलेल्या ४ गोवंशांना जीवदान देत २ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून ५४ हजार रुपये किंमतीचे गोवंश जप्त करण्यात आले आहे.



मोहन सुखलाल कोगे (वय ३०) आणि पतीराम बाळू अखंडे (वय ४५ दोघेही रा. बोथीया, ता. भैंसदेही, जि. बैतुल, मध्यप्रदेश) अटक आरोपींची नावे आहे. माहितीनुसार १२ ऑगस्ट रोजी रात्री १ वाजताच्या सुमारास स.पो.नि. सलीम शेख आणि त्यांचे पथक परतवाडा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत होते.

यावेळी त्यांना माहिती मिळाली की, अंजनगांव रोडने दोन इसम गोवंश कत्तलीसाठी घेऊन परतवाड्याकडे येत आहेत.

माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचासमक्ष अंजनगांव स्टॉप येथे नाकाबंदी करून आरोपी मोहन सुखलाल कोगे (वय ३०) आणि पतीराम बाळू अखंडे( वय ४५, दोघेही रा. बोथीया, ता. भैंसदेही, जि. बैतुल, मध्यप्रदेश ) यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्या जवळील गोवंशा बाबत विचारणा केली असता, ते विक्रीसाठी कत्तलीच्या उद्देशाने घेऊन जात असल्याचे कबूल केले. तसेच ४ बैलांच्या मालकीबाबत कोणतेही कागदपत्र सादर न केल्याने पोलिसांनी ५४ हजार रुपये किंमतीचे ४ बैल ताब्यात घेतले.या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.हवा. सुधीर राऊत करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर अधीक्षक दत्ता तोडेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी धारणी अति. कार्यभार अचलपूर माधवराव गरुड, पोलीस निरीक्षक अशोक लांडे आणि पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक सलीम शेख, सचिन होले, सुधीर राऊत, शुभम शर्मा, चंदू वानखडे ,सचिन कोकणे, घनश्याम किरोले, जितेश बांबील यांनी केली.

## १ व १० वरिल उर्वरित

### उत्तराखंडमध्ये मोठी दुर्घटना,

परिस्थितीवर सातत्याने नजर ठेवली जात आहे. तसेच बोगद्यात अडकलेल्या लोकांपर्यंत सुरक्षितरीत्या पोहोचण्यासाठी आणि त्यांना लवकरात लवकर बाहेर काढण्याला प्राधान्य दिले जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी घेतली माहिती, दिले असे आदेश

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी चमोलीमधील पीपलकोटी येथील टीएचडीसी बोगद्यात चिखलमातीचा ढिग आणि पाणी भरल्याच्या घटनेबाबत चिंता व्यक्तकेली आहे. तसेच मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर चालवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच दुर्घटनेचं गांभीर्य लक्षात घेउन मुख्यमंत्र्यांनी एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या पथकांना तत्काळ घटनास्थळी रवाना केले आहे. त्याबरोबरच जिल्हा प्रशासन आणि सर्व संबंधित विभागांना परस्परांमध्ये समन्वय ठेवण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### स्वातंत्र्यदिनी दहशतवादी हल्ल्याचा

हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, दिल्लीत स्वातंर्त्यदिन सोहळ्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांसोबत लाल किल्ल्यावर निमलष्करी दल, एनएसजी हिट टीम्स आणि प्रशिक्षित स्नायपर्स तैनात केले जातील. याशिवाय एनडीआरएफची पथकेही सज्ज करण्यात येणार आहेत. लाल किल्ला आणि आसपासच्या परिसरात ५००० हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात केले जात आहेत. लाल किल्ला आणि आजूबाजूच्या परिसरावर २००० हून अधिक सीसीटीव्ही कॅमे-यांद्वारे निगराणी ठेवली जात आहे. एफआरएस आणि एएनपीआर कॅमे-यांचाही वापर केला जात आहे. सुरक्षा यंत्रणा दिल्ली, जम्मू आणि कश्मीर तसेच इतर संवेदनशील भागांमधील माहितीचा सतत आढावा घेत आहेत.

### सर्वोच्च न्यायालय म्हणाले

मग टाळाटाळ का? आम्ही जे सांगितले आहे, ते तुम्हाला करायला हवे, तुमच्यावर कार्पोरेट घराण्यांचा दबाव आहे का? सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, आम्ही जनतेच्या हितासाठी काम करत आहोत, स्वतःसाठी नाही. तुम्ही आतापर्यंत काय केले? ६ महिन्यांपूर्वीही सर्वोच्च न्यायालयाने सरकार आणि FSSAI ला पॅकेज्ड फूडवर वार्निंग लेबल लावण्यावर विचार करण्यास सांगितले होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने म्हटले- हे प्रकरण नागरिक आणि विशेषतङ्ग वाढत्या मुलांच्या आरोग्याशी संबंधित आहे. त्यामुळे यावर कोणताही निर्णय कार्पोरेट कंपन्यांच्या दबावाखाली येउन घेउ नये.

### संसदेचे कामकाज संस्थगित

चालते. दुपारी १ ते २ या वेळेत जेवणाची सुटी असते. याचा अर्थ दिवसाला अंदाजे ६ तासांचे कामकाज चालते. यानुसार १९ बैठकांमध्ये अंदाजे ११४ तासांचे कामकाज होणे अपेक्षित होते. परंतु केवळ सुमारे १७ तास आणि ३० मिनिटांचेच कामकाज झाले. याचा अर्थ अंदाजे ९६ तास आणि ३० मिनिटे कामकाज कमी झाले.

**सत्ताधारी-विरोधक यांच्यात संघर्ष सुरूच-** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एनडीए आणि विरोधी पक्षांच्या खासदारांमधील संघर्ष सुरूच होता. गुरु वारी दोन्ही बाजूंचे खासदार एकमेकांशी भिडले, ज्यामुळे जोरदार घोषणाबाजी झाली. सुरक्षा रक्षक ढालीप्रमाणे मध्ये उभे होते.

**गृहमंत्री लपून बसले : वेणुगोपाल**

काँग्रेस खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी अमित शाह यांच्यावर निशाणा साधला. ते लोकसभा अध्यक्षांना प्रेमपत्र का लिहित आहेत? ते सभागृहात येउन सदस्यांना आपली मते का समजावून सांगत नाहीत? ते या सगळ्याला का घाबरत आहेत? गृहमंत्री सभागृहात येउन म्हणाले पाहिजेत, मला चर्चा करायची आहे, मी उत्तर द्यायला तयार आहे. पण त्याऐवजी ते पूर्णपणे लपून बसले आहेत.

हे मी पहिल्यांदाच पाहतेय : प्रियंका गांधी

एनडीए खासदारांच्या आंदोलनाचा संदर्भ देत काँग्रेस खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या, असे दृश्य आम्ही पहिल्यांदाच पाहतोय. टीएमसी खासदार महुआ मोईत्रा म्हणाल्या की, १२ वर्षे सत्तेत असलेले सरकार आता गायब झाले. मी इतका निरु पयोगी संसदीय कामकाज मंत्री कधीच पाहिला नाही.

### सुखबीरसिंग बादल यांच्यावर नांदेडात

धार्मिक दर्शनासाठी नांदेडमध्ये दाखल झाले होते. गुरु वारी सकाळी गुरु द्वारा परिसरात दर्शन घेत असताना निहंग पोशाखात आलेल्या एका इसमाने त्यांच्यावर शस्त्राने (तलवारीने) अचानक वार केला. सुरक्षा रक्षक आणि उपस्थितांनी तत्परता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला; मात्र यात बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली.

**पोलिस बंदोबस्तात वाढ, एकाला ठोकल्या मुसक्या**

घटनेची माहिती मिळताच नांदेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. हल्ला करणा-या संशयित आरोपीला पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले आहे. हल्ल्याचे नेमके कारण काय? आरोपीचा बादल यांच्याशी काही जुना विवाद होता का? अथवा यामागे काही राजकीय/धार्मिक षड्यंत्र आहे का, याचा कसून तपास पोलिस करत आहेत.

**परिस्थिती नियंत्रणात-** घटनेच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून सचखंड गुरु द्वारा परिसर आणि यशोसाई हॉस्पिटलच्या बाहेर कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सध्या परिसरातील वातावरण शांत मात्र तणावपूर्ण असून नागरिकांनी आणि भाविकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, यशोसाई हॉस्पिटलमध्ये सुखबीरसिंह बादल यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांच्या प्रकृतीबाबत लवकरच रु ग्णालयाकडून अधिकृत वैद्यकीय बुलेटिन जारी केले जाण्याची शक्यता आहे.

### सुगौली कराराची मूळ

'कराराची मूळ कागदपत्रे सरकारकडे आहेत की नाही, हे सरकार निश्चितपणे सांगू शकत नाही.' 'द काठमांडू पोस्ट'ने दिलेल्या वृत्तानुसार, खनाल संसदेत म्हणाले की, 'नेपाळ सरकारकडे अधिकृत कराराची कागदपत्रे आहेत की नाही, यासंदर्भात कोणतीही स्पष्ट माहिती नाही. काही करारांशी संबंधित कागदपत्रे राष्ट्रीय अभिलेखागारात ठेवल्याचे पुरावे आहेत. मात्र, ते खरोखरच अधिकृत करार आहेत की नाही, यासंदर्भात आपल्याकडे कुठलीही स्पष्ट माहिती नाही.' ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि नेपाळ यांच्यात १८१६ साली झालेल्या या सुगौली करारानुसार, हा सीमावाद मुख्यत्वे काली अथवा महाकाली नदीच्या उगमावर अवलंबून आहे, कारण करारानुसार ही नदी नेपाळची पश्चिम सीमा मानण्यात आली होती.

**के. पी. शर्मा ओली यांच्या कार्यकाळात समोर आला वाद -**

के. पी. शर्मा ओली यांच्या कार्यकाळात हा सीमावाद राष्ट्रीय मुद्द्याच्या स्वरुपात समोर आला. नुकताच भारत आणि चीनदरम्यान लिपुलेख खिंडीतून व्यापार पुन्हा सुरू करण्यासंदर्भात करार झाल्यानंतर, नेपाळने याला विरोध दर्शवला होता. महत्वाचे म्हणजे, आता मूळ कराराचे कागदपत्रेच गहाळ असल्याने, या वादाला एक वेगळे वळण मिळाले आहे.

### तळेगाव-चांदूर रेल्वे मार्गावर

कोणतीही दुखापत झाली नसून ते पूर्णपणे सुरक्षित आहे.

घटनेची माहिती मिळताच चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे PSI नंदलाल लिंगोट यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पुढील तपास तळेगाव दशासर पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.

### डोमा आदिवासी आश्रम शाळेत

माहितीनुसार सात ते आठ दिवसापूर्वी डोमा आदिवासी आश्रमशाला मधील १५ ते १६ विद्यार्थ्यांचा व्यवहार अचानक बदलला ते जोर जोराने हसू आणि रडू लागले. काही विद्यार्थ्यांनी दावा केला की त्यांना रात्री घुंगरू वाजण्याचा आवाज ऐकायला आला. यामुळे आश्रमशाळा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. अधीक्षका उज्वला इंगळे यांनी प्रकरणाचे गांभीर्य पाहून प्रधानाचार्य यांना माहिती दिली. याबद्दल माहिती गावात पसरल्यानंतर भूत असल्याचे अफवेने जोर धरला आणि शेकडो विद्यार्थी आपल्या घरी पोहोचले. आश्रमशाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक विद्यार्थी एकतलाई गावातील आहे.

**अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पथकाने केली पाहणी-**डोमा येथील आश्रमशाळेत काही विद्यार्थिनींना त्रास जाणवल्यानंतर शाळेत भूत असल्याची अफवा पसरली. या भीतीपोटी शाळेतील ३०० हून अधिक विद्यार्थी शाळा सोडून आपापल्या घरी निघून गेले. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्यकारिणी सदस्या नंदिनी जाधव , रामभाऊ डोंगरे आणि प्रवीण देशमुख यांनी मेळघाटातील दुर्गम भागात जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली.

अंनिसच्या कार्यकर्त्यांनी डोमा, पाच डोंगरी, खडीमल, चुनकडी यांसारख्या विविध गावांमध्ये जाऊन पालकांशी आणि शिक्षण सोडलेल्या विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला. पावसाळी वातावरण आणि रस्त्यांची दुरवस्था असतानाही अंनिसचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन मुलांचे व पालकांचे समुपदेशन करत आहेत.

**अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन-** शाळेत भूतासारखी कोणतीही अलौकिक शक्ती किंवा प्रकार घडलेला नाही. मुलांच्या मनामध्ये भीती बसल्याने ही अफवा पसरली आहे. आम्ही अंनिसचे कार्यकर्ते स्वतः त्या आश्रमशाळेत रात्री राहिलेले आहोत, असे स्पष्ट करत अंनिसच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या नंदिनी जाधव यांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. मुलींचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी त्यांनी पालकांना आणि विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत परतण्याचे आवाहन केले असून, समुपदेशनानंतर अनेक विद्यार्थिनी पुन्हा शाळेत जाण्यास तयार झाल्या आहेत.

### मुथूट फिनकॉर्प अपहार प्रकरणात

नसल्याच्या तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या. तसेच काही ग्राहकांकडून मुद्दल अथवा व्याजाच्या नावाखाली रक्कम घेतल्यानंतर त्याची नोंद कंपनीच्या सिस्टीममध्ये नसल्याचेही तपासात समोर आले. सुरुवातीला १३, त्यानंतर १७ आणि पुढे तक्रारींची संख्या वाढत जाऊन आतापर्यंत सुमारे ६० ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत.

या तक्रारींच्या तपासातून तब्बल २ किलो ८५० ग्रॅम सोने तारण ठेवण्यात आल्याचे समोर आले असून, त्याची अंदाजे किंमत ४ कोटी ८ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. याशिवाय काही ग्राहकांकडून मुद्दल किंवा व्याजाच्या नावाखाली ५१ लाख ३३ हजार रुपयांची रोख रक्कम घेतल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण व्यवहारात प्रत्यक्षात किती रुपयांचा अपहार झाला, याचा हिशेब पोलिसांकडून लावला जात आहे. या प्रकरणात शाखेचा तत्कालीन व्यवस्थापक शुभम वासेवाय याच्यासह सुरज अनिल खेरकर आणि धिरज पंचमराव सिरसाट हे संशयित आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत. त्यांच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी शहरातील दोन सराफ व्यावसायिकांकडे तपास करून ९० ग्रॅम सोने जप्त केले आहे. या सोन्याच्या व्यवहारासंबंधीच्या अधिकृत पावत्याही पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. जप्त सोन्याचा आरोपींशी नेमका संबंध काय, त्याचा व्यवहार कसा झाला आणि त्यातून मिळालेली रक्कम कुठे वळविण्यात आली, याचा तपास सुरू आहे.

दरम्यान, तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींकडून विविध बँकांचे ३० एटीएम कार्ड, ४४८ अनधिकृत पावत्या आणि दोन कार जप्त केल्या आहेत. मुख्य संशयित शुभम वासेवाय याची विविध बँकांमध्ये सहा खाती असल्याचेही तपासात निष्पन्न झाले असून, या खात्यांमधील आर्थिक व्यवहारांची माहिती पोलिसांकडून तपासली जात आहे. गुन्ह्याच्या पुढील तपासात पोलिसांनी घटनास्थळी जाऊन शाखेतील संगणक प्रणालीचे निरीक्षण करून पंचनामा केला असून, सिस्टीममधील व्यवहार, नोंदी आणि उपलब्ध डिजिटल पुरावे गोळा करण्यात आले आहेत. आतापर्यंतच्या तपासातून मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे गुन्ह्यात एमपीआयडी कायद्याचे कलम ३ वाढविण्यात आले आहे. आरोपींच्या सात दिवसांच्या पीसीआरदरम्यान गहाण सोन्याचा व्यवहार, ग्राहकांकडून स्वीकारलेल्या रोख रकमा, अनधिकृत पावत्या, बँक खाती आणि सराफांकडे झालेल्या व्यवहारांची साखळी तपासली जाणार आहे. त्यामुळे मुथूट फिनकॉर्पमधील कथित अपहाराची व्याप्ती आणखी वाढते का आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याकडे आता लक्ष लागले आहे.

### दिवसा घरफोडी करणारे

याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चोरी व मुद्देमालाबाबत कसून चौकशी केली असता त्याने मित्र यश कैलास यादव (रा. वडद, ता. जि. अमरावती) याच्यासोबत मिळून सदर घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. घरफोडीत चोरी केलेला मुद्देमाल यश यादव याच्या घरी लपवून ठेवल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी यश यादव यालाही ताब्यात घेतले. त्याच्या घराची झडती घेतली असता चोरीचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला.

पोलिसांनी आरोपींकडून सुमारे ३० हजार रुपये किमतीची काळ्या-पिवळ्या धातूच्या मण्यांची लहान पोत, ७ हजार रुपये किमतीचा पांढऱ्या धातूचा बिछवा, ३ हजार रुपये किमतीचे चांदीचे तीन जोडवे, ७ हजार रुपये किमतीचा सॅमसंग कंपनीचा जुना अँड्रॉइड मोबाईल, ५०० रुपये किमतीचा नोकिया कंपनीचा साधा मोबाईल तसेच गुन्हा करताना वापरलेली ३० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो होंडा सीडी डॉन मोटारसायकल (एमएच २७-एस-४२३४) असा एकूण ७७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपआयुक्त शाम घुगे (परिमंडळ-२), पोलिस उपआयुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे आणि सहायक पोलिस आयुक्त (राजापेठ विभाग) संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोलिस निरीक्षक अतुल वर, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक दशरथ आडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक फिरोज खान, पोलिस हवालदार मंगेश लोखंडे, संभाजी केंद्रे, संजय भारसाकळे, नाझिमोद्दीन सैयद, पोलिस नाईक सचिन भोयर तसेच पोलिस अंमलदार रंजित गावंडे, नरेश मोहरिल, सूरज चव्हाण, सागर ठाकरे, निखील गेडाम, चालक चेतन शर्मा, प्रभात पोकळे आणि सायबर पोलिस ठाण्यातील महिला पोलिस कॉन्स्टेबल सुषमा आठवले यांच्या पथकाने ही कारवाई केली.

### जिवंत काडतूस प्रकरणात चौथा

फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३३ तसेच शस्त्र कायद्यातील कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी यापूर्वी विवेक धनराज गायकवाड, गप्पू उर्फ रितिकेश संजय तरोडे आणि आकाश सुभाष सपकाळ या तिघांना अटक केली होती.

या प्रकरणाच्या तपासाला पुढे नेत पोलिसांनी चौथ्या आरोपी अभिजित बबनराव मात्रे याचा शोध घेऊन त्याला अटक केली. त्याच्याकडून या प्रकरणातील कटाबाबत अधिक माहिती मिळविण्यासाठी तसेच त्याची भूमिका, इतर आरोपींशी असलेला संबंध आणि जिवंत काडतुसे प्रकरणातील सहभाग याबाबत पोलिसांकडून चौकशी केली जात आहे. न्यायालयाने आरोपी मात्रे याला १७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी मंजूर केल्याने तपासाला आता अधिक वेग येण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकरणात यापूर्वी अटक करण्यात आलेल्या तिघांचीही पोलिस कोठडी ७ ऑगस्टपर्यंत मंजूर करण्यात आली होती. त्यामुळे जिवंत काडतुसे घरात टाकण्यामागील नेमका कट, त्यामागील कारण आणि या कटात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास फ्रेजरपुरा पोलिसांकडून सुरू आहे.

### राम मंदिरातील चोरीचा छडा

पोलिस ठाण्यात कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. धार्मिक स्थळाशी संबंधित गुन्हा असल्याने त्याचे गांभीर्य ☞(पान २ वर)

लक्षात घेऊन वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी डी.बी. पथकाला तातडीने गुन्ह्याचा छडा लावण्याचे निर्देश दिले. त्यानुसार डी.बी. पथकाने घटनास्थळाची पाहणी, परिसरातील माहिती तसेच गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांच्या अभिलेखावरील आरोपी गजानन आत्राम याच्याबाबत महत्त्वाची माहिती मिळाली. त्याला ताब्यात घेऊन विश्वासात घेत चौकशी केली असता त्याने मंदिरातील चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर पंचांसमक्ष त्याच्या घराची झडती घेण्यात आली असता मंदिरातून चोरी केलेला पितळी मोठा नाग, दोन सिंहासन, पितळी दिवा, दोन पितळी ताट, पितळी पंचारती आणि पितळी घंटी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, धार्मिक स्थळातील चोरीचा गुन्हा पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत उघडकीस आणला. चोरीला गेलेल्या मंदिरातील बहुतांश वस्तू आरोपीकडून हस्तगत करण्यात आल्याने या कारवाईला महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गाडगेनगर पोलिसांकडून सुरू आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, पोलिस उपायुक्त यशवंत सोळंके आणि सहायक पोलिस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या निर्देशानुसार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, पोलिस निरीक्षक (गुन्हे) विजया पंधरे आणि पोलिस निरीक्षक (प्रशासन) प्रमोद पाचकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डी.बी. पथक प्रमुख सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप हिवाळे, पोलिस उपनिरीक्षक योगेश श्रीवास, पोलिस हवालदार भारत वानखडे, नंदकिशोर करोची, पोलिस नाईक राजेश गुरेले, पोलिस शिपाई सुशांत प्रधान, मतिन शेख, चनराज कुमरे, महेश शर्मा आणि चालक पोलिस शिपाई पवन लाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**कार्यालय**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**अमरावती जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. अमरावती**
**मेघदुत बिल्डींग, हॉटेल ड्रीमलँडच्या मागे, राजापेठ चौक, अमरावती.**
**संपर्कः- ९६३७८५५५५१/५२/५३**
**-: महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१) (३) अन्वये :-**
**-: ताबा नोटीस प्रसीध्दी :-**

सर्व नागरीकांना व थकबाकीदार सभासदांना जाहीर नोटीस देण्यात येते की, वादी संस्था पत्रकार नागरी ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. शिरजगाव कसबा रजि. नं. ५०९ या संस्थेच्या खालील थकबाकीदार सभासदांनी वादी पतसंस्थेची थकबाकीचा भरणा न केल्यामुळे त्यांची खालील स्थावर मालमत्ता जप्त करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) (ड-१) (३) अन्वये प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे. प्रत्यक्ष ताबा मिळण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांना प्रस्ताव दाखल केलेला आहे. खालील मालमत्ते संबंधी खालील थकबाकीदार सभासदाशी कोणताही आर्थीक व्यवहार करु नये. केला असल्यास वादी संस्थेच्या थकबाकीस आधिन राहावे लागेल.

**-: जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन :-**

| अ. क्र. | थकबाकीदार व मालमत्ता धारकाचे नाव व स्थळ | गावाचे नाव | मालमत्ता क्र, ब उपविभाग क्र. | क्षेत्रफळ जमिन | आकारणी व भोगवटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | **श्री. गणेश शंकरराव सुने** + **२** राहनार- देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | मौजे देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | ३७ | ०.३७.०० हे. आर. ची. मि. यामधील श्री. गणेश शंकरराव सुने यांच्या नावे असलेलाहिस्सा | आकारणी - ३.०० भोगवटदारवर्ग- १ |
| ०२ | **श्री. महादेव चंद्रभानजी सुसरे + २** राहनार- देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | १)मौजे देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती २)मौजे देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | क्र.१) मालमत्ता क्र. ६७३ वार्ड क्र - ३ अनु क्र ७३ क्र.२) भुमापन क्र.२०९ | १) लांबी २६फुट, रुंद - १९ फुट एकुण ४९४ चौ. फूट चं घर बांधकाम ३४२ चौ. फुट, खुले- १५२ चौ. फुट २) ०.८३ हे. आर.चौ. मि. मधिल०.६२.००हे, आर.चौ. मि. महादेव चंद्रभान सुसरं यांचा हिस्सा | १)आकारणी- ३५५ २)आकारणी- ५.५० |
| ०३ | **श्री. राजेंद्र वामनराव जोगा+ २** राहनार- देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | मौजे देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | भुमापन क्र.१२७ | १.४९,००० हे. आर. चौ. मि. मधिल राजेंद्र वामन जोगी यांचा हीस्सा | आकारणी- १३.३९ |
| ०४ | **श्री. राजेंद्र पंजाबराव भोंगाडे + २** राहनार- देवरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | मौजे देवुरवाडा, ता. चांदुर बाजार जि. अमरावती | भुमापन क्र.२४० | २.३५,००० हे. आर.चौ. मि. मधिल श्री, राजेंद्र पंजाबराव भोंगाडे यांचा ०.४३ हे. आर. चौ. मि. हीस्सा | आकारणी- १४.०० |

**ताब्यात असनाऱ्याचे अधिकाऱ्याचे नावः** विशेष वसुली व विक्री अधिकारी, अमरावती जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. अमरावती.

**जावक क्र.** :- अजिसपफे/विववविअ/द.प./६८७/२०२६-२७
**दिनांक** :- १३/०८/२०२६

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**अमरावती जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन**
**मर्या. अमरावती,-**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अनसिंग बसस्थानकासमोरील रस्त्याचे ‘तळ्यात’ रूपांतर; नागरिकांचे अनोखे आंदोलन

## प्रशासनाचे दुर्लक्ष; साचलेल्या पाण्याचे उपरोधिक ‘तळे’ उद्घाटन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने अनसिंग बसस्थानकासमोरील मुख्य रस्त्याला अक्षरशः तळ्याचे स्वरूप आले आहे. या गंभीर समस्येकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी गुरुवारी (दि. १३) अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. रस्त्यावर साचलेल्या पाण्याचे ‘तळे’ म्हणून उपरोधिक उद्घाटन करून प्रशासनाच्या कारभाराचा निषेध करण्यात आला.



अनसिंग बसस्थानक हे परिसरातील अनेक गावांसाठी महत्त्वाचे केंद्र असून, या मार्गावर दररोज मोठ्या संख्येने प्रवासी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच वाहनचालकांची वर्दळ असते. मात्र, पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर साचत असल्याने नागरिकांना त्यातूनच वाट काढावी लागत आहे. त्यामुळे दुचाकीस्वार व इतर वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, रस्त्याची अवस्थाही दिवसेंदिवस खराब होत आहे.

या समस्येबाबत सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी ३ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन दिले होते. पावसाच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी योग्य नाली, गटार व्यवस्था निर्माण करावी तसेच रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली होती. मात्र, निवेदन देऊनही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याचे सामाजिक कार्यकर्ते यश चव्हाण यांनी सांगितले. वारंवार पाणी साचत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. प्रशासनाने केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता पाण्याच्या निचऱ्याची शास्त्रोक्त व्यवस्था करून रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या अनोख्या आंदोलनातून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाचा निषेध करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल माणिकराव सातव, यश सतीश चव्हाण, वजीर भाई, कामेश अग्रवाल, राजकुमार मानधणे, गजानन कुठे, जगन कापसे, सलमान मिर्झा, नितीन चव्हाण, चंद्रकांत ठाकरे, ज्ञानेश्वर ढोके, राजू ठाकूर, संतोष ठाकरे, अनंता लांडगे, सागर सातव,

### कारवाई न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांच्या दालनात ठिय्या आंदोलनाचा यश चव्हाण यांचा इशारा

प्रशांत ढगे, सुरेश सातव, अमोल पोहरकर, शुभम काळे, गोपाल पवार, अनिल राठोड, ईश्वर शिंदे, अनंता ढोके, राहुल भालेराव यांच्यासह असंख्य सामाजिक कार्यकर्ते, नागरिक व प्रवासी उपस्थित होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

**अभियंत्यांच्या दालनात ठिय्या आंदोलनाचा इशारा**

आंदोलनानंतरही सार्वजनिक बांधकाम विभागाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना केली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते यश चव्हाण यांनी दिला. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# वाशिम जिल्ह्यातील शेतकरी व स्थानिक मच्छीमारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करा

– आ. भावना गवळी पाटील यांची मागणी

– मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांची घेतली भेट

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आकांक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्यातील गाव तलाव, पाझर तलाव, साठवण तलाव, शेततळे आणि इतर जलसाठ्यांचा प्रभावी वापर करून शेतकरी व स्थानिक मच्छीमारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची मागणी आ. भावना गवळी पाटील यांनी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली आहे. यावेळी ना. राणे यांनी वाशिम जिल्ह्याकडे प्राधान्याने लक्ष देवू असे आश्वासन दिले.

आ. भावनाताई गवळी पाटील यांनी दिलेल्या पत्रामध्ये वाशिम जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणात उद्योग धंदे नसल्याने येथील नागरिकांचे जिवनमान शेतीवरच अवलंबुन आहे. त्यामुळे पालन शेतीला पूरक जोडधंदा म्हणून मत्स्यपालन हा अत्यंत फायदेशीर आणि शाश्वत व्यवसाय आहे. शेततळ्यांचा वापर करून किंवा बायोफ्लॉक पद्धतीने शेतकरी कमी खर्चात गोड्या पाण्यातील माशांचे संगोपन करू शकतात. यामुळे अतिरिक्त उत्पन्न मिळते आणि शेततळ्यातील पाणी सिंचनासाठी अधिक पौष्टिक बनते. म्हणून वाशिम जिल्ह्यात मत्स्यपालन व्यवसायाला चालना देण्याकरीता आकांक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्याकडे विशेष बाब म्हणून लक्ष द्यावे अशी मागणी केली. यावेळी रिसोड बाजार समितीचे संचालक गजानन पाचरणे यांची उपस्थिती होती.



**पायलट प्रोजेक्ट मध्ये वाशिम जिल्ह्याचा समावेश करा!**

ग्रामपंचायती आणि स्थानिक मच्छीमारांच्या सहभागातून या तलावांमध्ये मत्स्यबीज संचयन व मत्स्यसंवर्धनाला चालना दिली जाणार आहे. ही योजना सुरुवातीला राज्यातील २५ गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर (पायलट प्रोजेक्ट) राबवली जाणार आहे. या पायलट प्रोजेक्टमध्ये वाशिम जिल्ह्याचा समावेश करण्याची मागणी आ. भावनाताई गवळी पाटील यांनी केली आहे.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त कारंजात भाजपची भव्य तिरंगा यात्रा; भव्य बाइक रॅली



■ प्रतिनिधी | कारंजा ■

राष्ट्रध्वजाचा सन्मान आणि स्वातंत्र्यदिनाचा अभिमान जनमानसात अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, कारंजा शहर यांच्या वतीने ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता भव्य तिरंगा यात्रा (बाइक रॅली) काढण्यात येणार आहे.

या तिरंगा यात्रेला कृषी उत्पन्न बाजार समिती, सभापती निवास, कारंजा लाड येथून प्रारंभ होणार आहे. हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर वातावरणात शहरातून ही बाइक रॅली मार्गक्रमण करणार आहे. भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पावन पर्वानिमित्त दि. ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत भाजप कारंजा शहराच्या वतीने विविध देशभक्तीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानातून राष्ट्रध्वजाप्रती आदर, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# अखेर वादग्रस्त लोखंडी जिन्याचे अतिक्रमण नगर परिषदेने हटविले

## आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाची धडक मोहीम

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील बारालिंग मंदिर परिसरातील भारतीपुरा येथे सार्वजनिक रहदारीस अडथळा ठरणारे वादग्रस्त लोखंडी जिन्याचे अतिक्रमण अखेर कारंजा नगर परिषदेने धडक कारवाई करून हटविले. तब्बल नऊ महिन्यांपासून सुरू असलेल्या तक्रारी व पाठपुराव्यानंतर झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



भारतीपुरा येथील रहिवासी प्रदीप काशीनाथ डहाके यांनी शेजारील महिलेने सार्वजनिक रस्त्यावर लोखंडी जिना टाकून केलेल्या अतिक्रमणाविरोधात सुमारे नऊ महिन्यांपूर्वी नगर परिषद प्रशासनाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत नगर परिषदेने संबंधित अतिक्रमणधारकास अतिक्रमण हटविण्यासाठी नोटिसा बजावल्या होत्या. मात्र, नोटिसा देऊनही रहदारीस अडथळा ठरणारा लोखंडी जिना हटविण्यात आला नाही. अखेर तक्रारदार प्रदीप डहाके यांनी १५ ऑगस्टपासून नगर परिषदेसमोर कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली.

कारंजा नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश वाघमोडे यांनी संबंधित अतिक्रमणधारकास अंतिम नोटीस बजावली. त्यानंतरही अतिक्रमण न हटविल्याने नगर परिषदेच्या अतिक्रमण हटाव पथकाने संबंधित ठिकाणी पोहोचून धडक कारवाई केली आणि रस्त्यावर उभारण्यात आलेला लोखंडी जिना अखेर हटविला. कारवाईदरम्यान काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, नगर परिषद कर्मचारी आणि पोलिस कर्मचाऱ्यांनी परिस्थिती शांततेने हाताळत कारवाई पूर्ण केली. अतिक्रमण हटविताना नगर परिषदेचे कर्मचारी तसेच पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.

### कारंजा येथे ‘हर घर तिरंगा’ अभियानाचा उत्साहात शुभारंभ

**कारंजा** : स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ‘हर घर तिरंगा’ अभियानाचा कारंजा शहरात गुरुवार, दि. १३ ऑगस्ट रोजी उत्साहात शुभारंभ करण्यात आला. आमदार सईताई डहाके यांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत सभापती निवासस्थानी तिरंगा ध्वजारोहण करून अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी आमदार सईताई डहाके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना राष्ट्रध्वज हा देशाचा स्वाभिमान, अस्मिता आणि राष्ट्रीय एकात्मतेचे पवित्र प्रतीक आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर अभिमानाने तिरंगा फडकवून ‘हर घर तिरंगा’ अभियानात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास भाजपा कारंजा शहर अध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, भाजपाचे पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथप्रमुख तसेच सक्रिय सदस्य उपस्थित होते.

# चिमुकल्या विद्यार्थ्यांचा निर्धार ‘तंबाखूला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार!’



■ प्रतिनिधी | कारंजा ■

‘व्यसन एका व्यक्तीचे आयुष्यच नाही, तर संपूर्ण कुटुंबाचे सुख हिरावून घेते.’ या हृदयस्पर्शी संदेशासह गोविंद न्यू इंग्लिश पब्लिक स्कूल, कारंजा (लाड) येथे आज तंबाखू निर्मूलन जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी हातात घोषवाक्यांचे फलक, ओठांवर जनजागृतीचे संदेश आणि मनात समाजाप्रती असलेली जबाबदारी घेऊन संपूर्ण परिसरात तंबाखूमुक्त समाजाचा प्रभावी संदेश दिला. यामध्ये शाळेतील विद्यार्थी, मुख्याध्यापिका, संचालक, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी ’तंबाखूला नकार – आरोग्याचा स्वीकार’, ’तंबाखू सोडा, आयुष्य जोडा’, ’व्यसनमुक्त भारत – निरोगी भारत’ अशा प्रभावी घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांविषयी जागरूक केले.

# देशभक्तीपर गीतगायनाने ‘हर घर तिरंगा’ अभियानाची सुरुवात



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने ‘हर घर तिरंगा’ अभियानाची सुरुवात १३ ऑगस्ट २०२६ रोजी देशभक्तीपर गीतगायनाने करण्यात आली. या अभियानांतर्गत महाविद्यालयात देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा, वृक्षारोपण, ‘सेल्फी विथ तिरंगा’, तिरंगा रॅली, स्वच्छता अभियान आदी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली असून, मान्यवरांच्या स्वागतानंतर देशभक्तीपर गीतगायन स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ‘ऐ मेरे वतन के लोगों’, ‘तेरी मिट्टी में मिल जावां’, ‘वतन वतन मेरे आबाद रहे तू’, ‘मेरा मुल्क मेरा देश’ यांसह विविध देशभक्तीपर गीतांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. शेवटी स्पर्धेतील उत्कृष्ट तीन सादरीकरणांची निवड करत प्रथम क्रमांक वृषाली कांबळे, द्वितीय क्रमांक श्रेया गायकवाड आणि तृतीय क्रमांक संगीता माने यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. ममता पाथ्रीकर, प्रा. डॉ. गजानन घोंगटे, डॉ. जयाप्रभा भगत, प्रा. दीपक भगत, प्रा. दिलीप मुंदे, सचिन राणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिद्द, चिकाटीच्या जोरावर गुणेशचा आयआयटी मध्ये प्रवेश



■ प्रतिनिधी | कारंजा ■

दि. १२ ऑगस्ट कारंजा शहरातील एका सर्वसाधारण कुटुंबातील गुणेश सागर भेलांडे याने आपल्या जिद्द, मेहनतीच्या जोरावर कौटुंबिक परिस्थितीवर मात करत आयआयटी गुवाहाटी येथे प्रवेश निश्चित केला. वडील सागर भेलांडे व्यवसायाने फोटोग्राफर तसेच शेती मात्र; आजच्या डिजिटल, इंटरनेट, रिल्स तथा नव्याने आलेले एआय ?पच्या हा व्यवसाय कठीण झाला अशा, परिस्थितीत त्यांच्या पत्नी यांच्या सोबतीने हाताला मिळेल ते काम करुन आपल्या संसाराचा गाडा ओढला. परंतु, मुलाला उच्च शिक्षित बनवायचे हे ध्येय कायम उरी बाळगले. याच ध्येयाला गुणेश खरा उतरला. त्याने आई-वडिलांच्या कष्टाला प्राधान्य देत गुणेश यांने दहावीचे शिक्षण नवोदय विद्यालय वाशीम येथे पूर्ण केले. त्यानंतर, बारावी नवोदय विद्यालय बेंगलोर या ठिकाणी पूर्ण केले. यानंतर, JEE ची परीक्षा उत्तीर्ण करून आयआयटी कॉम्प्युटर सायन्स गुवाहाटी या ठिकाणी आपला प्रवेश निश्चित केला. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर स्पर्धा परीक्षेला सामोरे जाण्याचा मानस व्यक्त केला.

# नागपूरकर पार्वती बाईंनी आरोग्य सेवेत केले पर्वता एवढे काम

### मानोरा तालुक्यातील असंख्य गरीब रुग्णांना केली सर्व प्रकारची वैद्यकीय मार्गदर्शन व मदत

■ प्रतिनिधी | मानोरा ■

मूळच्या यवतमाळ जिल्ह्यातील असून सध्या नागपूर येथे स्थायिक झालेल्या पार्वती बाई राठोड यांनी गेल्या अनेक वर्षांपासून रुग्णसेवेचा वसा घेतला आहे. त्यांच्या या निस्वार्थी सेवेचा लाभ मानोरा तालुक्यातील अनेक गावांतील गरीब व गरजू नागरिकांना होत आहे.



नागपूर सारख्या मोठ्या शहरात उपचारासाठी जाणाऱ्या ग्रामीण रुग्णांना डॉक्टर, हॉस्पिटल, औषधे आणि आर्थिक मदत या सर्व गोष्टींमध्ये पार्वती बाई स्वतः पुढाकार घेऊन मदत करतात. त्यामुळे तालुक्यातील अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. वैद्यकीय मार्गदर्शन कॅन्सर, हृदयरोग, किडनी, अपघातग्रस्त अशा गंभीर आजारांसाठी नागपूरमधील कोणत्या हॉस्पिटलमध्ये कोणता डॉक्टर चांगला आहे, याची संपूर्ण माहिती त्या रुग्णांना देतात.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी, संजय गांधी निराधार योजना, महात्मा फुले आरोग्य योजना यांसारख्या शासकीय योजनांचे फॉर्म भरणे व मंजुरीसाठी पाठपुरावा त्या स्वतः करतात. आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांसाठी देणगीदारांशी संपर्क साधून मदत मिळवून देतात. उपचारादरम्यान रुग्ण व नातेवाईकांना धीर देण्याचे कामही त्या करतात.

**तालुक्यासाठी आधारवड :** मानोरा तालुक्यातील कारखेडा येथील उमेश ढोके, चेतन जाधव, अवनी राठोड सोयजना, गजानन राठोड फुलउमरी, कृष्णा पवार सोमनाथ नगर सोमठाणा, शितल जाधव आसोला सुरेश इंगळे, अश्विनी चव्हाण मानोरा, विजय राठोड उमरी यांसह अनेक गावांतील रुग्णांना त्यांच्या मार्गदर्शनामुळे वेळेत उपचार मिळाले आहेत.

एका महिलेने घरातून बाहेर पडून समाजसेवा करत अनेकांचे जीव वाचवण्याचे काम केले आहे. पार्वती बाई राठोड यांच्या या कार्यामुळे ’नागपूरकर पार्वती बाई’ हे नाव आज मानोरा तालुक्यातील प्रत्येक गरजू व्यक्तीच्या तोंडी आहे. पैशापेक्षा माणुसकी मोठी असते, याचा प्रत्यय त्यांच्या कार्यातून येतो.

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११८०/२०२६ — प्रोसेस नं. ९२७३/२०२६

चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २१/०७/२०२६

**अर्जदार :** १. मोहम्मद अब्दुल वसीम रा. मॉर्डन शाळे जवळ, गोवर्धन नगर, गंगा नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. २. नाझिया फरहीन सय्यद जावेद उल्लाह रा. किंग्स कॉलनी, शास्त्रीपुरम, शिवरामपल्ली, उपजिल्हा राजेंद्रनगर, जि. रंगारेड्डी, तेलंगाना. ५०००५२ ३. फौझिया फरहीन मोहम्मद अब्दुल सलीम रा. बाबु क्वाटर्स, निम वाडी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : मोहम्मद अब्दुल सलीम मोहम्मद अब्दुल लतिफ

**पत्ता :-** रा. मॉर्डन शाळे जवळ, गंगा नगर, गोवर्धन लेआउट, वाशिम बायपास रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मोहम्मद अब्दुल सलीम मोहम्मद अब्दुल लतिफ यांचे दि. २३/०४/२०२५ रोजी राहते घरी मॉडर्न शाळेजवळ, गोवर्धन नगर, गंगा नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# वाशिम शहराच्या सौंदर्यीकरणाला नवी झळाळी
# १०१.३४ लाखांच्या विकासकामांचे आज लोकार्पण

▶▶ पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते लोकार्पण

▶▶ प्रमुख चौक, स्मारके व दुभाजकांचे सुशोभीकरण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहराच्या सौंदर्यीकरणाला आणि ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला नवी झळाळी देण्याच्या उद्देशाने वाशिम नगर परिषदेच्या वतीने विविध नावीन्यपूर्ण विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. जिल्हा वार्षिक योजना नावीन्यपूर्ण योजना अंतर्गत अकोला नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात करण्यात आलेल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक कामांचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कामांसाठी तब्बल १०१.३४ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.

या विकासकामांचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते होणार आहे. कार्यक्रमाला लोकसभा सदस्य संजय देशमुख व अनुप धोत्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिम-मंगरुळनाथ विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे राहणार आहेत.

या प्रकल्पांतर्गत पोलीस स्टेशन ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दुभाजकाचे सुशोभीकरण, अकोला नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण तसेच शिवाजी चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक ओळख आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या कामांमुळे प्रमुख चौकांचे रूप पालटणार आहे. दरम्यान, टेम्पल गार्डन विकासकामही प्रगतीपथावर असून, या कामामुळे शहरातील नागरिकांना अधिक चांगली सार्वजनिक जागा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, दुभाजक आणि सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने नगर परिषदेने विविध कामांना गती दिली आहे.

पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्गदर्शनातून वाशिम शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत असून, सौंदर्यीकरणासोबतच पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले जात आहे. ‘विकासकामांना निधी, शहराच्या सौंदर्याला नवी दिशा आणि नागरिकांच्या सुविधांना प्राधान्य’ या उद्देशाने सुरू असलेल्या कामांमुळे वाशिम शहराच्या विकासाला नवी ओळख मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. लोकार्पण सोहळ्यास विधान परिषद सदस्य भावनाताई गवळी, धीरज लिंगाडे, किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, विधानसभेचे आमदार अमित झनक, सई डहाके, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, नगर परिषद उपाध्यक्ष राजू विठोबा भांदुर्गे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



तसेच नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे, सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती राहुल मोतीराम तुपसांडे यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे. नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, नगर अभियंता निखिल चव्हाण, कंत्राटदार शंभु फायबर आर्ट, शेगाव तसेच नगर परिषदेचे सभापती, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने ही कामे पूर्णत्वास आली आहेत.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५८ ■ शुक्रवार, १४ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## परवानगीविना रास्ता रोको; ४८ जणांवर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** पूर्वपरवानगीशिवाय रास्ता रोको आंदोलन करून वाहतूक बंद केल्याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी ४८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. हिंगणघाट–नंदोरी मार्गावर १२ ऑगस्ट रोजी रास्ता रोको करण्यात आला होता. यावेळी रस्त्यावर जमाव जमवून वाहतुकीला अडथळा निर्माण करण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

तसेच जमावबंदी आदेश लागू असतानाही त्याचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. आंदोलनासाठी आवश्यक पूर्वपरवानगी घेण्यात आली नसल्याने पोलिसांनी संबंधितांविरुद्ध कारवाई केली. याप्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## ओबीसींच्या हक्कांसाठी काँग्रेसचा एल्गार
## सेवाग्रामातून सत्ताधाऱ्यांना इशारा

**वर्धा जनमाध्यम :** ओबीसी समाजाच्या घटनात्मक अधिकारांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणत काँग्रेसने सेवाग्रामच्या भूमीतून सामाजिक न्यायासाठी संघर्षाची भूमिका आक्रमकपणे मांडली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या पूर्व विदर्भ-नागपूर विभागीय मंडल यात्रेचा समारोप चरखा भवन, सेवाग्राम येथे उत्साहात झाला. यावेळी उठ ओबीसी जागा हो. संघर्षाचा धागा हो आणि हर एक ओबीसी बनेगा काँग्रेसी अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

**ओबीसी जागा हो, संघर्षाचा धागा हो च्या घोषणांनी वर्धा दुमदुमले**

मंडल यात्रेचे वर्ध्यातील स्व. जमनालाल बजाज चौकात काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुतमाळ, पुष्पहार, ढोलपथक आणि आतषबाजीने स्वागत केले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या स्मारकांना अभिवादन करून यात्रा सेवाग्रामकडे रवाना झाली.

प्रदेशाध्यक्ष डॉ. यशपालजी भिंगे यांच्या नेतृत्वात आणि पूर्व विदर्भ-नागपूर विभाग समन्वयक मोरेश्वर भादे यांच्या संयोजनात हा समारोप पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील कोल्हे होते. काँग्रेस नेते शेखर शेंडे, ओबीसी विभागाचे एआयसीसी समन्वयक रामरतन पटेल, प्रदेश काँग्रेस सचिव उदय मेघे, अजय हाटेवार, अवंतिका लेकुरवाळे, मनोज चांदुरकर, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, महेश तेलरांधे, कैलास फाटे, राजेश राजुरकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### २७ जातींचा केंद्रीय ओबीसी यादीत समावेश करा

ओबीसी समाजाचे घटनात्मक अधिकार अबाधित ठेवणे, मंडल आयोगाच्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि सामाजिक न्यायाचा लढा अधिक तीव्र करणे, हा मंडल यात्रेचा मुख्य उद्देश असल्याचे डॉ. यशपाल भिंगे यांनी स्पष्ट केले. काँग्रेस ओबीसी आणि वंचित घटकांच्या न्यायासाठी सातत्याने लढत राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

विदर्भातील भोयर, पवार, लोधी, डांगरी, वाणी, कोहली यांसह महाराष्ट्रातील २७ जातींचा तातडीने केंद्रीय ओबीसी यादीत समावेश करावा, अशी जोरदार मागणी मोरेश्वर भादे यांनी केली. त्यामुळे मंडल यात्रेच्या समारोपातून ओबीसी आरक्षण आणि सामाजिक न्यायाचा राजकीय मुद्दा पुन्हा तापण्याची चिन्हे आहेत.

कार्यक्रमाला वर्धा जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी, ओबीसी विभागाचे कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन विशाल चौधरी यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विदर्भाच्या ताटात मक्याची भर; गव्हाला कात्री
### स्वस्त धान्य दुकानातून गव्हाचे प्रमाण घटले; मक्याचे वाटप वाढले, दळणाचा प्रश्न गंभीर

**सेलू जनमाध्यम :** विदर्भातील नागरिकांच्या रोजच्या आहारातील प्रमुख धान्य असलेल्या गव्हाचे प्रमाण स्वस्त धान्य दुकानांमधून कमी करून त्याऐवजी मक्याचे वाटप वाढविण्यात आल्याने शिधापत्रिकाधारकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. गहू सहज दळून मिळत असताना मक्का दळायचा कुठे, असा प्रश्न आता लाभार्थ्यांसमोर उभा ठाकला आहे.



चालू महिन्यात अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेंतर्गत धान्याचे वाटप सुरू आहे. अंत्योदय कार्डधारकांना प्रति कार्ड ११ किलो मका, ११ किलो गहू, १३ किलो तांदूळ आणि एक किलो साखर दिली जात असून यासाठी २० रुपये रोख घेतले जात आहेत. अन्नसुरक्षा कार्डधारकांना प्रति व्यक्ती दोन किलो मका, दोन किलो तांदूळ आणि एक किलो गहू असे वाटप होत आहे.

### गव्हाला कात्री, मक्याची सक्ती

विदर्भातील बहुतांश कुटुंबांच्या आहारात गहू किंवा ज्वारीला महत्त्व आहे. यापूर्वी अन्नसुरक्षा योजनेत प्रति व्यक्ती तीन किलो गहू मिळत होता. आता गव्हाचे प्रमाण कमी करून मक्याचे प्रमाण वाढविल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. पुढील महिन्यातही अशाच पद्धतीने मका मिळणार असल्याची माहिती असल्याने हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

गहू दळण्यासाठी गावोगावी आटा चक्क्या उपलब्ध असतात. मात्र मक्का दळण्यासाठी अनेक ठिकाणी स्वतंत्र यंत्रणा किंवा सुविधा उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांची मोठी अडचण होत आहे. त्यामुळे मिळालेला मका खायचा कसा, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

## वर्धेच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी निलंबित
### रेशन कार्डांच्या नियमबाह्य हस्तांतरणाचा ठपका; जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

**वर्धा जनमाध्यम :** शासकीय नियम व परिपत्रकांचे पालन न करणे तसेच रेशन कार्डांचे नियमबाह्य हस्तांतरण केल्याचा ठपका ठेवून वर्धा तहसील कार्यालयातील पुरवठा निरीक्षण अधिकारी मनीषा माजरखेडे यांना जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी निलंबित केले आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने ११ ऑगस्ट २०२६ रोजी निर्गमित केला. या कारवाईमुळे वर्धा तहसील कार्यालयात खळबळ उडाली आहे.

वर्धा जिल्हा सहकारी होलसेल अँड रिटेल कन्झ्युमर्स सोसायटीशी संलग्न स्वस्त धान्य दुकानाचे संचालक डी. बी. कुंभलवार यांच्याविरोधात प्राप्त तक्रारीच्या चौकशीत अनियमितता समोर आली. वर्धा तहसीलदारांनी २० फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित स्वस्त धान्य दुकानाची तपासणी करून सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला होता.

चौकशीत ई-पॉस मशीन क्रमांक १५०४००१००२६३ च्या माध्यमातून निर्धारित नियमांचे पालन न करता धान्य मंजूर करण्यात आल्याचे तसेच 'साइलेंट आरसी'चे नियमबाह्य हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान ६१९ अर्जांपैकी ३३७ अर्ज प्राप्त झाले. यातील २५ रेशन कार्डधारकांनी जबानीत रेशन कार्ड हस्तांतरणासाठी आपण कोणताही अर्ज केला नसल्याचे सांगितले. संबंधित दुकानातून धान्य घेतले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### शासनाला ३१.७७ लाखांचा फटका

चौकशी अहवालानुसार, मार्च ते एप्रिल २०२५ या कालावधीत नियमबाह्य पद्धतीने हस्तांतरित केलेल्या कार्डधारकांना प्राधान्य गटातील २६.७९ क्विंटल गहू आणि १०८.२९ क्विंटल तांदूळ वितरित करण्यात आला. यामुळे बाजारभावानुसार शासनाला ४ लाख ९१ हजार ४२६ रुपये ६० पैसे आर्थिक नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व संबंधित जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. विश्वास मुरलीधर रोठे व सौ. अर्चना विश्वास रोठे हे मौजा चिकमोह, मौजा क्र. ६२, पी.एच. क्र. ३२, मालमत्ता क्र. १६८, अनुक्रमांक क्र. ५९, वॉर्ड क्र. २, ग्रामपंचायत चिकमोह, ता. हिंगणघाट, जि. वर्धा हद्दीतील खालील मिळकतीचे मालक व ताबेदार आहेत. सदर मिळकतीवर बांधलेले घरासह एकूण क्षेत्रफळ १३९.३५ चौ. मी. (१५०० चौ. फूट) आहे.

चतु:सीमा
पूर्वेस: श्री. वानखेडे यांचे घर,
पश्चिमेस: रस्ता,
उत्तरेस: रस्ता,
दक्षिणेस: रस्ता,

सदर मिळकत ग्रामपंचायत चिकमोह यांनी दिनांक १४/०७/२०२६ रोजी दिलेल्या गावठाण प्रमाणपत्रानुसार श्री. विश्वास मुरलीधर रोठे यांची वडिलोपार्जित मिळकत असून ते तिचे मालक व ताबेदार आहेत.

पुढे, श्री. विश्वास मुरलीधर रोठे व सौ. अर्चना विश्वास रोठे हे वरील वर्णन केलेल्या मालमत्ता क्र. १६८, अनुक्रमांक क्र. ५९, वॉर्ड क्र. २, ग्रामपंचायत चिकमोह, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील १३९.३५ चौ. मी. क्षेत्रफळाच्या घरासह मिळकतीचे बक्षीसपत्र (गिफ्ट डिड ) सौ. किर्ती विश्वास रोठे यांच्या नावे करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर व्यवहाराच्या अनुषंगाने सौ. किर्ती विश्वास रोठे यांनी जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड येथे गृहकर्जासाठी अर्ज केलेला आहे.त्यामुळे, सदर मिळकत, प्रस्तावित बक्षीसपत्र व्यवहार किंवा त्यावर आधारित कर्ज व्यवहारासंबंधी कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, सोसायटी किंवा प्राधिकरणास काही हक्क, मालकी, स्वारस्य, दावा, हरकत, वाद, बोजा, गहाण, ताबा किंवा कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास त्यांनी आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. अन्यथा, सदर मिळकत व व्यवहाराबाबत कोणालाही कोणतीही हरकत नाही असे समजून प्रस्तावित बक्षीसपत्र व कर्ज व्यवहार पुढे करण्यात येईल. त्यानंतर करण्यात येणाऱ्या कोणत्याही दाव्यास माझे अशिल किंवा खाली सही करणारे जबाबदार राहणार नाहीत.

**हरकत कळविण्याचा पत्ता:**
**अ‍ॅड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा – ४४२००१**
**मोबा. क्र:- ९९२२४२६१६८**



## प्रारंभीक अधिसूचना

**उपजिल्हाधिकारी भूसंपादन (सामान्य), वर्धा**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचे कार्यालय**
क्र.मह.सहा./उजिअभु/सामान्य/कावि-५९०/२०२६
दिनांक १२.०८.२०२६

**भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना**

भुसंपादन प्रकरण क्रमांक -०२/एलएक्यू-४७/२०२५-२६, मौजा -आमजी मजरा, ता.वर्धा, जि.वर्धा

ज्याअर्थी, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वनविभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/(भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त अधिसूचना** असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त जमीन** असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त नियम** असा करण्यात आला आहे) यांच्या नियम-१० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन (सामान्य), वर्धा यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**
**जमिनीचे वर्णन**
**भु.प्र.क्रमांक - ०२/एलएक्यू-४७/२०२५-२६**
**मौजा -आमजी मजरा, ता.वर्धा, जि.वर्धा**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादन करावयाचे क्षेत्र अदमासे हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादन करावयाचे क्षेत्र अदमासे हे.आर.मध्ये |
| १. | ११ | ०.१४ |
| २. | १२ | ३.११ |
| ३. | १३ | ०.४४ |
| ४. | १८ | १.२० |
| ५. | १९ | ०.१७ |
| ६. | २० | ०.८८ |
| ७. | २१/१ | **१.२३** |
| ८. | २१/२ | |
| ९. | २२ | ०.४३ |
| १०. | २३/१/अ | ०.३३ |
| ११. | २३/१/ब | |
| १२. | २३/२ | |
| १३. | २४/१/अ/१ | ०.००३ |
| १४. | २४/१/अ/२ | |
| १५. | २४/१/ब | |
| १६. | २४/१/क | |
| १७. | २४/२/अ | |
| १८. | २४/२/ब | |
| १९. | ९९ | ०.७० |
| २०. | १२० | ०.००३ |
| २१. | १२१ | ०.३३ |
| २२. | १२२ | ०.३६ |
| २३. | १२३ | १.०२ |
| | **एकुण** | **१०.३४६** |

**अनुसूची - दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव - वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या लिंक-१ अंतर्गत मुख्य कालव्याच्या बांधकाम करण्याकरीता

सिंचन योजना प्रकल्प कार्याचे वर्णन - वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाच्या लिंक-१ अंतर्गत मुख्य कालव्याच्या बांधकाम करण्याकरीता

समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार पायाभूत सुविधा, सोयी सुविधा, याबाबत व इतर लाभासंबंधात) - या प्रकल्पामुळे ता.वर्धा, जि.वर्धा येथील २१४०० हे.आर.जमिनीस सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सिंचनाकरीता व सार्वजनिक पाणी पुरवठा होणार असल्यामुळे त्या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचबरोबर ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे.

**अनुसूची - तीन**

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे - कुणीही व्यक्ती किंवा कुटूंब विस्थापित होत नाही.

**अनुसूची - चार**

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला - मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क. भूसंपादन/कार्या-४(१)/कावि-३५७/२०२६ दि.२८.०७.२०२६ अन्वये भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१२ चे कलम ६ (२) व कलम १० चे परंतुक नुसार प्रकरण दोन व तीन च्या तरतुदी लागू होत नाही.

**अनुसूची - पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**
**निरंक**

**विशेष नोंद -**
उक्त जमिनीच्या आराखड्याचे भूसंपादित जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी भूसंपादन सामान्य, वर्धा या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

दिनांक - १२.०८.२०२६
ठिकाण - वर्धा

**(जिमाका-वर्धा/९९/२०२६-२०२७)**

**(वान्मथी सी)**
**जिल्हाधिकारी, वर्धा**

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# कुंभमेळा श्रद्धेचा मेळा की भ्रष्टाचाराचा मेळावा?

## काँग्रेसचा महाजनांवर हल्लाबोल

**मुंबई/ प्रतिनिधी-** कुंभमेळा श्रद्धेचा मेळा की भ्रष्टाचाराचा मेळावा? असा सवाल उपस्थित करत काँग्रेसने भाजप सरकारला धारेवर धरले आहे. शेकडो कोटींच्या वर्क ऑर्डर्स निघत असताना प्रशासन झोपले होते का? बनावट टेंडरच्या माध्यमातून एवढा मोठा गैरव्यवहार होत असताना जबाबदार अधिकारी कोण? असा सवाल काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या सर्व प्रकारामुळे आता राजकीय वातावरण तापले असून, आगामी काळात या प्रकरणात आणखी कोणकोणते मोठे चेहरे समोर येतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. नाशिक येथे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांसाठी ५९१ कोटी रुपयांच्या बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांकडून ३ कोटींहून अधिक रक्कम उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात राज्याचे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांचा दूरचा नातेवाईक (पुतण्या) तनय महाजन याचा या घोटाळ्यात सहभाग आहे. काँग्रेसच्या नेत्या वर्षा गायकवाड यांनीही (ट्विटर) वर ट्विट करत सरकारला धारेवर धरले. त्यांनी विचारले की, कुंभमेळा हा श्रद्धेचा उत्सव आहे की सत्ताधा-यांच्या कमाईचा मेळा?

भाविकांच्या श्रद्धेच्या नावावर ५९१ कोटींच्या बनावट वर्क ऑर्डर्सचे वृत्त अत्यंत गंभीर आहे. सरकारी तिजोरी लुटण्याचा हा कोणता विकास? कागदावर कामे, बनावट कागदपत्रे आणि सरकारी यंत्रणेला अंधारात ठेवून काढलेल्या वर्क ऑर्डर्स हा केवळ भ्रष्टाचार नाही, तर तो भाविकांच्या श्रद्धेवर आणि जनतेच्या पैशांवर टाकलेला दरोडा आहे.



मंत्री महोदयांनी नातेवाईकापासून हात झटकले आहेत. पण या ऑर्डर्स निघेपर्यंत सरकार आणि प्रशासन काय करत होते? जर कुंपणच शेत खात असेल, तर कारवाई कशी होणार? या गैरव्यवहाराचा एक-एक रुपया कुणाच्या खिशात गेला आणि कोणाच्या आशीर्वादाने हे घडले, याचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे. कुंभमेळा श्रद्धेचा आहे, सत्ताधा-यांच्या नातेवाईकांच्या तिजोरी भरण्यासाठी नाही, असा घणाघात गायकवाड यांनी केला.

नाशिकमध्ये पुढील वर्षी होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ५९१ कोटींच्या ५ बनावट निविदा काढण्यात आल्या होत्या. यात हाऊसकीपिंग, पोलिसांना आहार, स्नानासाठी साहित्य पुरवणे अशा कामांचा समावेश होता. याप्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांच्या जामनेर (जळगाव) मतदारसंघातून तिघांना अटक करण्यात आली आहे. यात तनय अनंत महाजन, नरेंद्र तोताराम महाजन आणि शकील अहमद सलीमउद्दीन शेख यांचा समावेश आहे. ठेकेदारांचा विश्वास बसावा म्हणून त्यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे खोटे दस्तऐवज, विभागीय आयुक्तांची बनावट डिजिटल सही आणि भारत सरकारची राजमुद्रा वापरून वर्क ऑर्डर्स दिल्या होत्या.

**वडेट्टीवार यांनी केली उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

या ठगांनी एका ठेकेदाराला हाऊसकीपिंगचे काम मंजूर करून देण्याचे खोटे आश्वासन देउन त्याच्याकडून तब्बल २ कोटी १७ लाख ५० हजार रुपये उकळले. तर, छत्रपती संभाजीनगर येथील एका ठेकेदाराने २५ लाख रुपये दिले आहेत. या प्रकरणी नाशिकरोड पोलिस ठाण्यात ३ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या आरोपींना कोणाचे राजकीय संरक्षण आहे, याची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. राम मंदिराच्या दानपेटीतील चोरीनंतर आता कुंभमेळ्याच्या नावाने भ्रष्टाचार सुरू असेल, तर महाराष्ट्र हे खपवून घेणार नाही अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**मंत्री गिरीश महाजन यांचे स्पष्टीकरण-** या प्रकरणातील मुख्य आरोपी तनय महाजन हा मंत्री गिरीश महाजन यांचा दूरचा पुतण्या असल्याचे समोर आले आहे. मात्र, महाजन यांनी या प्रकरणातून हात झटकले आहेत. ते म्हणाले, या घोटाळ्यात माझा नातेवाईक असला तरी मी कोणालाही सोडणार नाही. हा प्रकार समजताच मी स्वतः मुख्यमंत्र्यांना आणि पोलिस आयुक्तांना कठोर कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. या आरोपींच्या कुटुंबाशी माझे कोणतेही कौटुंबिक संबंध नाहीत. आता सर्व प्रक्रिया ऑनलाइन आहे. कुठलीही पडताळणी न करता मोठे ठेकेदार अशा भूलथापांना कसे बळी पडले, ही त्यांचीही मोठी चूक आहे.

# मुंबईच्या दळणवळणाला गतिमानतेचा 'बुस्टर' मिळणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**मुंबई/प्रतिनिधी :**केंद्र शासनाने उपनगरीय लोकलची मेट्रोच्या धर्तीवर निर्मिती करण्यास मान्यता दिली आहे. यामुळे वंदे भारतसारखी आधुनिक रेल्वे बनवित असलेल्या कारखान्यात स्वयंचलित दरवाजे, वातानुकूलित, स्वच्छ अशा मेट्रो सारख्या लोकल ट्रेनची निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई महानगराच्या दळणवळणासाठी आजचा दिवस अत्यंत महत्वाचा असून लोकार्पण होणा-या पायाभूत सुविधांमुळे मुंबईतील दळणवळणाला 'गतिमानतेचा बूस्टर' मिळाला असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. सह्याद्री अतिथी गृह येथे दूरदृष्य प्रणाली द्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दोन पायाभूत सुविधांचे ई-लोकार्पण, ठाणे ते बोरिवली दुहेरी भुयारी मार्गाच्या प्रकल्पातील ठाणे बाजूकडील टीबीएम अर्जुनाचा शुभारंभ आणि वांद्रे कुर्ला संकुलाच्या जी ब्लाकला पूर्व द्रुतगती मार्गासोबत जोडणा-या उड्डाणपूलाला माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब अनंतराव भोसले उड्डाणपूल नामकरण कार्यक्रम झाला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्यमंत्री अड आशिष शेलार, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, राजहंस सिंह, अबू आजमी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई महानगरमध्ये एकीकडे स्वच्छ सुंदर व वातानुकूलित मेट्रोचा प्रवास आहे तर दुसरीकडे कष्टप्रद वाटत असणारा लोकलचा प्रवास आहे. यामधील तफावत लवकरच दूर होणार आहे. मुंबईकरांच्या सेवेत मेट्रोसारख्या २३८ उपनगरीय लोकल ट्रेन २०२७ मध्ये येणार असून मार्च २०३० पर्यंत संपूर्ण लोकल ट्रेन मेट्रोसारख्या होतील.

**वांद्रे- कुर्ला संकुल परिसरातील वाहतूक कोंडीवर विविध उपाययोजना**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वांद्रे - कुर्ला संकुल परिसरातील वाहतूक कोंडी कायमची संपविण्यासाठी २०१७-१८ मध्ये सहा जोडमार्ग निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार काम सुरू होउन सहा जोड मार्गांचे आठ झाले. आज शेवटच्या जोड मार्गाचे लोकार्पण करण्यात येत आहे. यामुळे पूर्व आणि पश्चिम मुंबईचे दळणवळण गतिमान होत आहे. भारत नगर रोड ते वाकोला जंक्शन ही उन्नत मार्गिका सुखद प्रवासाचा अनुभव देणारी ठरणार आहे. या जोड मार्गांच्या उतरणीच्या जवळ वाहतूक कोंडी होत असून ही सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. पश्चिम द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अंडरपास किंवा अन्य उपाययोजनांची परिस्थितीनुरूप अंमलबजावणी करावी.

**चेंबूर मेट्रो स्थानकामुळे मुंबईकरांना मोठी जोडणी**

चेंबूर मेट्रो स्थानकामुळे मुंबईकरांना एक मोठी व चांगली दळणवळणाची जोडणी मिळणार आहे. मुंबई महानगरात मेट्रो मार्गिका विकसित करण्याचे काम वेगाने सुरू असून यावर्षी ६० ते ७० किलोमीटर मार्ग ह्या सेवेत येतील. मुंबई महानगरात ९० लाख प्रवासी उपनगरीय लोकलच्या माध्यमातून प्रवास करतात आणि जवळपास ७० लाख प्रवाशांची क्षमता आपण मेट्रोच्या माध्यमातून विकसित करीत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

**देशातील सर्वात लांब दुहेरी भुयारी बोगदा-**ठाणे ते बोरिवली या दुहेरी भुयारी मार्गाच्या रूपामध्ये पायाभूत सुविधांच्या बाबतीत देशात पुन्हा एक नवीन रेक?र्ड महाराष्ट्र बनवित आहे. देशातील सर्वात लांब आणि जमिनीखाली असणारा बोगदा राहणार आहे. ठाणे ते बोरिवली या २३ किलोमीटर लांब मार्गाची लांबी दुहेरी भुयारी मार्गामुळे ११ किलोमीटरवर येणार आहे. यामुळे प्रवासाच्या वेळेत बचत होणार असून अवघ्या १२ ते १५ मिनिटांमध्ये ठाणे ते बोरिवली गाठता येणार आहे. या भुयारी मार्गामध्ये पहिल्या बोगद्यासाठी नायक टीबीएम यापूर्वीच कार्यान्वित करण्यात आला आहे, तर दुस-या बोगद्यासाठी अर्जुना टीबीएम आज कार्यान्वित होत आहे. यामुळे दोन्ही दुहेरी भुयारी मार्गाचे काम समांतर पद्धतीने सुरू राहील. बोरिवली बाजूकडील दुहेरी बोगद्यामध्येदेखील लवकरच दोन टीबीएम कार्यान्वित करण्यात येणार आहेत.

वांद्रे- कुर्ला संकुलाच्या जी ब्लाकला पूर्व द्रुतगती मार्गासोबत जोडणा-या उड्डाणपुलाला ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी व राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब अनंतराव भोसले नाव देणे ही बॅरिस्टर भोसले यांच्या कार्याची पावती आहे. त्यांच्या कार्य काळामध्ये स्वातंत्र्यसैनिकांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती, मुलींकरिता दहावीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, संभाजीनगर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे उद्घाटन त्यांच्या काळात झाले. प्रत्येक विषयाची उत्तम जाण असलेला नेता म्हणून बॅरिस्टर भोसले यांच्याकडे पाहिले जाते. मुंबई शहराच्या जडणघडणीमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अत्यंत मोलाची भूमिका बजावली असल्याचे गौरवोद्गारही मुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.

# अमित शाह यांना या देशाचे तत्काळ उपपंतप्रधान व्हायचे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून सभागृहातून गायब असलेले केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी बुधवारी वृत्तसंस्थांशी संवाद साधला. सभागृहातील स्वतःच्या अनुपस्थितीचे त्यांनी समर्थन करत मी चर्चेसाठी तयार असल्याचे ते म्हणाले. अमित शहांच्या या विधानावर शिवसेना नेते, खासदार संजय राउत यांनी जोरदार हल्ला चढवला. अमित शहा घाबरले असून त्याचे हात पाय लटपटतायत. कारण त्यांचा खेळ आता संपलेला आहे अशी घणाघाती टीका संजय राउत यांनी केली.



संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस असून या पार्श्वभूमिवर संजय राउत यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका केली. अमित शाह सध्या खोटं बोलत असून ते एक घाबरलेले माणूस आहेत. त्यांचे हात-पाय लटपटत आहेत आणि त्यांचा खेळ संपला आहे. भविष्यात ते मंत्रिमंडळात राहतील की नाही, याबाबतही शंका आहे. देशात घडणा-या नकारात्मक घटनांचे खापर नरेंद्र मोदींवर फोडले जात असले, तरी या सगळ्यामागे अमित शहांचाच हात आहे, हे आता मोदींनाही पटले आहे असे संजय राउत म्हणाले.

अमित शाहंना संसदेत येण्यापासून कोणी रोखलेय? असा सवाल संजय राउत यांनी उपस्थित केला. आम्ही खासदार आहोत, आम्ही संसदेत जातोय. पण तुम्ही तर गृहमंत्री आहात. अमित शाहंना तत्काळ या देशाचे उपपंतप्रधान व्हायचंय आणि मोदींनी त्याला नकार दिलाय, असा खळबळजनक दावा संजय राउतांनी केला. नवीन रचनेत मोदींचे वारसदार म्हणून मला उपपंतप्रधान घोषित करा अशी शहांची मागणी आहे. पण मोदींनी याला स्पष्ट नकार दिलेला आहे. हे १०० टक्के सत्य असल्याचे संजय राउत म्हणाले.

**तरुणांचे आगामी आंदोलन ईव्हीएमविरोधात असणार**

संजय राउत यांनी आगामी काळात देशातील तरुणांच्या भूमिकेवर भाष्य केले. मुळात मोदींनंतर अमित शहा नक्कीच नाहीत. मोदींही या देशात किती काळ राहतील याची शंका आहे. कारण आता यापुढे जेन झी पीढी आणि देशातील तरुण ईव्हीएमच्या विरोधात जोरदार आंदोलन उभारणार आहेत असा इशारा संजय राउत यांनी दिला.

# मंत्री सामंत यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

**मुंबई / प्रतिनिधी-**राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शिवसेना शिंदेगटाचे नेते आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकाप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. नागपूरवरून गडचिरोलीला जात असताना ही घटना घडली. उड्डाण करताच तांत्रिक बिघाड झाल्याचे पायलटच्या लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला. उदय सामंत हे गडचिरोलीत पाहणी दौरा करण्यासाठी निघाले होते. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकाप्टर गुरूवारी सकाळी तांत्रिक बिघाड झाला. उदय सामंत नागपूरवरून गडचिरोली येथील सुरजागड येथे पहाणी दौरा करणार होते. हेलिकाप्टर उड्डाणादरम्यान पायलटला तांत्रिक बिघाड झाल्याचे लक्षात आला होता. त्यामुळे पायलटने उड्डाण थांबवलं यामुळे मोठा अनर्थ टळला. हेलिकाप्टर उड्डाणापूर्वी तांत्रिक तपासणीत बिघाड लक्षात का आला नाही? याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक शिवसैनिकांनी केली. हेलिकाप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानंतर उदय सामंत यांच्या गडचिरोली दौ-याला उशिर झाला. या घटनेनंतर माध्यमांशी संवाद साधताना उदय सामंत यांनी सांगितले की, सकाळी पावणे नउ वाजता मी नागपूरवरून सूरजागडच्या प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी निघालो होतो. हेलिकाप्टर स्टार्ट केल्यानंतर टेक ऑफ घेताना हेलिकाप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे पायलटच्या लक्षात आलं. पायलटने वेळीच लक्ष दिल्याने आणि निर्णय घेतल्यामुळे आम्ही टेक ऑफच घेतला नाही. आम्ही आता बायरोड गडचिरोलीला जात आहोत.

# शालार्थ घोटाळ्यातील शिक्षणाधिकारी फरार

**नाशिक :** शालार्थ आयडी घोटाळ्यातील संशयित आरोपी तथा नाशिक जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव यांना शासनाने निलंबित केले आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यात संशय तसेच गडचिरोली येथे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी म्हणून बदली झाल्यानंतर कर्तव्यावर नियमित हजर न राहणे या कारणांमुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. शालार्थ आयडी घोटाळ्याच्या माध्यमातून शासनाची १६० कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडून या घोटाळ्याचा तपास सुरु असतानाच बच्छाव यांच्या निलंबनाचे आदेश निघाल्याने शैक्षणिक व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने बच्छाव यांना निलंबित केले आहे.

# मिशन मोडवर 100 दिवसांचे आरोग्य अभियान राबवावे

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

**■ ३० वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला ■ अभियानातून मधुमेह, ऊच्च रक्तदाब व कर्करोगाचे होणार निदान**

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील ३० वर्षांवरील सर्व महिला व पुरुषांची मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच गर्भाशय, स्तन आणि मुखाच्या कर्करोगासाठी तपासणी, निदान व उपचार करण्यासाठी १ सप्टेंबरपासून १०० दिवसांचे विशेष अभियान मिशन मोडवर राबवावे. ३० वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला असे या अभियानाचे नाव असून, तपासणीसोबतच आजाराचे लवकर निदान करून रुग्णांना वेळीच उपचाराखाली आणण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य भवन येथे अभियानाच्या नियोजनासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आयुक्त (आरोग्य सेवा) संजय काटकर, शहरी आरोग्य आयुक्त डॉ. सुनील भोकरे, संचालक डॉ. नितीन आंबाडेकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे संचालक विजय कंदेवाड तसेच सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक सहभागी झाले.



सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी सांगितले की, या अभियानांतर्गत कार्यक्रम प्रमुख, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच ग्रामीण व शहरी भागातील समुदाय वैद्यकीय अधिका-यांच्या जबाबदा-या निश्चित करून त्यांच्यामार्फत अभियानाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील आशा, एएनएम व एमपीडब्ल्यू यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्यांच्या माध्यमातून दररोज सुमारे ४० ते ४५ घरांना भेटी देउन मधुमेह, उच्च रक्तदाब व कर्करोगाची तपासणी न झालेल्या व्यक्तींची यादी तयार केली जाईल. गावनिहाय पथके तयार करून समुदाय वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक आणि आशा यांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात येईल. ३० वर्षांवरील नागरिकांमध्ये असंसर्गजन्य आजारांची तपासणी, निदान करून आजाराचे लवकर निदान झालेल्या रुग्णांना तातडीने उपचाराखाली आणण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.


संकेतांक [illegible] Samarpan Shikshan Sanstha, Nimbhari (Secondary/Higher Secondary) - With Inter-nee [illegible]
Tq.Anjangaon Surji, Dist. Amravati-444705

**समर्पण शिक्षण संस्था, निंभारी (धोटे)**

[illegible]

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात**

मान्य दिनांक २१.०७.२०२६ — प्रसिध्दी दिनांक ०५.०८.२०२६

**समर्पण शिक्षण संस्था, निंभारी (धोटे)** ता.अंजनगाव, जि.अमरावती [illegible]

[illegible]

| अ. क्र. | प्रवर्ग | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | १ | १ |
| २. | [illegible] | [illegible] | [illegible] | ० | ० | [illegible] | [illegible] | १ | १ |
| | एकूण | [illegible] | ० | ० | ० | ० | [illegible] | २ | २ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (मान्य दिनांक २१.०७.२०२६) (प्रसिध्दी दिनांक ०५.०८.२०२६)

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी | अनुदान | विषय | [illegible] | [illegible] | [illegible] | TET/CTET | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std(6-10) | Consolidated Pay - GT (18000) | Aided | Mathematics | Marathi | Graduate | Graduate | | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std(6-10) | Consolidated Pay - GT (18000) | Aided | English | -- | Graduate | Graduate | -- | 1 |
| | | | | | | | | Total | - | 2 |

[illegible]

अध्यक्ष / सचिव
समर्पण शिक्षणसंस्था (निंभारी (धोटे)
ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती



**वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस**

विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

[illegible]

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
नि.श्री.ए.डी.कटटे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

**जाहिरनामा/सायटेशन**

[illegible]

19.02.2026 [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible]



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
नि.श्री.आर.आर.खामतकर, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

[illegible]

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1. Dineshrao Rameshrao Sawarkar, Age [illegible] Yrs. Occu.: Labour
2. [illegible] Dineshrao Sawarkar, Age [illegible] Yrs. Occu.: Student
3. [illegible] Dineshrao Sawarkar, Age 15 Yrs. Occu.: Student
At [illegible] Nagar, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rupali Dineshrao Sawarkar हे दिनांक 11.10.2025 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार Dineshrao Rameshrao Sawarkar+2 यांनी [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

[illegible]

आज दिनांक १०.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

[illegible]



No.2
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Sharad Balbhim Kaldate
Jt.C.J.J.D.J.M.F.C. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (O.5, R, 1, 5)**

R.C.S.[illegible]/2019
**Raju @ Rajkumar Sheetaldas Zambani - Vs - Ravindra Narayan Bhatkar 7**
**Next Date 29.09.2026**

To,
1. Shubhe Dnyaneshwar Umbarkar, Amravati, Tq.Dist.Amravati (Maharashtra)
2. Nikesh Ramesh Suryawanshi
New Hanuman Nagar, Amravati.

Whereas **Raju @ Rajkumar Sheetaldas Zambani** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the 29.09.2026 at 11.00 o'clock in the forenoon, to answer the claim and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set off or counter claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice, that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 16.07.2026

**Jt.C.J.J.D. J.M.F.C. Amravati**

**Notice :** 1. Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, you can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.
2. If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property or both.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## शहाणपणाची सावधगिरी

ताज्या पतधोरण आढावा बैठकीनंतर गृहकर्ज, वाहनकर्ज ना किंवा उद्योग कर्जावरील व्याजदर सध्या स्थिर राहण्याची शक्यता आधीच स्पष्ट झाली आहे.'ईएमआय' मध्ये तातडीने कोणताही बदल होणार नाही. काही ग्राहकांना व्याजदरकपातीची अपेक्षा होती; परंतु त्यांना आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागेल. दुसरीकडे,ठेवीदारांसाठी हा निर्णय सकारात्मक मानला जाऊ शकतो. कारण ठेवींवरील व्याजदर उच्च पातळीवर टिकून राहण्याची शक्यता आहे.उद्योग क्षेत्रासाठीही हा निर्णय संतुलित आहे. व्याजदर वाढले नसल्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही. त्याच वेळी महागाई नियंत्रणात राहिल्यास कच्चा माल आणि उत्पादन खर्चावरही नियंत्रण राहू शकते.परिणामी, उद्योगांना दीर्घकालीन नियोजनासाठी अनुकूल वातावरण मिळेल. शेअर बाजाराच्या दृष्टीने पाहिल्यास गुंतवणूकदारांना अपेक्षित असलेली व्याजदरकपात न झाल्याने अल्पकालीन निराशा निर्माण होऊ शकते; मात्र स्थिर व्याजदर आणि स्थिर आर्थिक धोरण दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी अधिक विश्वासार्ह मानले जाते.परदेशी गुंतवणूकदारही अशा स्थिर धोरणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतात. महागाईवर कठोर नजर, विकासाला सातत्यपूर्ण पाठबळ, वित्तीय स्थैर्याला सर्वोच्च प्राधान्य आणि परिस्थितीनुसार त्वरित निर्णय घेण्याची तयारी हेच धोरण आगामी काळात भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक आव्हानांमध्येही सक्षमपणे पुढे नेण्यास मदत करेल. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने रेपो दर ५.२५ टक्कयांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय बाजाराच्या अपेक्षेप्रमाणे असला,तरी त्यामागील संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. महागाई नियंत्रणात येत असताना आर्थिक विकासालाही चालना मिळावी आणि जागतिक अस्थिरतेचा भारतावर कमीत कमी परिणाम व्हावा, यासाठी रिझर्व्ह बँकेने 'सावध आशावाद' स्वीकारला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कोरोनानंतरची आर्थिक पुनबांधणी, रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार, जागतिक व्यापारातील अनिश्चितता आणि अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह' च्या व्याजदर धोरणामुळे जगभरातील मध्यवर्ती बँकांना अत्यंत संतुलित भूमिका घ्यावी लागली आहे. भारताची रिझर्व्ह बँकही त्याला अपवाद नाही. पतधोरणातील व्याजदर 'जैसे थे' ठेवायचा निर्णय हा महागाई पूर्णपणे नियंत्रणात आल्याचा किंवा व्याजदरकपातीचे चक्र तातडीने सुरू होणार असल्याचा संकेत नाही. उलट, अर्थव्यवस्थेतील सकारात्मक घडामोडी कायम ठेवण्यासाठी कोणतीही घाई न करण्याचा हा निर्णय आहे. महागाईचा दर काही महिन्यांपासून समाधानकारक पातळीवर असला,तरी अन्नधान्याचे दर, हवामानातील बदल, जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळे हे धोके अद्याप कायम आहेत. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्याचा मार्ग निवडला आहे. भारताची अर्थव्यवस्था सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र, डिजिटल अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, निर्यात आणि देशांतर्गत मागणी या सर्वच घटकांमध्ये सकारात्मक वातावरण दिसत आहे.सरकारी भांडवली खर्चामुळे रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळत आहे. अशा परिस्थितीत अचानक व्याजदर कमी केल्यास महागाई पुन्हा डोके वर काढू शकते. त्यामुळे विकास आणि किंमत स्थैर्य यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून येतो. जागतिक परिस्थिती मात्र अजूनही चिंताजनक आहे.पश्चिम आशियातील तणाव,रशिया-युक्रेन संघर्ष, समुद्री व्यापारमार्गावरील अडथळे आणि कच्च्या तेलाच्या किमतीतील अस्थिरता यामुळे आयात करणाऱ्या भारतासारख्या देशांसाठी धोका कायम आहे. भारताच्या इंधन आयातीचा खर्च वाढल्यास त्याचा थेट परिणाम महागाईवर होऊ शकतो. त्याचबरोबर विकसित देशांमधील व्याजदर धोरणातील बदलांचा परकीय गुंतवणुकीवर परिणाम होतो. त्यामुळे भारताने आर्थिक स्थैर्य टिकवणे अत्यंत आवश्यक आहे. मल्होत्रा यांनी पतधोरण जाहीर करताना महागाई नियंत्रणात असली, तरी आत्मसंतुष्ट होण्याचे कारण नसल्याचे स्पष्ट केले. किंमत स्थैर्य हे शाश्वत आर्थिक विकासाचे मूलभूत तत्त्व असल्याचे त्यांनी पुन्हा अधोरेखित केले. देशांतर्गत मागणी मजबूत असूनही जागतिक अनिश्चिततेमुळे धोरणात्मक संयम आवश्यक असल्याचे त्यांनी सूचित केले.अर्थव्यवस्थेची गती कायम ठेवताना महागाईवर बारीक नजर ठेवली जाईल,असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम कर्जदार आणि बचतदार या दोन्ही वर्गावर होणार आहे. गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा उद्योगांसाठीचे कर्ज घेतलेल्या ग्राहकांना सध्या 'ईएमआय' मध्ये कोणताही बदल होणार नाही. दुसरीकडे, बँकांच्या ठेवींवरील व्याजदरातही मोठा बदल अपेक्षित नाही. उद्योगक्षेत्रालाही स्थिर व्याजदरामुळे भविष्यातील गुंतवणुकीचे नियोजन करणे सोपे जाईल. आर्थिक धोरणातील सातत्य ही गुंतवणूकदारांसाठी सकारात्मक बाब मानली जाते. शेअर बाजारानेही या निर्णयाकडे स्थैर्याच्या दृष्टीने पाहिले आहे. गुंतवणूकदारांना धोरणातील स्पष्टतेचे सर्वाधिक महत्त्व असते. व्याजदरात अनपेक्षित बदल न झाल्याने आर्थिक धोरणाविषयीचा विश्वास कायम राहिला. परकीय गुंतवणूकदारांसाठीही भारतातील आर्थिक व्यवस्थापन सक्षम असल्याचा संदेश यातून गेला आहे; मात्र व्याजदर स्थिर ठेवणे म्हणजे सर्व आर्थिक प्रश्न सुटले असे नाही.देशात अजूनही ग्रामीण मागणीला अपेक्षित गती मिळालेली नाही. कृषी क्षेत्र हवामानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. अनियमित पाऊस,नैसर्गिक आपत्ती किंवा अन्नधान्य उत्पादनातील घट यांचा परिणाम महागाईवर होऊ शकतो तसेच जागतिक व्यापारातील मंदीमुळे निर्यातीवर दबाव निर्माण होण्याची शक्यता कायम आहे. त्यामुळे सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्यातील समन्वय अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची ताकद ही केवळ वेगवान विकासदरात नाही, तर संकटाच्या काळातही स्थैर्य राखण्याच्या क्षमतेत आहे. हीच क्षमता टिकवण्यासाठी चलनविषयक धोरण विश्वासार्ह, पारदर्शक आणि संतुलित असणे आवश्यक आहे.पतधोरण समितीचा ताजा निर्णय हे याच दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणता येईल.

# जंतर-मंतर ते झारखंड



**पेपरफुटी, परीक्षांतील गैरव्यवहार आणि बेरोजगारीने देशातील 'जेन झी'च्या संयमाचा बांध फुटला आहे. विद्यार्थ्यांच्या या असंतोषाला राजकीय रंग देण्याऐवजी सरकारने परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे.**

स्पर्धा परीक्षांच्या वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांनंतर विद्यार्थ्यांमध्ये मोठा संताप प्रकटला. स्पर्धा परीक्षांमधील भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराबद्दल सरकारला जाब विचारण्यासाठी विद्यार्थी रस्त्यावर आले. नीट परीक्षेच्या पेपर फुटीनंतर दिल्लीत जंतर-मंतरवर 'जेन झी'ने केलेल्या आंदोलनाने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले. पाटणा, मुंबई, पुणे, देशातील विविध शहरांत जेन झी रस्त्यावर उतरले. दिल्लीत संसद भवनाकडे जाणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी निर्घृण लाठीमार केला. पॅलेट गन्समधून गोळीबार केला. धुमश्चक्रीत दगडफेक झाली. पोलिसांसह अडीचशे जखमी झाले. पाटण्यात विद्यार्थी आंदोलकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी पाण्याचे फवारे मारले, लाठीमार केला व नंतर एके-४७ मधून गोळीबार केला. झारखंडची राजधानी रांची येथे जयपालसिंग मुंडा स्टेडियममध्ये विद्यार्थ्यांनी नऊ दिवस उपोषण, आंदोलन केले. परीक्षा व भरतीमधील घोटाळयांची चौकशी 'सीबीआय'कडे सोपवावी, या मागणीसाठी विधानसभेच्या दिशेने घुसणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी अगोदर पाण्याचे फवारे मारले नंतर लाठीमार केला. देशभर पेपरफुटी, परीक्षांचे व्यवस्थापन, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, याविषयी 'जेन झी'मध्ये असंतोष खदखदत आहे.

सरकार कुणाचेही असो, राज्यकर्त्यांनी केवळ गोड बोलून, कुणालाही सोडणार नाही, अशी आश्वासने देऊन, विकासाची स्वप्ने दाखवून किंवा उज्ज्वल भविष्यासाठी मधाचे बोट लावून जेन झी शांत बसणार नाही. एक तर सध्याच्या परीक्षा व्यवस्थेविषयी जेन झीला उबग आला आहे. स्पर्धा परीक्षांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या पक्षाचे सरकार असते, त्यांचे सगेसोयरे सर्वत्र नेमलेले असतात म्हणून व्यवस्था पोखरली जाते आहे. स्पर्धा परीक्षांसाठी अहोरात्र अभ्यास करून, भविष्याचा चुराडा होणार असेल, तर नव्या पिढीने विश्वास ठेवायचा तरी कोणावर? दोन दोन-चार चार पदव्या मिळवूनही नोकऱ्या मिळत नसतील, तर तरुण पिढीने जायचे कुठे?

दरवर्षी दोन कोटी रोजगाराची स्वप्ने दाखवली गेली. प्रत्यक्षात नोकऱ्या कमी होत आहेत. सरकारी नोकरीत भरती नाही, खासगीत नोकऱ्या कमी आहेत. जी भरती होते ती सर्व कंत्राटी पद्धतीने होते. कायमची सरकारी नोकरी हे तर दिवास्वप्न राहिले आहे. राज्याराज्यांत सुशिक्षित बेरोजगारांची फौज लक्षावधींच्या संख्येने सोशल मीडियावर अहोरात्र जागी आहे. नैराश्येने पछाडलेले जेन झी व्यक्त होण्यासाठी झुरळांच्या मोर्चाकडे धावताना दिसत आहे. देशातील जेन झीला कोणी वाली नाही, त्यांना समजावून घेणारे कोणी नाही. नेत्यांची भाषणे ऐकायची व त्यांना सुखावणाऱ्या घोषणा द्यायच्या यातून काही निर्माण होत नाही.

जंतर-मंतर ते झारखंड झालेल्या आंदोलनांचे सत्ताधारी व विरोधी पक्षांनी आक्रमक पद्धतीने राजकारण करण्याचा कसा प्रयत्न केला, हे सर्व देशाने पाहिले आहे. जेन झी आंदोलनाचा लाभ उठविण्यासाठी राजकीय पक्षांनी एकमेकांवर चिखलफेक कशी चालवली, हे गेल्या दोन महिन्यांत दिसून आले. आंदोलनानंतर परीक्षा रद्द झाल्या, काही जणांना अटक झाली, शिक्षण मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. विद्यार्थ्यांच्या पदरात काय पडले? गेल्या दहा वर्षांत १५२ स्पर्धात्मक परीक्षांचे पेपर फुटले, त्यात एकाला तरी शिक्षा झाली का? गेल्या दहा वर्षांत पेपर फुटीबद्दल कोणी एकतरी जेलमध्ये गेलाय का? मग जंतर-मंतर किंवा रांचीमधील आंदोलनाने विद्यार्थ्यांच्या हातात काय पडणार आहे? दर्जेदार शिक्षण, पारदर्शक परीक्षा पद्धती आणि सुरक्षित नोकरी मिळणार नसेल, तर जेन झीमधील खदखद वाढत जाईल आणि पोलिस व जेन झी यांच्यातील संघर्ष असाच चालू राहील.

जंतर-मंतरवर कोणाताही राजकीय पक्ष आपले झेंडे घेऊन सामील झाला नव्हता. कोणत्याही राजकीय पक्षांची संघटना आपले बॅनर्स घेऊन दिल्लीत आंदोलनात उतरली नव्हती. दिल्ली पोलिस व नीट परीक्षा हे दोन्ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात. म्हणून मोदी सरकार आंदोलनाचे टार्गेट होते. केंद्रीय शिक्षणमंत्री यांचा राजीनामा ही प्रमुख मागणी होती. लाठीमार व गोळीबारानंतर केंद्रीय गृहमंत्री हे राजकीय पक्षांचे हल्ल्याचे टार्गेट बनले. दिल्लीतील आंदोलनात भाजप बचावात्मक होती. तर काँग्रेस-आप आक्रमक दिसले. रांचीमधील आंदोलनात काँग्रेस बचावात्मक दिसली, तर भाजप आक्रमक दिसला. कारण, झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचा मुख्यमंत्री आहे व त्यांच्या सरकारला काँग्रेसचे समर्थन आहे. दिल्लीत जेन झीच्या मागणीनुसार शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला; पण विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांना गोळीबाराचे आदेश कोणी दिले, असा प्रश्न विचारून काँग्रेसने वातावरण तप्त ठेवले. तीन आठवडे संसदेचे कामकाज झाले नाही. झारखंडमध्ये हेमंत सोरेन सरकारने परीक्षा रद्द करण्यासह आंदोलकांच्या प्रमुख मागण्या मान्य केल्या; पण पेपरफुटीची व भरती घोटाळ्याची चौकशी 'सीबीआय'कडे सोपवावी, या मागणीवरून आंदोलनाची धार कायम ठेवण्याचा प्रयत्न झाला.

सोरेन सरकारने चौकशी 'सीआयडी'कडे दिली आहे; पण आंदोलकांचा त्यावर विश्वास नाही. सोरेन सरकार चौकशी 'सीबीआय'कडे म्हणजे केंद्राकडे सोपवयाला तयार नाही, म्हणून तिथे पेच निर्माण झाला आहे. झारखंडच्या आंदोलनात भाजपचे कार्यकर्ते पक्षाचे झेंडे घेऊन उघडपणे सहभागी झालेले दिसले. दिल्लीत जेन झीचा 'चलो संसद' मोर्चा निघाला तेव्हा जे. पी. नड्डा व त्यांचे सहकारी अशा दोन केंद्रीय मंत्र्यांनी कॉक्रोच जनता पार्टीच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी निमंत्रण दिले. रांचीत हेमंत सोरेन सरकारने आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी चार मंत्र्यांवर जबाबदारी सोपवली होती. केंद्रात शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा झाला. रांचीत सन २०२३ व २०२५ च्या झारखंड पब्लिक सर्व्हिस कमिशन व झारखंड स्टाफ सिलेक्शन बोर्डाने घेतलेल्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. तसेच, चौकशीचे काम 'ईडी' व 'सीआयडी'कडे सोपविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. निवृत्त न्यायाधीशांकडून परीक्षांतील गैरप्रकारांची चौकशी करण्याचेही सोरेन सरकारने मान्य केले.

संसद अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसात काँग्रेस व भाजपचे खासदार संसद भवन परिसरात एकमेकांच्या समोर येऊन घोषणा देताना दिसले. काँग्रेसकडून 'अमित शहा माफी मांगो', तर भाजपकडून 'राहुल गांधी माफी मांगो', असे घोषणायुद्ध बघायला मिळाले. झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक शिबू सोरेन यांचे फोटो हातात घेऊन रांचीमध्ये आंदोलक त्यांचे पुत्र असलेल्या मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्याविरोधात घोषणा देताना दिसले. झारखंड स्वतंत्र राज्य व्हावे, यासाठी शिबू सोरेन यांनी १९८० पासून लढा दिला होता. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना सन २००० मध्ये बिहारमधून प्रदेश वेगळा करून झारखंड राज्याची निर्मिती झाली. याच राज्यात वडिलांचे फोटो हातात घेऊन त्यांच्या मुख्यमंत्री पुत्राविरोधात पेपर फुटीवरून आंदोलन पेटले आहे.

**डॉ. सुकृत खांडेकर**

# आंदोलने, सरकार आणि आपण

आपल्या मागण्यांसाठी शांततामय मार्गाने आंदोलन करणे हा आपल्या राज्यघटनेनी आपल्याला दिलेला हक्क आहे. ज्यांना स्वतःच्या आयुष्याशी निगडित कोणताही प्रश्न भेडसावत असतो, अशा व्यक्ती रस्त्यावर उतरून आंदोलन करू शकतात ही आपल्या लोकशाहीने आपल्याला दिलेली ताकद आहे.असे आंदोलन करणाऱ्या कोणाही व्यक्ती वा समूहाला सामोरे जाणे, त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांना भेडसावणारे प्रश्न समजावून घेणे आणि ते सोडवण्याचा प्रयत्न करणे हे लोकनियुक्त सरकारचे कर्तव्य आहे. हे करण्याऐवजी आंदोलने दडपून टाकणे, आंदोलकांवर अश्रुधूर सोडणे, लाठीमार करणे, पेलेट गन्सचा मारा करणे हे चूक आहे. ही दडपशाही आहे. लोकनियुक्त सरकारने ही कधीही करता कामा नये.



हे लोकनियुक्त सरकार आपल्या आवडत्या पक्षाचे असले तरीही, नावडत्या पक्षाचे असले तरीही. कोणत्याही पक्षाच्या लोकनियुक्त सरकारने घटनात्मक चौकटीत राहून केलेली आंदोलने दडपशाही करून चिरडता कामा नयेत. आंदोलकांशी संवाद साधूनच ती सोडवली पाहिजेत.अर्थात, ह्याला दुसरी बाजू आहेच. काही आंदोलने हिंसक होतात, जाळपोळ होते, आणि त्यात कोणाशीही संबंध नसलेल्या सर्वसामान्य माणसांचे नुकसान होते. अशा वेळी कायदा आणि सुव्यवस्था राखणे हे सरकारचे कामच आहे.

पण मुद्दा नेमका इथेच येतो. आंदोलन शांततामय होते की हिंसक, हे ठरवणार कोण? ज्यांना लाठीमार करायचा आहे तेच जर हे ठरवणार असतील, तर काहीही ठरवता येते. आणि आपल्याला नावडते ते आंदोलन 'हिंसकच होतं' म्हणून सोडून देणे आपल्यालाही फार सोपे जाते.म्हणजे असे बघा की जंतरमंतरवरचे आंदोलन चिरडूनच टाकायला हवे होते असे वाटणे पण झारखंडमधले आंदोलन योग्यच होते असे वाटणे. किंवा ह्याच्या उलट वाटणे! हे सगळे आपल्या मनाचे, आपल्या राजकीय निष्ठांचे खेळ असतात!राहता राहतो प्रश्न आपल्यासारख्या सर्वसामान्य नागरिकांचा. आपण आंदोलकही नसतो आणि सरकारही. मग आपण काय करावे?

जिथे आपल्या आवडत्या पक्षाच्या सरकारविरुद्ध आंदोलन होत आहे तिथे आपण आंदोलकांना मारा-झोडा-चिरडा म्हणत असू, आणि जिथे आपल्या नावडत्या पक्षाच्या सरकारविरुद्ध आंदोलन होत आहे तिथे आपण आंदोलकांना आंदोलन करायचा हक्कच आहे, त्यांना मारणे-झोडणे चुकीचे आहे म्हणत असू तर आपण आपला मेंदू आणि राजकीय निष्ठा तपासून बघणे गरजेचे आहे.

एका ठिकाणी चूक असलेली गोष्ट दुसऱ्या ठिकाणी योग्य असू शकत नाही. आणि आपण बोटावरली थुंकी बदलल्यासारखे चुकीला बरोबर आणि बरोबरला चूक ठरवत असू तर प्रॉब्लेम आपल्यात आहे.कोणतीही बाजू घ्यायचीच असेल, तर भारतीय राज्यघटनेची, मूलभूत मानवी अधिकारांची आणि आपल्या सद्सद्विवेकबुद्धीची बाजू घ्यावी.आणि अशी बाजू घेणे जमले, की हा देश कोणा एका पक्षाचा नाही, तो आपला सगळ्यांचा आहे हे राहत इंदोरींच्या शब्दांत बेधडकपणे म्हणता येते..

सभी का खून शामिल है
यहां की मिट्टी में
किसी के बाप का हिंदोस्तां
थोड़ी है

**- प्रसाद शिरगावकर**

# 'युपीआय' अत्यावश्यक असणारे पायाभूत सुविधा क्षेत्र

युपीआय सशुल्क करण्याच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावाकडे बघण्याचा दृष्टिकोन perspective अधिक महत्त्वाचा!युपीआय वरील शुल्क २००० रुपयांपर्यंतच्या व्यवहारांवर लागणार नाही;ते शुल्क ज्याला एम डी आर म्हणतात खूप कमी असेल; ते फक्त विक्रेत्या व्यापारांवर लागेल.आदी बाबी सार्वजनिक व्यासपीठांवर चर्चिल्या जात आहेत. पण या प्रश्नाच्या डिटेल्स मध्ये जाण्याआधी, त्यात अनुस्यूत असणाऱ्या तत्वांवर साधक बाधक चर्चा होण्याची गरज आहे. युपीआयची राजकीय अर्थव्यवस्था समजून घेण्याची गरज आहे. सध्या यूपीआय निशुल्क आहे.त्यामुळे त्यातून काहीही रेव्हेन्यू आणि म्हणून नफा मिळत नाही. पण त्यावर खर्च तर होत आहे. असे किती काळ चालणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तो प्रश्न बरोबर आहे , पण त्यासाठी त्यावर शुल्क लावले पाहिजे हे सांगितले जात असणारे उत्तर बरोबर नाही का? उत्तर दृष्टिकोनावर अवलंबून असेल.

तुम्ही There is nothing like Free Lunch वाले असाल तर..(बड्या कॉर्पोरेटच्या घशात, बँकांच्या थकीत कर्जात किती दशलक्ष कोटी Free Lunch म्हणून दिले याबद्दल देखील तुम्ही विचार केला असेल असे गृहीत धरतो). युपीआय कडे एखाद्या रिंग फेन्स्ड कॉर्पोरेटने पुरवलेली सेवा म्हणून बघता कामा नये. ज्या कोर्पोरेटवर दर तिमाहीला/ वर्षाला किती नफा किंवा तोटा झाला हे जाहीर करण्याचे दडपण असते. तिला ते जाहीर करावे लागते कारण तिने उत्पादित केलेल्या वस्तुमाल/सेवांवर तीच खर्च करते आणि त्यातून मिळालेला नफा/तोटा फक्त आणि फक्त तिच्याच मालकीचा असतो.युपीआय कडे पब्लिक गुड म्हणून बघावयास हवे. त्याचा अर्थ असा की त्यातून तयार होणारे लाभ विविध प्रकारचे, जे खर्च करतात त्यांच्या पलीकडे व्यापक जनसमुदायाला मिळणारे आणि दीर्घकालीन असतात. अनेक लाभ रुपयात मोजले जाऊ शकत नाहीत. युपीआय प्रणालीत सामील झालेल्या बँकांना खर्च येतो पण युपीआय प्रणालीमुळे त्यांचे अनेक फायदे देखील झालेले आहेत.उदा. कॅश डिपार्टमेंट, अकाऊंट ठेवणे यावरचा त्यांचा मोठा खर्च कमी झाला, भविष्यात अजून होऊ शकतो. एटीएमची संख्या कमी होऊ लागल्याचे रिपोर्ट आहेत.युपीआय मुळे कॅश बँकिंग प्रणालीतच राहते. बाहेर जात नाही. ही खूप मोठी उपलब्धी आहे. यातून बँकिंग प्रणालीकडे सेविंग अकाऊंट मध्ये असणाऱ्या पैशाच्या प्रमाणात (CASA) वाढ होऊ शकते. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कॉस्ट ऑफ फंड कमी होण्यात पडू शकते. NPCI तर नॉन प्रॉफिट कंपनी आहे. ती सार्वजनिक मालकीची आहे. त्यामुळे त्या कॉर्पोरेशनला केंद्रीय अर्थसंकल्पातून तरतुदी सुरूच राहू शकतात.युपीआय प्रणालीत सक्रिय असणाऱ्या इतर एजन्सीसाठी पर्याप्त परतावा मिळण्यासाठी विविध प्रकारे प्रोत्साहन योजना केंद्र सरकार मार्फत तयार केल्या जाऊ शकतात. जशा इतर क्षेत्रांसाठी आहेत. युपीआय मुळे वित्तीय समावेशीकरणाच्या/Financial Inclusion प्रक्रियेला चालना मिळाली,इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर मुळे पारदर्शीपणा येण्यास मदत झाली , अनौपचारिक क्षेत्राचे औपचारिकीकरण होण्यास मदत झाली आहे. त्याचे सामाजिक , आर्थिक रिटर्न्स खूप मोठे आहेत अनौपचारिक क्षेत्रातील सूक्ष्म / छोट्या प्रमाणावर उद्योग / व्यवसाय सेवा करणाऱ्या व्यक्ती / कुटुंबाना कॅश घेणे , परत देणे , ती मोजणे , ती सांभाळणे. खर्च करताना पुन्हा एकदा त्याच सायकल मधून जाणे छयातून मोठ्या प्रमाणात सुटका झाली. त्यांची वाचलेली मानसिक ऊर्जा , वेळ यातून त्यांची उत्पदकता वाढली.याचे प्रत्यक्ष लाभार्थी ती व्यक्ती / कुटुंब आहेतच पण ज्यावेळी कोटयावधी व्यक्ती / कुटुंबांची उत्पादकता वाढते त्यावेळी संपूर्ण अर्थव्यवस्थेला त्याचा लाभ होत असतो.युपीएयाय मधून तयार होणारा महाकाय डिजिटल डेटा तर अजून एक महत्वाचे कारण आहे.

युपीआय कडे देशाच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेच्या आधुनिकीकरणासाठी अत्यावश्यक असणारे पायाभूत सुविधा क्षेत्र म्हणून बघण्याची गरज आहे.सर्वच प्रकारच्या पायाभूत सुविधा क्षेत्रात केल्या जाणाऱ्या गुंतवणुकीवर मिळणारा परतावा फायनान्शियल स्वरुपातच असला पाहिजे, तो मार्केट लिंकड असला पाहिजे, तो परतावा मिळवण्यासाठी त्या सेवांच्या लाभार्थ्यांकडून त्याची रिकव्हरी करत सेवा शुल्क आकारले गेले पाहिजे हा आग्रह चुकीचा आहे. (तेल कंपन्या, फूड कॉर्पोरेशन, संरक्षण सिद्धता अगणित उदाहरणे आहेत जेथे नफा तोट्याच्या पलिकडचे बघितले जाते). त्याचे साधे कारण असे आहे की या क्षेत्राकडून नॉन फायनान्शियल स्वरूपात सामाजिक, आर्थिक रिटर्न मोठ्या प्रमाणावर मिळत असतात. युपीआय मधून मिळणारे सामाजिक, आर्थिक रिटर्न देखील तगडे आहेत. ते अजून वाढणार आहेत.या व अशा विविध आयमांवर सार्वजनिक चर्चा झाल्या ते सध्या निःशुल्क असणाऱ्या यूपीआय सेवेवर भविष्यात शुल्क आकारायचे का नाही याबद्दलच्या चर्चांना एक अर्थपूर्ण फ्रेम मिळेल.त्यातून डिजिटल पेमेंट सेवा निशूल्कच दिली जावी , ती सार्वजनिक स्रोतातून दिली जावी या प्रतिपादनाला पुष्टी मिळेल.

**संजीव चांदोरकर**

शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# विद्यार्थ्यांसाठीची वसतिगृहेच बनली धोकादायक..!

## २३ शासकीय वसतिगृहांची दयनीय अवस्था,जीर्ण इमारती,अपुऱ्या सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १३ : मागासवर्गीय, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सुरक्षित निवास मिळावा, या उद्देशाने सुरू करण्यात आलेली यवतमाळ जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहेच आता समस्यांच्या विळख्यात सापडली आहेत. जीर्ण इमारती, गळकी छते, अपुरी स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, अस्वच्छ परिसर आणि क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा भार यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.**



उपलब्ध अधिकृत माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण २३ शासकीय वसतिगृहे आहेत. त्यापैकी आदिवासी विकास विभागाची १९, तर समाजकल्याण विभागाची ४ वसतिगृहे आहेत. पांढरकवडा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत ९ तालुक्यांमध्ये १९ वसतिगृहे आणि १८ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. या आश्रमशाळांमध्ये तब्बल ४,०७८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दरम्यान, राज्यातील शासकीय व अनुदानित वसतिगृहांची तपासणी करताना नियंत्रक व महालेखापरीक्षकांच्या (CAG) अहवालातही मूलभूत सुविधांचा अभाव, इमारतींची दुरवस्था, भोजन व स्वच्छतेतील त्रुटी, सुरक्षा व्यवस्थेतील कमतरता आणि काही अनुदानित वसतिगृहांतील आर्थिक अनियमितता अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे यवतमाळातील वसतिगृहांची स्थितीही गांभीर्याने तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षणासाठी घरापासून दूर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज वातावरण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र, वसतिगृहांचीच दुरवस्था कायम राहणार असेल तर 'शिक्षणासाठी निवास की समस्यांचा कोंडवाडा?' असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. शासनाने तातडीने सर्व वसतिगृहांचे सुरक्षा व बांधकाम ऑडिट करून दुरुस्ती, स्वच्छता, पाणी आणि आवश्यक सुविधांची पूर्तता करावी, अशी मागणी होत आहे.

# आदिवासींना 'वनवासी' म्हणणे संयुक्त राष्ट्रांच्या हक्कांचा भंग..!

## यवतमाळात जागतिक आदिवासी दिन उत्साहात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १३ :** आदिवासी जागतिक दिवस हा केवळ उत्सवाचा दिवस नसून आदिवासींचे मानवाधिकार व मानवी अस्तित्व बहाल करणारा जागतिक दिवस आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. वसंत कनाके यांनी केले. यवतमाळ शहरात ९ ऑगस्ट रोजी आयोजित आदिवासी जागतिक दिन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. संयुक्त राष्ट्र संघाने आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या हक्कांसाठी घोषणा केली. व्यक्तीगत व सामूहिक स्वातंत्र्य, भेदभावापासून मुक्ती, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक विकास तसेच स्वयंशासनाचे अधिकार आदिवासींना मिळाले आहेत. हे अधिकार मिळविण्यासाठी जगभरातील आदिवासींनी प्रदीर्घ संघर्ष केला. मात्र भारत सरकार आदिवासींना मूळनिवासी मानण्यास अद्याप तयार नसल्याची खंत कनाके यांनी व्यक्त केली. काही मंत्री आदिवासींना 'वनवासी' म्हणून संबोधतात, हा संयुक्त राष्ट्रांच्या हक्कांचा भंग नाही का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी गीत घोष, डी. डी. अंभोरे, प्रल्हाद सिडाम, किसन वाघमारे यांनी आदिवासींचे हक्क, धर्मकोड, जल-जंगल-जमीन आणि सांस्कृतिक ओळख यावर भाष्य केले. सकाळी रॅली, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम व सत्कार समारंभ झाला. कार्यक्रमाचे नियोजन विविध पदाधिकाऱ्यांनी केले. प्रास्ताविक शैलेश गाडेकर, संचालन किरण अनाके यांनी तर आभार जीवन कोवे यांनी मानले.

# दलित वस्तीच्या नालीचे बांधकाम वादात, माजी उपसरपंचांचा गंभीर आरोप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १३ :** दिग्रस तालुक्यातील फेट्री येथील दलित वस्तीमधील मंजूर नालीच्या बांधकामावरून ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी आवश्यक परवानगी व प्रक्रिया न पाळता नालीचे बांधकाम सुरू केल्याचा गंभीर आरोप माजी उपसरपंच रमेश लोभा राठोड यांनी केला आहे.

या प्रकरणाची तातडीने चौकशी करून बांधकामाला स्थगिती देण्याची मागणी त्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती दिग्रस यांच्याकडे ११ ऑगस्ट रोजी दिलेल्या तक्रार अर्जातून केली आहे. राठोड यांच्या तक्रारीनुसार, फेट्री येथील दलित वस्तीतील नालीचे बांधकाम मंजूर असले तरी प्रत्यक्ष काम सुरू करताना आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आणि परवानगीचे पालन करण्यात आलेले नाही. संबंधित काम नियमाप्रमाणे होत नसल्याचा त्यांचा दावा आहे. विशेष म्हणजे, पंचायत समिती कार्यालय तसेच ग्रामपंचायत अधिकारी व सचिव यांनी काम बंद करण्यास सांगितल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही सरपंचांकडून काम सुरूच ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. नियम व प्रक्रियेला बगल देऊन मनमानी पद्धतीने काम केल्यास शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होण्याची शक्यता असल्याचे राठोड यांनी तक्रारीत म्हटले आहे. ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता राखण्याऐवजी मनमानी पद्धतीने काम सुरू असल्याने गावात असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचा दावाही त्यांनी केला आहे.



या संपूर्ण प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून मंजूर अंदाजपत्रक, कामाची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, कामाची मोजमाप पुस्तिका तसेच प्रत्यक्ष बांधकामाची गुणवत्ता तपासावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित नालीचे बांधकाम तातडीने थांबवावे, अशीही मागणी तक्रारदाराने केली आहे. प्रशासनाने या तक्रारीची दखल घेऊन तातडीने कारवाई न केल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा रमेश राठोड यांनी दिला आहे. आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित सरपंच व प्रशासनाची राहील, असेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. या तक्रारीच्या प्रती मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ यांना देण्यात आल्या आहेत.

# उमरखेड वन विभागाला संजीवनी..!

## जीर्ण कार्यालये अन् निवासस्थानांच्या बांधकामाला गती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड , दि. १३ :** उमरखेड शहरातील जीर्णावस्थेत असलेल्या वन विभागाच्या कार्यालये व कर्मचारी निवासस्थानांचा प्रश्न अखेर मार्गी लागण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. आमदार इंजि. किसनराव वानखेडे यांच्या मागणीवरून वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत बुधवारी (ता. १२) मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत नवीन अद्ययावत वन प्रशासकीय संकुल व कर्मचारी निवासस्थानांच्या बांधकामाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील उपविभागीय वन अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्रपाल व वन्यजीव विभागाची कार्यालये तसेच कर्मचाऱ्यांची निवासस्थाने मोठ्या प्रमाणात जीर्ण झाली आहेत. पावसाळ्यात या परिसरात पाणी साचत असल्याने



अधिकारी-कर्मचाऱ्यांना धोकादायक परिस्थितीचा सामना करावा लागत होता. आमदार वानखेडे यांनी बैठकीत हा प्रश्न प्रभावीपणे मांडला. या जागेवरील नगरविकास विभागाच्या विकास आराखड्यातील व्यापारी संकुलाच्या आरक्षणाचा अडसरही तातडीने दूर करण्याचे निर्देश अपर मुख्य सचिवांना देण्यात आले. न्यायालयाने जागेचा मालकी हक्क शासनाच्या बाजूने दिल्याने संबंधित विभागांशी समन्वय साधून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. दरम्यान, मरसूळ येथील प्रस्तावित इकोटुरिझम प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तातडीने तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. वन विभागाच्या प्रलंबित कामांवर सात दिवसांत प्रत्यक्ष कार्यवाही करून इतिवृत्त सादर करण्याचे आदेश देण्यात आल्याने या निर्णयाकडे उमरखेडकरांचे लक्ष लागले आहे. वन विभागाच्या इमारतींचा प्रश्न आणि मरसूळ इकोटुरिझम प्रकल्पासाठी वनमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला, असे आमदार किसनराव वानखेडे यांनी सांगितले.

# मांडवा जंगलातील खून प्रकरणाचा छडा..!

## पैशांसाठी महिलेचा निर्घृण खून, आरोपी गजाआड, हत्यार, मोबाईलसह साहित्य जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १३ :** मांडवा जंगलात १० जून रोजी झालेल्या महिलेच्या निर्घृण खूनप्रकरणाचा पुसद ग्रामीण पोलिसांनी छडा लावला असून, प्रेमदास लखु आडे (४५, रा. नारळी, ता. उमरखेड) याला अटक केली आहे. अलका सुखदेव सोयाम (४०, रा. वसंतनगर, पुसद) अशी मृत महिलेची ओळख पटली आहे. पैशांच्या कारणातून दगडाने ठेचून व वस्तऱ्याच्या पात्याने गळा कापून खून केल्याची कबुली आरोपीने दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

१० जून रोजी मांडवा जंगलात अनोळखी महिलेचा मृतदेह आढळल्यानंतर पुसद ग्रामीण पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मृत महिलेची ओळख आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी दहा पथके तयार केली. तपासादरम्यान परिसरातील तब्बल १५० ते



२०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या चित्रफिती तपासण्यात आल्या. घटनेच्या दिवशी अलका सोयाम या भगवा फेटा बांधलेल्या व लांब दाढी असलेल्या व्यक्तीसोबत बोलताना तसेच त्याच्या दुचाकीवरून जाताना दिसून आल्या. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या व्यक्तीचा शोध घेतला असता तो प्रेमदास आडे असल्याचे निष्पन्न झाले. नारळी शिवारात सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले. कसोशीने चौकशी केल्यानंतर त्याने खुनाची कबुली दिल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार, मृत महिलेचा मोबाईल आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले. त्याच्यावर यापूर्वीही खून व चोरीसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# अवैध रेतीसाठ्या वरून जिल्हाधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस- बोरेले आक्रमक

## रेती चोरी अथवा अवैध वाहतूक झाल्यास प्रशासनाची जबाबदारी निश्चित करण्याचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १३ :** आर्णी व झरी तालुक्यातील कथित अवैध रेतीसाठ्याच्या मुद्द्यावरून व्हिसल ब्लोअर तथा आरटीआय कार्यकर्ते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांनी यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीणा यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. रजिस्टर स्पीड पोस्टद्वारे पोचपावतीसह ही नोटीस पाठविण्यात आल्याचे बोरेले यांनी सांगितले.

नोटीसमध्ये आर्णी तालुक्यातील आयता-जालांद्री परिसर तसेच झरी तालुक्यातील सतपल्ली-बोरी ते पाटन मार्गावरील रेल्वे पुलासमोरील भागात मोठ्या प्रमाणात अवैध रेतीसाठा असल्याचा दावा करण्यात आला आहे. दोन्ही ठिकाणी हजारो ब्रास रेती साठविण्यात आली असून, त्यामुळे शासनाच्या महसुलाचे



मोठे नुकसान होत असल्याचा आरोप नोटीसमधून करण्यात आला आहे.या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव, महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे आणि अमरावती विभागीय आयुक्तांकडे पुराव्यांसह तक्रार करण्यात आल्याचे बोरेले यांनी म्हटले आहे. तसेच एसआयटीमार्फत चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधितांवर नियमानुसार कारवाई आणि दंडात्मक वसुली करण्याची मागणी करण्यात आली आहे.मोठ्या प्रमाणात रेतीसाठा करण्यासाठी कालावधी लागला असताना संबंधित यंत्रणांच्या निदर्शनास हे कसे आले नाही, असा सवालही नोटीसमध्ये उपस्थित करण्यात आला आहे. साठविलेली रेती चोरीला जाण्याची किंवा तिची अवैध वाहतूक होण्याची शक्यता लक्षात घेता दोन्ही ठिकाणी सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था आणि तातडीने पंचनामा करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, नोटीसमधील दाव्यांनुसार रेतीची चोरी अथवा अवैध वाहतूक होऊन पुरावे नष्ट झाल्यास प्रशासनाची जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशाराही बोरेले यांनी दिला आहे. या गंभीर आरोपांवर जिल्हा प्रशासन काय भूमिका घेते आणि प्रत्यक्षात कोणती कारवाई केली जाते, याकडे आता लक्ष लागले आहे.

# घरकुल योजनेत गैरव्यवहार! समाधान राऊत यांची चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १३ :** तालुक्यातील कलगाव येथे घरकुल योजनेच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र व्यक्तींना घरकुलाचा लाभ देण्यात आल्याचा आरोप करीत समाधान श्रीराम राऊत यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

### एका घराचा फोटो, दुसऱ्याच घराचे जिओ टॅगिंग?'

**तक्रारीची प्रत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ यांनाही देण्यात आली आहे. त्यामुळे पंचायत समिती प्रशासन या तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेते, घरकुलाच्या लाभार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी होते का आणि जिओ टॅगिंग व निधी वितरणाची तपासणी केली जाते का, याकडे आता कलगावसह तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, कलगाव येथे घरकुल योजनेच्या लाभार्थी निवडीत तसेच निधी वितरणाच्या प्रक्रियेत अनेक अनियमितता झाल्याचा संशय आहे. पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र व्यक्तींना लाभ देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. काही प्रकरणांत घराचे बांधकाम पूर्ण झालेले नसतानाही ते पूर्ण झाल्याचे दाखवून शासनाचा निधी काढण्यात आल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

# फुले विचारांची मशाल विद्यार्थ्यांच्या हाती..!

## शारदा ज्ञानपीठात भाषणमालेतून वैचारिक जागृती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १३ :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मवर्षानिमित्त केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठानद्वारा संचालित श्री शारदा ज्ञानपीठ शाळेत १० ऑगस्ट रोजी विशेष भाषण मालेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये फुले यांचे सामाजिक, शैक्षणिक व परिवर्तनवादी विचार रुजविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थाध्यक्ष डॉ. चाहल, मुख्याध्यापक राहुल देवतळे व व्यवस्थापक तन्वीर शेख यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून



झाले. महेश महाजन यांनी वंदनगीत सादर केले. शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षा सोबतच फुले यांच्या जन्मदिवसा पर्यंत विविध वैचारिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सहाय्यक शिक्षक सुकेश बत्तलवार यांनी प्रास्ताविकातून भाषण मालेची भूमिका स्पष्ट करताना फुले यांच्या विचारांना वाचन आणि वैचारिक चळवळीची जोड देण्याची गरज व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे केली. पृथ्वीराज संदलवार याने फुले यांचा जीवनपट, साक्षी पेंटावर हिने साहित्यिक कार्य, रिया हराळ हिने शैक्षणिक कार्य, वैष्णवी बरोबर हिने सामाजिक कार्य, संबोधी रामटेके हिने अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य, तर जीविका राठोड हिने 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाचे विश्लेषण सादर केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. चाहल यांनी फुले विचार विद्यार्थ्यांच्या आचरणात उतरावेत, यासाठी विविध स्पर्धा व उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

# थोडक्यात



## नशामुक्ती अभियानातून जनजागृतीचा संदेश

**झरी :** नशामुक्ती अभियाना अंतर्गत गुरुकुल कॉन्व्हेन्ट विद्यालयात जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला . या कार्यक्रमात ब्रम्हकुमारी संस्थेच्या पदाधिकारी ललिता मॅम पवार मॅम पोलशेट्टीवार, राजेश्वर चंदेल गुरुकुल विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास चिट्टलवार व विकास अग्रवाल मंचावर उपस्थित होते .आलेल्या प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांना नशेचे दुष्परीणाम व त्यापासून दूर राहण्याचे महत्व पटवून दिले . यावेळी त्यांनी व्यसनामूळे व्यक्तीच्या आरोग्यावर 'कुटुंबावर व समाजावर होणाऱ्या विपरीत परीणामाची माहीती देत ॥ नशामुक्त जीवन हीच निरोगी व आनंदी जीवनाची गुरुकिल्ली आहे " असा प्रेरणादायी संदेश दिला . विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहून आपल्या मित्रपरिवारातही नशा मुक्तीबाबत जनजागृती करावी असे आहवान त्यांनी केले . कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नशा मुक्तीबाबत सकारात्मक विचार रुझविण्यासोबतच समाजात जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला . कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अध्यापिका संगिता वैदय यांनी पार पाडले . कार्यक्रमास शिक्षकवृंद व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते .

## शेतकरी आत्महत्यांचा आकडा थांबता थांबेना..! सात महिन्यांत १६७ बळी

**यवतमाळ :** जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरूच असून, जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांत तब्बल १४४ शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपविल्याची सरकारी नोंद आहे. जुलैमध्ये आणखी २३ आत्महत्यांची भर पडल्याने सात महिन्यांचा आकडा १६७ वर पोहोचला आहे. ही आकडेवारी शेतीव्यवस्थेतील गंभीर संकट अधोरेखित करणारी आहे.

महिनानिहाय आकडेवारीनुसार जानेवारीत १९, फेब्रुवारीत २०, मार्चमध्ये १९, एप्रिलमध्ये सर्वाधिक २५, मेमध्ये १६ आणि जूनमध्ये २२ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली. मागील दोन वर्षांची स्थितीही चिंताजनक आहे. २०२४ मध्ये ३३५, तर २०२५ मध्ये ३४७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद सरकारी यंत्रणेकडे आहे. विशेष म्हणजे २००१ ते २०२६ या कालावधीत यवतमाळ जिल्ह्यात तब्बल ६ हजार ६६४ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. कर्जबाजारीपणा, सततची नापिकी, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अनिश्चितता आणि आर्थिक विवंचना यामुळे शेतकरी कोंडीत सापडला आहे. आत्महत्यांनंतर मदत देण्यापुरते प्रशासनाचे धोरण मर्यादित न राहता आत्महत्या रोखण्यासाठी ठोस हस्तक्षेप गरजेचा आहे. केवळ कर्जमाफी नव्हे, तर शेतीमालाला हमीभाव, उत्पादन खर्चावर आधारित दर, सिंचन, पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला स्थैर्य देणाऱ्या कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची मागणी जोर धरत आहे.

## 'आमची शाळा ठीक करा' अभियान शिक्षण व्यवस्थेवर प्रहार!

**यवतमाळ :** सरकारी शाळांमधील ढासळलेल्या व्यवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अभिजीत दिपके यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'आमची शाळा ठीक करा' या अभियानाची घोषणा केली असून, येत्या १५ ऑगस्टपासून या अभियानाला सुरुवात होणार आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन सरकारी शाळांची वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ पुस्तके वाटून शिक्षणाची जबाबदारी संपत नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रशिक्षित व सक्षम शिक्षक, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, पुरेशा वर्गखोल्या आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सुरक्षित शालेय वातावरण उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे, असा मुद्दा दिपके यांनी उपस्थित केला आहे. जिल्हा परिषद तसेच नगर परिषदांच्या शाळांचे नियमित व पारदर्शक वार्षिक ऑडिट होणे आवश्यक असून, शिक्षण व्यवस्थेवर शासनाकडून खर्च होणाऱ्या लाखो रुपयांचा विनियोग नेमका कुठे आणि कसा होतो, याचीही तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी या अभियानातून पुढे येणार आहे. एकीकडे राजकीय नेत्यांकडून भव्य कार्यालये आणि मोठ्या वास्तू उभारल्या जात असताना, देशाचे भविष्य घडविणाऱ्या शाळा मात्र मूलभूत सुविधांसाठी झगडत आहेत, अशी टीका दिपके यांनी केली आहे. काही शाळा बंद पडल्या असून, अनेक शाळांची अवस्था दयनीय असल्याचा आरोपही त्यांनी केला.

'आमची शाळा ठीक करा' अभियानाच्या माध्यमातून शाळांची प्रत्यक्ष परिस्थिती, प्रशासनाच्या त्रुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील उणिवा निदर्शनास आणून देण्यात येणार आहेत. गोरगरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि शिक्षण व्यवस्थेतील उदासीनता संपावी, हा अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे दिपके यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात यवतमाळ जिल्ह्यामध्ये सुद्धा हे आंदोलन राबवल्या जावे अशी मागणी आंतरराष्ट्रीय मानव अधिकार नवी दिल्ली शाखा यवतमाळच्या वतीने केली असून या अभियानामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील तमाम शाळांची पाहणी करून वास्तविक परिस्थिती जनतेपुढे ठेवण्यात यावी व विद्यार्थ्यांना मिळत नसलेल्या सुविधा व होत असलेली पायपीट याकडे शिक्षण विभागासह प्रशासनाचे सुद्धा लक्ष केंद्रित व्हावे अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली..

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



**८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अमरावती शहर कॉंग्रेस समिती आणि विलास इंगोले मित्र परिवाराच्या वतीने शहारातील ऐतिहासीक जवाहर गेट येथे ध्वजारोहण सोहळा होणार आहे. याच पार्श्वभूमीवर जवाहर गेट प्रकाशाने झगमगून गेले आहे.** (छाया-प्रदीप इंगोले)

# तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, डॉ. पंजाबराव देशमुख यांना 'भारतरत्न'द्या

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या सामाजिक, शैक्षणिक, कृषी आणि ग्रामीण विकासासाठी अतुलनीय योगदान देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' मरणोत्तर प्रदान करण्यात यावा, अशी मागणी खा. बळवंत वानखडे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी भजन, कीर्तन आणि ग्रामजागरणाच्या माध्यमातून स्वच्छता, व्यसनमुक्ती, सामाजिक समरसता, श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता आणि ग्रामविकासाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविला. संत गाडगे महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य गरीब, वंचित, पीडित आणि शोषितांच्या सेवेसाठी समर्पित केले. त्यामुळे त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर उचित गौरव करण्यासाठी तिन्ही महापुरुषांना मरणोत्तर 'भारतरत्न' प्रदान करण्याच्या मागणीवर सकारात्मक विचार करावा, अशी मागणी खा. बळवंत वानखडे यांनी लोकसभा अध्यक्षांकडे केली आहे.

# जि. प. शाळा बगदरीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

## प्रणाली उईके हिची गुणवत्ता यादीत निवड




**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ४ थी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत जिल्हा परिषद शाळा, बगदरी, पं. स. चिखलदरा येथील इयत्ता ४ थीची विद्यार्थिनी प्रणाली अविनाश उईके हिने उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता यादीत स्थान मिळविले, तर इतर ३ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

प्रणाली उईके हिने शिष्यवृत्ती परीक्षेत ७८.६६ टक्के गुण मिळवत अमरावती जिल्हा गुणवत्ता यादीत ७६ वा क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच इयत्ता ४ थी मधील मयंक भलावी, यश पारधे, आदेश उईके हे तीन विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. प्रणाली उईके च्या या यशामुळे शाळा, पालक आणि संपूर्ण गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशाबद्दल विद्यार्थिनी प्रणाली उईके हिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. प्रणाली उईके व इतर विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बी. आर. गिरासे (गटशिक्षणाधिकारी, पं.स. चिखलदरा), कुमुद गडलिंग (शिक्षण विस्तार अधिकारी), लक्ष्मण पंधराम (केंद्रप्रमुख), सुनंता उईके (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष), अर्चना इडपाचे (सरपंच), रामबिलास आठोले (मुख्याध्यापक), राजश्री खाजोने (सहायक शिक्षिका), पालकवर्ग, आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. या उल्लेखनीय यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून जि. प. शाळा, बगदरीच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

# साखर कारखान्यांचे रुपांतर इथेनॉल निर्मिती कारखान्यात करा

## जैवइंधन शेतकरी संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष शामराव देसाई यांचे मत

**अमरावती/का.प्र.**

केवळ उसापासून 'इथेनॉल' निर्मिती होत नाही, तर मका, उंच वाढणारी गोड ज्वारी, तांदूळ यांसारख्या पिकांपासून 'इथेनॉल'ची निर्मिती केली जाऊ शकते. या पिकांची लागवड वाढवल्यास विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होऊ शकतो. साखरेची गरज पूर्ण झाल्यानंतर उर्वरित उत्पादनातून 'इथेनॉल' निर्मितीला प्राधान्य दिले पाहिजे. सध्या 'इथेनॉल'बाबत प्रचंड गैरसमज निर्माण झाले आहेत, ते दूर करण्याची आवश्यकता आहे, असे मत जैवइंधन शेतकरी संघटनेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष शामराव देसाई यांनी येथे व्यक्त केले.



स्थानिक श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात झुंबरलालजी करवा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९ व्या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. यावेळी 'इथेनॉलचे शेतीतील महत्त्व' या विषयावर ते बोलत होते. इथेनॉलचे औद्योगिक व शेतीतील महत्त्व स्पष्ट करताना शामराव देसाई यांनी इथेनॉलबाबत समाजात असलेल्या विविध समज-गैरसमजांवर भाष्य केले. अस्पा बंड सन्स प्रा. लि.चे मॅनोजिंग पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्यामुळे वाहनांचे नुकसान होते, हा गैरसमज आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेशदास राठी छात्रालय समितीचे उपाध्यक्ष जुगलकिशोर गट्टाणी हे होते. यावेळी प्रकाश हेडा, श्यामसुंदर दमानी, शोभा कमलनयन करवा आदी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया यांनी प्रास्ताविक केले.

अतिथींचा परिचय श्रमराज्य परिषदेचे अध्यक्ष अरविंद नळकांडे यांनी करून दिला. आयोजन डॉ. सुनील मावसकर, डॉ. अनिलकुमार प्रसाद, डॉ. ज्योती भुतडा, प्रा. डॉ. आकीब देशमुख, प्रा. डॉ. राजू वाघ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. आकीब देशमुख यांनी केले.

# घरकुल प्रकरणात अभियंता दोषी?

## कारवाईच्या मागणीसाठी तिघांचे आमरण उपोषण

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी पंचायत समिती कार्यालयासमोर कुंभारगाव येथील प्रविण मालगे, ज्ञानदीप बारबदे व अमोल पाथरकर यांनी १३ ऑगस्टपासून आमरण अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. कुंभारगाव ग्रामपंचायतीतील कथित गैरकारभार तसेच प्रधानमंत्री आवास योजनेतील अनियमिततेप्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

उपोषणकर्त्यांच्या आरोपानुसार, कुंभारगाव ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामसेवक यांनी मोठ्या प्रमाणात गैरकारभार केला असून, याबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई करण्यात आलेली नाही. त्याचबरोबर प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुल लाभामध्येही अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणाची दखल घेत पंचायत समिती प्रशासनाने त्रिस्तरीय चौकशी समिती नियुक्त केली होती. ४ ऑगस्ट २०२६ रोजी व्ही. पी. कोकाटे, डि. एस. भुरसट व क. अभियंता रविंद्र सरोदे यांनी कुंभारगाव येथे प्रत्यक्ष भेट देऊन प्राथमिक चौकशी केली. त्यानंतर चौकशी अहवाल प्रशासनाकडे सादर करण्यात आला.



### १ लाख ३८ हजारांचा लाभ; जुन्या घराचीच दुरुस्ती?

चौकशी अहवालात नमूद माहितीनुसार, कुंभारगाव येथील लाभार्थी उत्तम सखाराम भागवतकर यांना सन २०२०-२१ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना (प्रपत्र-ब) अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. त्यांना विविध टप्प्यांत १ लाख २० हजार रुपये अनुदान देण्यात आले. याशिवाय महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून १८ हजार रुपये मजुरी मिळून एकूण १ लाख ३८ हजार रुपयांचा लाभ देण्यात आला.मात्र, चौकशी समितीच्या प्रत्यक्ष पाहणीदरम्यान तसेच लाभार्थ्याच्या लेखी जबाबानुसार नवीन घरकुलाचे बांधकाम न करता जुन्या वडिलोपार्जित घराची किरकोळ दुरुस्ती करण्यात आल्याचे निदर्शनास आल्याचे अहवालात नमूद आहे. यात फ्लोअरिंग, नवीन १८ टीन तसेच काही भिंतींची दुरुस्ती करण्यात आल्याचा उल्लेख आहे.अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

चौकशी अहवालात ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याच्या जबाबदारीचाही उल्लेख करण्यात आला आहे. घरकुलाचे बांधकाम नियमानुसार होत आहे की नाही, जियो टॅग फोटो अपलोड करणे आणि त्यानुसार अनुदान वितरित करण्याची प्रक्रिया तपासणे ही संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.चौकशी समितीने प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदवताना, नियमानुसार नवीन बांधकाम न करता जुन्या घराची किरकोळ दुरुस्ती करून १ लाख ३८ हजार रुपयांचा लाभ वितरित झाल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे ही रक्कम लाभार्थी तसेच ग्रामीण गृह अभियंता जिवन आठवले यांच्याकडून समप्रमाणात वसूल करून शासकीय तिजोरीत जमा करण्याची कार्यवाही करणे क्रमप्राप्त असल्याचे अहवालात नमूद आहे.प्रशासनाने या प्रकरणात ठोस निर्णय घेऊन संबंधितांवर कारवाई करेपर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नसल्याचा इशारा प्रविण मालगे, ज्ञानदीप बारबदे व अमोल पाथरकर यांनी दिला आहे. त्यामुळे पंचायत समिती प्रशासन या प्रकरणात पुढील कोणती भूमिका घेते, याकडे कुंभारगावसह तालुक्याचे लक्ष लागले आहे.या प्रकरणात दोषी आढळलेल्या घरकुल अभियंता जिवन आठवले यांच्यावर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करावे, तसेच तत्कालीन ग्रामसेवकांच्या कार्यकाळातील कथित गैरकारभाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे.

# भातकुली तालुकास्तरीय विद्यार्थी विज्ञान मेळावा

**अमरावती/का.प्र.**

पंचायत समिती भातकुली आणि भातकुली तालुका विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विद्यार्थी विज्ञान मेळावा राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाला.अध्यक्षस्थानी पंचायत समिती भातकुलीचे गटशिक्षणाधिकारी प्रेरक उजगरे होते. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूरचे मुख्याध्यापक गजानन मानकर उपस्थित होते.



यावेळी भातकुली तालुका विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष गोपाल वडतकर, उपाध्यक्ष संगीता येवतीकर, अमरावती जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे सचिव गेडाम तसेच पर्यवेक्षक मंचावर उपस्थित होते.'भारतीय ऊर्जाक्षेत्र २०४७ : संधी आणि आव्हाने' या विषयावर तालुक्यातील १७ शाळांमधील विद्यार्थ्यांनी आपले विचार व मते प्रभावीपणे मांडली. या स्पर्धेत छोगलाल राठी गुरुकुल विद्यालय, भातकुलीचा श्रवण इंगोले याने प्रथम क्रमांक पटकावला. श्री शिवाजी हायस्कूल, खारतळेगावचा समर्थ मुंदाने याने द्वितीय, तर पंजाबराव कुचे विद्यालय, विर्शी येथील उन्नती चतुर हिने तृतीय क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षण जे. डी. पाटील महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. हिमांशू जयस्वाल आणि डॉ. निलेश किस्वे यांनी केले. नवनिर्वाचित मुख्याध्यापक म्हणून गोपाल वडतकर यांचा विज्ञान मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.संचालन भारती देशमुख आणि निलेश चाफलेकर आभार प्रदर्शन वडतकर यांनी केले. कार्यक्रमाला तालुक्यातील विज्ञान शिक्षक तसेच केंद्रप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.असे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

## मुक्त शिक्षणाच्या वाढत्या प्रवाहाच्या पार्श्वभूमीवर

# युवकांच्या सर्वांगीण विकासाचे आव्हान

## अ.भा.राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचा पुढाकार

**अमरावती/का.प्र.**

मुक्त व दूरस्थ शिक्षणामुळे उच्च शिक्षणाच्या संधी व्यापक झाल्या असल्या, तरी युवकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने या शिक्षणपद्धतीची परिणामकारकता किती आहे,हा महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणासमोरील गंभीर आणि दूरगामी परिणाम करणारा प्रश्न आहे. या नव्याने निर्माण झालेल्या आव्हानाचा गांभीर्याने विचार करून भविष्यातील तरुण अधिक सक्षम, कौशल्यसंपन्न, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांना सामोरे जाण्यास समर्थ व्हावेत, यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने पुढाकार घेतला आहे.

नियमित महाविद्यालयीन शिक्षण हे केवळ अभ्यासक्रम आणि पदवीपुरते मर्यादित नसून शिक्षक-विद्यार्थी संवाद, सहाध्यायांमधून होणारे शिक्षण, नेतृत्व, संवादकौशल्य, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, संशोधन, प्रयोगशाळा, सामाजिक सहभाग, आंतरवासिता आणि जीवनकौशल्ये यांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व घडविणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे वाढत्या दूरस्थ शिक्षणामुळे या अनुभवांपासून मोठा विद्यार्थीवर्ग वंचित राहण्याची शक्यता निर्माण होत असेल, तर त्याचा परिणाम भविष्यातील मानवी संसाधनाच्या गुणवत्तेवर काय होईल, याचा आजच गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे महासंघाने म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या वतीने महाराष्ट्राचे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे.निवेदनात मुक्त शिक्षणाचा विरोध न करता त्याची योग्य भूमिका निश्चित करणे आणि त्याचवेळी नियमित महाविद्यालयीन शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण, अनुभवसमृद्ध आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक बनविणे, अशी संतुलित भूमिका मांडण्यात आली आहे.

महासंघाच्या मते, मुक्त शिक्षणाची खरी गरज ज्यांना नियमित शिक्षण घेणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांसाठी आहे;तर नियमित महाविद्यालयीन शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम म्हणून अधिक सक्षम केले पाहिजे. डिजिटल व दूरस्थ शिक्षणाचा वापर नियमित शिक्षणाचा प्रतिस्थापक म्हणून नव्हे, तर कौशल्य निर्माण, अतिरिक्त कौशल्य, कौशल्य वृद्धी आणि आजीवन अध्ययनासाठी पूरक माध्यम म्हणून करण्याची गरज आहे.

महाविद्यालय हे केवळ ज्ञान आणि पदवी देणारे केंद्र नाही; ते विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासाचे संस्कारकेंद्र आहे. शिक्षकांशी होणारा प्रत्यक्ष संवाद, मित्रमैत्रिणींमधून होणारे सहशिक्षण, विविध मतांचा स्वीकार, संघभावना, नेतृत्व, स्पर्धा, सहकार्य, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक सहभाग, प्रयोगशाळा, संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभव या सर्वांतून जीवन जगण्याची कला शिकली जाते. त्यामुळे तरुणांना महाविद्यालयीन जीवनात आणण्याची जबाबदारी आता समाजाची आहे.


**-प्रा. प्रदीप खेडकर**

# संक्षिप्त

## प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेचे' वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा येथे गुरुवार २० ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे.प्रसिध्द साहित्यिक व वक्ते डॉ. सतीश तराळ हे 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे राहणार असून, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठ व्य. प. सदस्य हर्षवर्धन देशमुख, प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती अध्यक्ष मधुभाऊ घारड उपस्थित राहणार आहेत.

## पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन जयंतीनिमित्त ओरिएंटेशन कार्यक्रम



**अमरावती-** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती अंतर्गत तक्षशिला महाविद्यालय, ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावतीचे सचिव तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस, प्रमुख मार्गदर्शक म्हणून शासकीय ग्रंथालयाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, तर प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. प्रितेश पाटील, प्राचार्य, तक्षशिला महाविद्यालय उपस्थित होते.यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. कमलाकर पायस यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासामध्ये ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. राजेश पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनातून ग्रंथालयाचा प्रभावी वापर, उपलब्ध ग्रंथसंपदा, ई-संसाधने, डिजिटल लायब्ररी तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शैक्षणिक माहिती मिळविण्याच्या विविध साधनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.संचालन ग्रंथपाल डॉ. प्रणाली पेटे यांनी तर आभार डॉ. प्रवीण वानखडे यांनी मानले.कार्यक्रमास डॉ अनिल भगत, डॉ. सनोबर कहेकशा, डॉ. संदीप हाडोळे, डॉ. रुपेश बेलसरे, डॉ. आनंद देशमुख, निरुपमा भोरे, मोनाली पाटील आणि सचिन कुमरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उमेश अरगुलवार,अमोल तरोडकर आणि राजरतन सुरवाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.


## 'ओआरएस सप्ताह' साजरा

**अमरावती-** जिल्हा सामान्य रुग्णालय येथील बालरोग विभागात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली 'ओआरएस सप्ताह' जनजागृतीपर उपक्रमाने साजरा करण्यात आला. बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. सोनाली शिरभाते यांच्या पुढाकारातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. अतिसारासारख्या आजारांमध्ये शरीरातील पाणी व क्षारांचे प्रमाण कमी होऊन होणारे निर्जलीकरण टाळण्यासाठी ओआरएस हे अत्यंत प्रभावी व जीवनरक्षक द्रावण आहे. त्याचे महत्त्व, उपयोग तसेच ओआरएस योग्य पद्धतीने तयार करण्याची प्रक्रिया याबाबत डॉ. सोनाली शिरभाते यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.या पथनाट्यातून अतिसाराची कारणे, अतिसार झाल्यास घ्यावयाची काळजी, ओआरएसचे योग्य प्रमाणात सेवन, ओआरएस तयार करण्याची पद्धत तसेच निर्जलीकरणाची लक्षणे याबाबत रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांमध्ये प्रभावी जनजागृती करण्यात आली.

## सोमवारी श्री आनंदेश्वर महादेव मंदिरात कलासेवा

**अमरावती-** श्रावण महिन्यातील पहिल्या सोमवारचे औचित्य साधून अमरावती येथील श्री आनंदेश्वर महादेव मंदिरातील महादेवाच्या मूर्तीचे सुंदर व कलात्मक रंगकाम अमरावतीचे प्रसिद्ध चित्रकार व कलाशिक्षक देवानंद ठोसरे यांनी अत्यंत मनोभावे आणि आकर्षक पद्धतीने केले.आपल्या कलाकौशल्यातून ठोसरे यांनी महादेवाच्या मूर्तीचे रूप अधिक देखणे, प्रसन्न आणि भक्तिमय केले. त्यांच्या या कलासेवेबद्दल श्री आर्ट कला वर्ग व कला बहुउद्देशीय संस्था, अमरावती यांच्या वतीने संस्थेचे संचालक सारंग नागठाणे यांनी त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी देवानंद ठोसरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधत भित्तीचित्रे कशी तयार करावीत, रंगसंगती कशी निवडावी, मोठ्या आकारातील चित्रांचे नियोजन व प्रत्यक्ष रंगकाम करताना कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना निश्चितच कलात्मक वाटचालीत लाभ होणार आहे.

## प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शना



**नांदगाव (खंडेश्वर)-** स्थानिक विदर्भयुथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित प्रा. राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाद्वारे ग्रंथालय शास्त्राचे भारतीय जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमांतर्गत सर्वप्रथम डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत दांडगे यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा व वाचनाची सवय वृद्धिंगत करावी असे आवाहन प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी केले. ग्रंथांचा अधिकाधिक उपयोग व्हावा हा उदात्त हेतू ठेवून सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असे ग्रंथपाल डॉ. निलेश गोरे यांनी सांगितले.प्रदर्शनाला प्रा.डॉ. राजेश मेश्राम,प्रा.डॉ.गौतम सातदिवे,प्रा.अंकुश कासदेकर,प्रा.अमर डांगे, प्रा. कलाने, प्रा.निशिगंधा सोनोने,प्रा.मुरकुटे, प्रा.भोंगाडे, प्रा. भगत, प्रा. खेडकर,गजानन काळे,ऋतुजा जाधव,पंकज सोनोने ह्या कर्मचाऱ्यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी भेट दिली.आयोजनामध्ये नंदकुमार काजे,शुभम फुटाणे व रंजीत बनकर यांचे सहकार्य लाभले.

# भू-माफियांशी दोन हात

**आ**जच्या काळात एखाद्या सामाजिक किंवा कायदेशीर विषयात हात घालताना आपण आधी एक विचार नक्की करतो 'आपले हात तर पोळणार नाहीत ना?' हा प्रश्न केवळ भीतीपोटी नसून, तो आपल्या कोलमडलेल्या व्यवस्थेचा आरसा आहे. आज देशातील सर्वच यंत्रणा भ्रष्टतेच्या वाळवीने पोखरल्या गेल्या आहेत, असे आपण ठामपणे म्हणू शकतो. सत्य आणि मूल्यांसाठी लढणे ही आता केवळ पुस्तकी संकल्पना उरली आहे की काय, अशी भीती वाटते. कारण उघडपणे कोणी कोणाशी पंगा घेत नाही; प्रत्येक जण आपली कातडी वाचवण्यात धन्यता मानतो. आपण कागदावर 'कायद्याचे राज्य' म्हणतो, पण प्रत्यक्षात सरकारी बाबू नियमबाह्य कामांनाच प्राधान्य देताना दिसतात. अशा या दाहक आणि नकारात्मक वातावरणात जेव्हा एखादा ज्येष्ठ वकील भू-माफियांच्या साम्राज्याला धडक देतो, तेव्हा तो थरार आपल्यातील प्रत्येकाला अन्यायाविरुद्ध लढण्याची नवी प्रेरणा देतो.

सध्या मी नागपूरमध्ये खाजगी कारणास्तव रुग्णालयात आहे. सोबतीला अनेक मित्र आणि नातेवाईक येत-जात आहेत. पण लेखकाचा जीव असा असतो की, समोर संकटाचा डोंगर उभा असला तरी, त्याचे डोळे आणि मन दूरवर चाललेल्या एखाद्या लढाईने अस्वस्थ होत राहतात. एकदा का तुमची नाळ समाजाशी घट्ट जुळली की, लोकांच्या हृदयाचे ठोके आणि समाजातील स्पंदने तुम्हाला स्पष्ट ऐकू येऊ लागतात. अशाच एका अस्वस्थतेतून काल माझी भेट झाली माझे मित्र ॲड. संजीव देशपांडे यांच्याशी.

देशपांडे वकील साहेब मूळचे अमरावतीचे. साहजिकच गप्पांचा फड रंगला. सध्या हायकोर्टात त्यांच्या एका खटल्याची आणि त्यातील विजयाची मोठी चर्चा आहे. भू-माफियांची समाज आणि प्रशासनावर असलेली दहशत जेव्हा मी त्यांच्या तोंडून ऐकली, तेव्हा मला जाणीव झाली की, हा संघर्षाचा पट केवळ न्यायालयीन निकाल नसून ती लाखो वाचकांपर्यंत पोहोचवण्यासारखी एक शौर्यगाथा आहे.

या प्रकरणाची पाळेमुळे शोधण्यासाठी आपल्याला जळगाव जिल्ह्यातील भुसावळमध्ये जावे लागेल. मध्य रेल्वेचे २४३ ट्रॅक असलेले भुसावळ यार्ड हे आशियातील दुसरे सर्वात मोठे यार्ड.इंग्रजांनी रेल्वेचा विस्तार करताना मुंबई, दिल्ली, अलाहाबाद आणि कोलकाता या प्रमुख शहरांना जोडणारे जंक्शन म्हणून भुसावळची निवड केली होती. या रेल्वे विस्तारामुळे अनेक वरिष्ठ पारशी अधिकारी भुसावळमध्ये स्थायिक झाले. त्यांनी तिथे बंगले बांधले, शेती केली. काळाच्या ओघात पारशी समाज तिथून स्थलांतरित झाला. आज भुसावळमध्ये केवळ ४ पारशी उरले आहेत, पण त्यांच्या कोट्यवधींच्या मालमत्ता, प्रार्थनास्थळे आणि दफनभूमी (अरामगाह) आजही तिथे आहेत. कागदपत्रांवर या मालमत्तांचे वारस आहेत, पण प्रत्यक्षात मात्र तिथे भू-माफियांचा नंगानाच सुरू आहे.



'सेंट्रल सिने सर्किट असोसिएशन' (CCCA) ही महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमधील ८०० हून अधिक चित्रपट वितरकांची मातब्बर संस्था. या संस्थेने १९९३ साली आपल्या सदस्यांच्या सोयीसाठी भुसावळच्या मध्यवर्ती भागात ५,००० चौ. फुटांचा एक बंगला मुंबईतील एका पारशी व्यक्तीकडून खरेदी केला होता. दुर्दैवाने, या मालकी बदलाची नोंद स्थानिक सिटी सर्व्हे कार्यालयात होऊ शकली नाही किंवा प्रशासनाने ती जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवली. प्रशासनाची हीच त्रुटी २०२४ पर्यंत कायम राहिली आणि याचाच फायदा घेतला अफजल कालू गावली या कुख्यात भू-माफियाने.

अफजलने या मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा मिळवला. सुरुवातीला संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले, पण गुंडांची फौज सोबत बाळगणाऱ्या अफजलला हटवण्याची कोणाची हिंमत झाली नाही. जेव्हा हे प्रकरण हाताबाहेर जात असल्याचे लक्षात आले, तेव्हा संस्थेने नागपूरचे ख्यातनाम वकील ॲड. संजीव देशपांडे यांच्याकडे धाव घेतली.

ही केस लढणे म्हणजे केवळ कायद्याचा कीस पाडणे नव्हते, तर मृत्यूशी दोन हात करणे होते. अफजल कालूची दहशत इतकी होती की, भुसावळमधील स्थानिक वकील त्याच्याविरुद्ध उभे राहायला तयार नव्हते.ॲड. देशपांडे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखूनही हा लढा स्वीकारला. त्यांना साथ दिली पंजारी शे. लतीफ शे. हसन या तरुण आणि धाडसी वकीलाने.

हा लढा सोपा नव्हता. भुसावळचे उपविभागीय अधिकारी कार्यालय असो किंवा सत्र न्यायालय, जेव्हा दाव्याची तारीख असायची, तेव्हा पक्षकाराचे फक्त चार लोक हजर असायचे आणि अफजल कालूचे तब्बल दोनशे गुंड तिथे दहशत निर्माण करण्यासाठी उभे असायचे.अशा वातावरणात ॲड. देशपांडे यांना नागपूरहून भुसावळला जाणे आणि तिथून सुखरूप परत येणे, हा प्रत्येक वेळी जीवाचा खेळ असायचा. जुने दस्तऐवज धुंडाळणे, माफियाने तयार केलेली बनावट कागदपत्रे उघडकीस आणणे आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांना न्यायाच्या बाजूने उभे करणे, असे अनेक कठीण टप्पे पार पडले.

अखेर ९ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी भुसावळ यांनी CCCA च्या बाजूने निकाल दिला. पण निकाल लागणे म्हणजे ताबा मिळणे नव्हते. भू-माफिया मालमत्तेवर विळखा घालून बसलाच होता. या प्रकरणात जेव्हा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कठोर पवित्रा घेत प्रशासनाला अंमलबजावणीचे आदेश दिले, तेव्हा कुठे १६ एप्रिल रोजी पोलिसांच्या मदतीने ती जागा मुक्त झाली आणि CCCA ला आपला हक्क पुन्हा मिळाला.

ॲड. संजीव देशपांडे यांच्या मते, हा लढा एका बंगल्यापुरता मर्यादित नाही. तपासादरम्यान जे काही समोर आले ते धक्कादायक आहे. अफजल कालू टोळीने मूळ पारशी मालकांच्या वारसांकडून बनावट 'पॉवर ऑफ अटर्नी' मिळवून खरेदीखत तयार केले होते. ज्या मालमत्तेची बाजारपेठ किंमत ५ कोटी रुपये आहे, ती मालमत्ता अवघ्या ६ लाख रुपयांत काही रोजंदारी कामगारांनी विकत घेतल्याचे दाखवण्यात आले होते!

याच मोडस ऑपरेंडीचा वापर करून त्यांनी पारशी अंजुमन फंडाची सहा एकर स्मशानभूमी (अरामगाह) आणि 'मेसोनिक लॉज' या आंतरराष्ट्रीय धार्मिक संस्थेची जमीन बळकावली. या सर्व जमिनींची एकूण किंमत ३०० कोटी रुपयांहून अधिक आहे. उपनिबंधक कार्यालयाने जर प्राथमिक तपासणी केली असती किंवा व्यवहारातील आर्थिक विसंगती तपासली असती, तर हा प्रकार आधीच उघड झाला असता. पण प्रशासनातील काही घटक या माफियांच्या खिशात असल्याने हे शक्य झाले नाही.

आज देशभर भू-माफियांनी आपला मोर्चा सार्वजनिक धर्मदाय संस्थांच्या जमिनींकडे वळवला आहे. निष्क्रिय विश्वस्त आणि भ्रष्ट महसूल कर्मचारी यांच्या अभद्र युतीमुळे देवस्थानच्या, संस्थांच्या आणि अनाथ व्यक्तींच्या जमिनी गिळंकृत केल्या जात आहेत. तलाठी पातळीवर कोणाचीही जागा सहज दुसऱ्याच्या नावावर करण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. सामान्य माणसाचा आवाज दाबायला माफियांकडे अवैध मार्गातून आलेला अफाट पैसा आणि गुंडांची फौज आहे.

ॲड. संजीव देशपांडे यांनी दिलेला हा लढा केवळ एका मालमत्तेचा ताबा मिळवण्यापुरता नाही, तर तो व्यवस्थेतील सडकेपणा उघड करण्याचा प्रयत्न आहे. सार्वजनिक संस्थांच्या जमिनींवर पडणाऱ्या या दरोड्यांविरुद्ध समाजाने आता एकत्र येण्याची गरज आहे. जर आपण आज गप्प बसलो, तर उद्या आपली स्वतःची जमीनही सुरक्षित राहणार नाही.

**माधव पांडे**
मो.९८२३०२३००३

## ढिंडी सोहळा

शेगावीच्या राणाची दिंडी
आली हो मेहकरले
पंचक्रोशीतीलभक्तगण
दर्शना आतुर झाले ...

गणगणात बोते म्हणता
प्रपंचाचा शिण हरते
दर्शन होता गजाननाचे
मनी चैतन्य संचारते ...

मका सेवनाच्या प्रसंगी
भक्तांना दृष्टांत हा दिला
संकटी नाती गोती नव्हे
फक्त इश्वरच येई कामाला



**प्रा. अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९
(आज मेहकरला शेगावच्या दिंडीचे आगमन होत आहे त्यानिमित्त प्रासंगिक)

# किती युवकांना आपण सक्षम करतोय?

**बदलते तंत्रज्ञान, रोजगाराचे बदलते स्वरूप आणि सामाजिक-आर्थिक वास्तव लक्षात घेता आजच्या युवा पिढीच्या आकांक्षांना योग्य दिशा आणि संधी देणे गरजेचे आहे.नुकत्याच झालेल्या जागतिक युवक दिनानिमित्त घेतलेला हा आढावा !**

**यु**वा शक्तीच्या सामर्थ्यांचा, आकांक्षांचा आणि स्वप्नांचा सन्मान करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाकडून दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिन म्हणून साजरा केला जातो. जगाच्या कानाकोपऱ्यातील तरुणांची सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती भिन्न असली, तरी शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, सन्मान, समान संधी आणि स्वतःचे भविष्य घडविण्याची आकांक्षा मात्र सर्वत्र समान आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाच्या जागतिक युवा दिनासाठी 'वेगवेगळ्या परिस्थिती, समान आकांक्षा' ही संकल्पना अधोरेखित करण्यात आली आहे.

आज जगात १५ ते २४ वयोगटातील तरुणांची संख्या जवळपास १.३ अब्ज झाली आहे. त्यापैकी सुमारे ७६ कोटी तरुण कमी व निम्न मध्यम उत्पन्न असलेल्या देशांत राहतात.जगातील जवळपास ६० टक्के तरुण केवळ दहा देशांतील आहेत आणि त्यामध्ये भारताचाही समावेश होतो. भारताची लोकसंख्या २०२५ मध्ये सुमारे १४६.४ कोटींपर्यंत वाढल्याचे संयुक्त राष्ट्रसंघ लोकसंख्या निधीचा अंदाज आहे. या विशाल लोकसंख्येत तरुणांचा मोठा वाटा असल्याने भारताकडे 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' अर्थात लोकसंख्यात्मक लाभाचे मोठे भांडवल आहे. युनिसेफच्या २०२५ च्या आकडेवारीनुसार भारतात १५ ते २९ वयोगटातील ३७.१ कोटी तरुण आहेत. ही जगातील सर्वात मोठी युवा ताकद आहे. जागतिक पातळीवरही हीच स्थिती दिसते. संयुक्त राष्ट्रांच्या 'जागतिक लोकसंख्या २०२६ च्या युवा पिढीची लोकसंख्यात्मक स्थिती आणि आव्हाने 'नुसार जगात १५ ते २४ वयोगटातील तरुणांची संख्या १.३ अब्जांच्या पुढे गेली असून आगामी दशकांमध्ये त्यांचे भौगोलिक वितरण आणि आर्थिक परिस्थिती बदलणार आहे. लोकसंख्यात्मक दृष्टीने पाहता हा लाभ कायमस्वरूपी नसतो. कामाच्या वयातील लोकसंख्येला शिक्षण, कौशल्य, आरोग्य आणि रोजगार



मिळाला तर उत्पादन, बचत गुंतवणूक वाढते आणि करआधार विस्तारून आर्थिक विकासाला चालना मिळते. याउलट शिक्षण घेतलेल्या तरुणांना रोजगार मिळत नसेल, कौशल्य आणि उद्योगांच्या गरजांमध्ये तफावत असेल तर हीच लोकसंख्या आर्थिक संधीऐवजी सामाजिक-आर्थिक विषमतेचे कारण ठरू शकते. त्यामुळे २०२६ मध्ये युवा दिन साजरा करताना 'तरुण किती आहेत ?' यापेक्षा 'या तरुणांना आपण किती सक्षम करीत आहोत?' हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

### रोजगाराचा प्रश्न कायम

अखिल भारतीय उच्च शिक्षणावरील सर्व्हेक्षणानुसार, उच्च शिक्षणातील विद्यार्थी संख्या २०१४ ते १५ मधील ३.४२ कोटींवरून २०२१ ते २२ मध्ये ४.३३ कोटींवर पोहोचली; म्हणजेच सुमारे २६.५ टक्क्यांची वाढ झाली आहे. तथापि, उच्च शिक्षणाचा विस्तार झाला असला, तरी शिक्षणातून मिळणारी पदवी आणि रोजगार बाजारपेठेला अपेक्षित कौशल्ये यातील दरी गंभीर आहे. आर्थिक सर्व्हेक्षण २०२४-२५ नुसार,१५ ते २९ वयोगटातील केवळ ४.९ टक्के युवकांना औपचारिक व्यावसायिक किंवा तांत्रिक प्रशिक्षण, तर २१.२ टक्के युवकांना अनौपचारिक प्रशिक्षण मिळाले आहे. तर पदवीधरांपैकी सुमारे ५०.३ टक्के कामगार अर्ध-कुशल असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या २०२५ मधील आकडेवारीनुसार १५ ते २९ वयोगटातील युवा बेरोजगारीचा दर सुमारे १४.६ टक्के आहे. म्हणजेच प्रत्येक १०० युवा कामगारांपैकी सुमारे १५ जण रोजगाराच्या शोधात असूनही कामापासून दूर आहेत.

शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अधिकृत आकडेवारीनुसार देशातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील २५ टक्के युवक शिक्षण, रोजगार किंवा कौशल्य प्रशिक्षणापासून (नीट) दूर आहेत. विशेषतः या वयोगटातील नीट दर पुरुषांसाठी ८ टक्के, तर महिलांचा तब्बल ४२.२ टक्के आहे यातून लैंगिक विषमता अधोरेखित होते. जागतिक स्तरावरही स्थिती चिंताजनक आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या २०२५ च्या अंदाजानुसार जागतिक युवा बेरोजगारी दर सुमारे १२.४ टक्के तर नीट श्रेणीत तब्बल २६ कोटी तरुण शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षण या तिन्हींपासून दूर आहेत. अनेकदा रोजगार शोधणारा तरुण बेरोजगार म्हणून नोंदला जातो; पण शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या तिन्हींपासून दूर असलेला तरुण अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहाबाहेर राहतो. यातील चिंताजनक बाब म्हणजे शिक्षण आणि रोजगार यांच्यातील विसंगती। पदवी मिळाल्यानंतरही अपेक्षित दर्जाचा रोजगार मिळत नसल्याची समस्या वाढत आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन, गिग इकॉनॉमी, हरित अर्थव्यवस्था आणि डिजिटल व्यवसाय यामुळे रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. त्यामुळे पारंपरिक पदवीपेक्षा डिजिटल साक्षरता, एआय कौशल्य, डेटा विश्लेषण, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमतेचे महत्त्व वाढत आहे. म्हणून भारतासमोरील आव्हान केवळ नोकऱ्या निर्माण करण्याचे' नाही; तर 'भविष्यातील नोकऱ्यांसाठी तरुणांना तयार करण्याचे' आहे.

### आजच्या युवापिढीसमोर स्मार्टफोन, इंटरनेट, ऑनलाइन

शिक्षण, डिजिटल पेमेंट आणि ए आयच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या नवनव्या संधी उपलब्ध होत आहेत. तथापि, डिजिटल प्रवेश आणि आवश्यक डिजिटल कौशल्य यांच्यातील दरी अद्यापही कायम आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने सुचित केल्याप्रमाणे जगातील तरुणांच्या आकांक्षा शिक्षण आणि रोजगारापुरत्या मर्यादित नसून त्यांना मानसिक आरोग्य, निर्णयप्रक्रियेत सहभाग, समान संधी आणि चांगल्या भविष्यासाठी सुरक्षित सामाजिक वातावरणही हवे आहे. 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम 'च्या फ्युचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५ नुसार, २०३० पर्यंत जगभरात सुमारे १७ कोटी नवीन रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे; मात्र त्याच काळात सुमारे ९.२ कोटी रोजगारांचे स्वरूप बदलणार किंवा ते कमी होणार आहे. विशेष म्हणजे, आज अस्तित्वात असलेल्या कौशल्यांपैकी सुमारे ४० टक्के कौशल्यांमध्ये २०३० पर्यंत बदल करण्याची गरज भासणार आहे.

जगातील सर्वात मोठी युवाशक्ती असलेल्या भारतासाठी या संधीचे आर्थिक सामर्थ्यात रूपांतर करण्यासाठी केवळ पदवी देणारी शिक्षणव्यवस्था पुरेशी ठरणार नाही. तर युवावर्गाला गुणवत्तापूर्ण शिक्षणातून जागतिक दर्जाची आधुनिक कौशल्ये, संशोधन, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाशी जोडत त्यांच्यासमोर रोजगाराबरोबरच उद्योजकतेच्या संधी निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शासन, उद्योग, विद्यापीठे, संशोधन व स्वयंसेवी संस्था आणि समाज यांनी संयुक्तपणे 'शिक्षणातून पदवी, पदवीतून कौशल्य, कौशल्यातून रोजगार आणि रोजगारातून उद्योजकतेकडे जाणारी सक्षम परिसंस्था उभारावी लागेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या कौशल्याधारित, उच्च शिक्षणाला उद्योग, संशोधन, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेशी बहुविषयक आणि रोजगाराभिमुख शिक्षणाच्या दृष्टिकोनानुसार अधिक प्रभावीपणे जोडून अभ्यासक्रमांची उपयोजित उद्योगानुरूप रचना, प्रत्यक्ष प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप, इंटर्नशिप आणि प्रकल्पाधारित शिक्षणाला चालना द्यावी लागेल.

**डॉ. नितीन बाबर**
मो.९७३०४७३१७३

# तरुणाईचा प्रक्षोभ

**स**ध्या भारतातील ३५ वर्ष वयोगटातील तरुणांची संख्या ही ६५% इतकी आहे. १५-२९ वयोगटातील तरुणांची संख्या २७% ते २९% (३६९ मीलीयन आहे.) तर जेनजी यांची संख्या ३६६ मौलीयन इतकी आहे. यापैकी ६४%तरुण ग्रामीण भागात तर ३६% तरुण शहरी भागात वास्तव्यास आहे. या बाबींचा विचार करिता भारतातील १४० कोटी लोकसंख्या पैकी ६५% म्हणजे ८१ कोटी लोकसंख्या ही तरुण आहे.

आज भारतातील तरुण पिढी मध्ये शासन, शिक्षण व्यवस्था, नैतिक आणि आर्थीक भष्ट्राचार व विषम समाज व्यवस्था बदल फार मोठा रोष आहे. हे आपण जंतरमंतर वरील आंदोलन तसेच झारखंड मधील आंदोलनाच्या स्वरुपात अलीकडेच अनुभवले आहे. या तरुण पिढीचा आंदोलनाला व प्रक्षोभाला षमविण्याकरिता शासनाद्वारे बळाचा वापर करण्यात आला व तरुणाई पेटून ऊठून आंदोलनानी उग्ररुप धारण केले याचा परिपाक म्हणून केंद्रशासनाला शिक्षण मंत्र्याचा राजीनामा घेणे भाग पडले. इतक्यात मात्र तरुणाई शांत झाली नाही याचाच अनुभव आपल्याला तरुणाईने हैद्राबाद येथील नालसर विधी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी देशाचे सरन्यायाधिश यांना विद्यापीठाच्या दिक्षांत समारोहाचे मुख्य अतिथी म्हणून केलेला विरोध यातून स्पष्ट होते. तरुणाईतील टोकाचा रोष का वाढला याची कारणमिमांस करणे हे या देशातील प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य आहे.

एकंतरीत तरुणाईचा रोष हा ढासळलेली शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी व सामाजीक असमानता आहे. शिक्षण क्षेत्राचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की अंगणवाडी, पदवुत्तर शिक्षण या शिक्षणाचे व्यापारीकरण फार झपाट्याने झाले असून सरकारी शाळा, महाविद्यालय याची हुशार विद्यार्थी घडविण्याची क्षमता ही नगन्य झाली आहे. पालक व समाजाचा कल हा खासगी शाळा, महाविद्यालय, अभीमत विद्यापीठांकडे वाढलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शासकीय व निमशासकीय संस्थाद्वारे दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या शैक्षणिक सुविधा व नोकरीच्या संधी असे आहे. खासगी संस्थांमध्ये अतिशय फी वाढीमुळे गरीब व सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थी हा शिक्षण घेऊ शकत नाही. ही बाब वैद्यकीय व अभियांत्रीकी अभ्यासक्रमाकरिता पण तितकीच लागू होते. अभिमत विद्यापिठांमध्ये करोडो रुपयांचा खर्च करुन डॉक्टर शिकतात व शासकीय महाविद्यालयातून गुणवत्तेनुसार पदवी व पदयुत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यां समोर दिमाखाने वावरत असतात. या आर्थीक विषमतेचा वाईट परिणाम हा गुणवंत विद्यार्थ्यांवर होतो ज्याचे रुपांतर हे नैराश्य अथवा अतिटोकाचा विरोध व आंदोलने यात होतो. मागील तीन दशकांचा अभ्यास केला असता आपल्या निर्देशनास येते की, खासगी संस्थांचा सुळसुळाट आपल्या देशात अतिवेगाने झाला आहे व समाजाने पण या खासगी संस्थांच्या भरभराटीला प्रतिसाद दिलेला दिसतो आश्चर्याची बाब म्हणजे ज्या अभ्यासक्रमांना सरावाची (प्रॅक्टीकलची) नितांत आवश्यकता आहे.

शिक्षकांनी दर्जेदार व कौशल्य विकासावर आधारीत शिक्षणाचे कार्य करावे. मात्र सद्यस्थितीत खासगी संस्थांमध्ये जास्तीतजास्त शिक्षकांचा कल हा आपल्या संस्थानिकांना खुश करण्याकडे जास्त दिसतो आहे संस्थानिक सांगेल ती पुर्व दिशा ही गुलामीची शिक्षकानी घेतलेली भुमीका मुख्यतः वैद्यकीय खासगी महाविद्यालय संस्था ही सर्वदृष्टीने घातक आहे. यामुळे शिक्षकांचा आदर समाजात कमी होवून गुणवत व कौशल्य विकसीत विद्यार्थी घडणे कठीणच नव्हे तर अशक्य आहे.सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या आर्थीक, सामाजीक व जातीधर्माचा विचार न करता सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक द्यावी ही एक माफक अपेक्षा आहे. मात्र दैनंदिन जीवनात दुर्दैवाने असे घडतांना बऱ्याच शिक्षक व शिक्षण संस्थांकडून दिसत नाही.

शासनानी व संस्थांनी शिक्षण तंज्ञाचा फक्त सल्लाच घेऊ नये तर त्यांनी दिलेल्या योग्य त्या सुचनांचा अवलंब शिक्षणप्रणालीत करावा. वरीलबाबी घडल्यास तरुण व विद्यार्थी वर्गातील रोष कमी होण्यास मदत होईल. या करिता फक्त सरकार, शिक्षक, अधिकारी व समाज यांनी सहकार्य करणे व तशी भुमीका निभावून तरुण पिढीला मार्गदर्शन व स्वतःच्या वागणूकीतून आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे.विद्यार्थी व तरुणानी अभ्यास, गुणवत्ता व कौशल्य याकडे लक्ष द्यावे. समाजातील सर्व घटकांना फक्त शिक्षणाची संधी ही मागणी न करता पाठपुरावा करावा. या उपक्रमात उच्चशिक्षीत व प्रौढाने व्यवस्थेबाबत बघ्याची भुमीका न घेता त्यानी सहकार्य करावे. विद्यार्थ्यांनी आपल्या संग्रहीत संस्थेबाबतदचा रोष आंदोलनाच्या स्वरुपात व्यक्त केला. निर्ढावलेल्या व्यवस्थेत हा लढा एक दिवसाचा नसून प्रत्येक नागरिकाने रोज होणाऱ्या अन्यायाविरुध्द आवाज पुकारणे गरजेचे आहे. त्याशिवाय भ्रष्टाचार, शिक्षण व्यवस्थेतील विषमता कमी होणे अश्यक्यप्राय आहे.

**डॉ. भाऊसाहेब बकाने**
आस्था सर्जीकल व कॅन्सर हॉस्पीटल, वर्धा

# राष्ट्र आणि धर्मजागृतीचे प्रखर अध्वर्यू : स्वामी करपात्री महाराज

**भा**रत देशात मोठमोठे संत महात्मे होऊन गेलेत.त्यापैकी धर्मसम्राट स्वामी करपात्री महाराजांसारख्या थोर विभूतीचा जन्म वर्ष १९०७ मध्ये उ.प्र. मधील प्रतापगड जिल्ह्यात भटनी या गावी झाला.त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रभावशाली होते. ते वैराग्याचे मूर्तिमंत रूप होते. त्यांचे मूळ नाव 'हरनारायण' होते. वयाच्या १९ व्या वर्षी अर्थात् वर्ष १९२६ मध्ये त्यांनी गृहत्याग केला. त्यांचे वास्तव्य गंगातीरावर होते. स्वामी विश्वेश्वराश्रम यांच्याजवळ त्यांनी वेदशास्त्राध्ययन केले. हिमालयात निवास करून तपश्चर्या केली. त्यांना समाधी अवस्थेत धर्मसंस्थापनेकरता कार्य करण्याचा दैवी आदेश झाला. वयाच्या २४ व्या वर्षी श्रीब्रह्मानंद सरस्वती यांच्याकडून ते काशीला गेले. संन्यास ग्रहण करून ते 'हरिहरानंद सरस्वती' झाले.



क्षुधाशांती करता ते हातात मावेल तेवढीच भिक्षा घेत आणि ती देवाला नैवेद्य दाखवून ग्रहण करत. संस्कृतमध्ये हाताला 'कर' म्हणतात, त्यामुळेच त्यांना 'करपात्री' हे नामाभिधान प्राप्त झाले. राष्ट्र आणि धर्मजागृतीसाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. काशीला 'सन्मार्ग' हे दैनिक आणि 'सिद्धांत' हे साप्ताहिक ही वृत्तपत्रे चालू केली. शासनाच्या 'सेक्युलर' प्रणालीच्या शिक्षणातून लोकांना मुक्त करण्याकरता 'धर्मसंघा'ची स्थापना करून धर्मयात्रा चालू केली, त्यांनी भारतभर पायी यात्रा केल्या. त्यांनी अनेक अधिवेशने, चर्चासत्रे, वेदशाखा संमेलने, शास्त्रार्थ सभा इत्यादी घेतल्या. ५० पेक्षा अधिक ठिकाणी स्वामीजींनी संस्कृत विद्यालये स्थापन केली. आजही ती कार्यरत आहेत. धर्मवीर दल' आणि 'महिला संघ' यांचीही त्यांनी स्थापना केली. सर्व वेदशाखा संमेलने, धार्मिक पत्रकार संमेलने, साधु संमेलने यांचे त्यांनी भव्य आयोजन केले. वर्ष १९४६ मध्ये बंगाल येथे हिंदूंचे सामूहिक हत्याकांड झाले. भयंकर संहार झाला. प्रचंड धर्मपरिवर्तन झाले. करपात्र स्वामीजी त्वरित बंगालला गेले. त्यांनी हिंदु समाजाला धीर दिला अन् घोषणा केली, 'जो कोणी संकीर्तन करून रामनामाचे उच्चारण करील, तो विशुद्ध हिंदूच राहील.' अशा प्रकारे जबरीने धर्मांतर होणार नाही, याची त्यांनी खात्री केली. करपात्र स्वामींनी ३ सहस्र बेघर झालेल्या हिंदु परिवारांची पुनर्स्थापना केली.

करपात्र स्वामीजी यांनी 'हिंदु कोड बिल'ला कडाडून विरोध केला. त्यासाठी त्यांनी देशभर दौरा केला. स्वामीजींनी 'हिंदु कोड बिल प्रमाणाच्या कसोटीवर' हा ग्रंथही प्रसिद्ध केला. त्यांनी भारतभर गोवध बंदीसाठीही आंदोलने चालवली. त्यांनी अनेक यज्ञकरून हिंदु धर्मात यज्ञाचे महत्त्व अधोरेखित केले. ते कर्तव्यनिष्ठ, ज्ञाननिष्ठ, भक्तीनिष्ठ होते. 'शांकरभाष्य-आक्षेप और समाधान';'समन्वय साम्राज्य संरक्षण'; संस्कृत ग्रंथ 'मार्क्सवाद आणि रामराज्य'; 'वेदस्वरूप आणि प्रामाण्य'; 'वेदप्रामाण्य मीमांसा'; 'अहमर्थ व परमार्थ'; 'वेदस्वरूप विमर्श'; 'ज्योतिष्याती कायाकल्प?';'चातुर्वर्ण्य संस्कृति विमर्श'; 'श्रीविद्यारत्नाकर' हा तांत्रिक ग्रंथ; ३ सहस्र पृष्ठांचा 'वेदार्थ पारिजात';'रामायणमीमांसा' इत्यादी ग्रंथांची निर्मिती केली.त्यांचे ग्रंथ मनाला केवळ शांती देणारे नाही तर वाचकात प्रखर हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व जागृत करणारे आहेत. अशा थोर विभूतीच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस केवळ वंदन करून चालणार नाही, तर त्यांच्या सारखे धर्म रक्षणाचे कार्य करण्यासाठी सक्रिय सतर्क आणि क्रियाशील राहील अशी प्रतिज्ञा घेतली पाहिजे, तेच खरे अभिवादन असेल.

**शशिकांत पाध्ये, वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला
जिल्हा विशेष

# दोन कोटींच्या काळेगाव - भोकर रस्त्याला 'कार्योत्तर' मंजुरीचा डांबर!

## गुणवत्ता निरीक्षकांच्या अहवालाने जिल्हा परिषद बांधकाम विभागाचा कारभार चव्हाट्यावर

■ प्रतिनिधी | अकोला ■

रस्ता पूर्ण झाला, देयकही अदा झाले; मग सुधारित प्राकलनाला मंजुरीची आठवण झाली! तेल्हारा तालुक्यातील भोकर ते काळेगाव रस्त्याच्या कामातील अनियमिततेचा पाढा राज्य गुणवत्ता निरीक्षकांच्या तांत्रिक चौकशी अहवालाने वाचला असून, आता या प्रकरणाला आणखी एक धक्कादायक वळण मिळाले आहे. सुधारित प्राकलन अधीक्षक अभियंत्यांच्या मान्यतेसाठी १० जून २०२६ रोजी पाठविण्यात आले आणि त्याच दिवशी त्याला मंजुरी मिळाली. विशेष म्हणजे, ही मंजुरी प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यानंतर 'कार्योत्तर मंजुरी' म्हणून मिळाल्याचे समोर आले आहे.

तब्बल १ कोटी ९३ लाख ६ हजार ४०७ रुपयांचे अंतिम देयक असलेल्या या रस्ते कामात नियम, तांत्रिक निकष आणि मंजुरी प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे 'आधी काम, नंतर कागदोपत्री सोपस्कार' असा कारभार झाला काय, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### 'जनमाध्यम'च्या वृत्तमालिकेनंतर प्रशासनाची धावपळ!

विशेष म्हणजे, या प्रकरणातील ही कागदी धावपळ अचानक झालेली नाही. ३ जून २०२६ पासून 'जनमाध्यम'मध्ये या रस्ते कामातील अनियमिततेबाबत वृत्तमालिका सातत्याने प्रकाशित झाल्यानंतरच संबंधित यंत्रणा खडबडून जागी झाल्याचे चित्र आहे.

वृत्तमालिकेतून कामातील त्रुटी, प्राकलनातील बाबी, रस्त्याचा दर्जा, डांबरीकरण, गटारे आणि मंजुरी प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यानंतर सुधारित प्राकलनाची फाईल धावू लागली आणि १० जून रोजीच ती पाठवून त्याच दिवशी कार्योत्तर मंजुरीही मिळाली, अशी बाब समोर आली आहे. यामुळे आता काम सुरू करण्यापूर्वी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित असताना, काम पूर्ण झाल्यानंतर मंजुरी घेण्याची वेळ का आली? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### पितळ उघडे पडल्यावर 'कागदी मलमपट्टी'?

राज्य गुणवत्ता निरीक्षकांच्या अहवालातच नवीन रस्त्याच्या कामासाठी आवश्यक सखोल सर्वेक्षण, सरेखा प्रस्ताव, संकल्पन आणि सक्षम यंत्रणांची मंजुरी याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. खडीकरण व डांबरीकरणासाठी आवश्यक क्रस्ट डिझाइन, दोन पुलांचा समावेश, शेड्यूल-बीबाहेरील कामे आणि जादा आयटमच्या दरांना पूर्वमान्यता यांसारख्या बाबींवरही निरीक्षकांनी बोट ठेवले आहे. अशा परिस्थितीत काम पूर्ण झाल्यानंतर सुधारित प्राकलनाला कार्योत्तर मंजुरी देऊन आधी झालेल्या प्रक्रियेला वैधतेचा मुलामा देण्याचा प्रयत्न झाला का? हा प्रश्न आता तपासण्याची गरज आहे.

### काम आधी, सुधारित प्राकलनाची मंजुरी नंतर



### कामानंतर मंजुरी; हा योगायोग की 'बचावाचा' प्रयत्न?

सुधारित प्राकलनास अधीक्षक अभियंत्यांची मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव १० जून २०२६ रोजी पाठविण्यात आला. विशेष म्हणजे, त्याच दिवशी त्यास मंजुरी मिळाली. ही मंजुरी काम पूर्ण झाल्यानंतर 'कार्योत्तर मंजुरी' म्हणून प्राप्त झाल्याची बाब समोर आली आहे. ३ जूनपासून 'जनमाध्यम'मध्ये या कामातील अनियमिततेबाबत वृत्तमालिका सुरू होती. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत सुधारित प्राकलनाची प्रक्रिया पूर्ण करून कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली. पितळ उघडे पडल्यानंतर आपला कारभार झाकण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून करण्यात आलेली ही कागदी धावपळ होती का? याची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. गुणवत्ता निरीक्षकांच्या अहवालातील गंभीर निरीक्षणांमुळे ही 'मलमपट्टी'ही निष्फळ ठरल्याचे चित्र आहे.

### रस्त्याऐवजी शेतातच पोहोचले पाणी!

गंभीर बाब म्हणजे, कागदोपत्री मंजुरी आणि प्रत्यक्ष कामाची गुणवत्ता यांच्यातील तफावतही अहवालातून समोर आली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना करण्यात आलेली कच्ची गटारे सलग नसल्याने पावसाचे पाणी योग्य प्रकारे वाहून जात नाही. अनेक ठिकाणी पाणी शेतात साचल्याचे निरीक्षकांना आढळले. शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी आवश्यक ठिकाणी पाइप टाकणे अपेक्षित असतानाही तसे करण्यात आले नाही. परिणामी पाण्याचा प्रवाह अडून शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची नोंद अहवालात आहे.

### खडी उखडली; रस्ता दोन्ही बाजूंनी खचला

रस्त्याची योग्य दबाई करण्यात आलेली नसल्याचे निरीक्षणही अहवालात आहे. अनेक ठिकाणी खडी उखडली असून, पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने रस्ता खचत आहे. काळ्या मातीच्या भागासाठी आवश्यक साइड स्लोपचे निकष पाळण्यात आले नसल्याने रस्ता दोन्ही बाजूंनी खचत असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणजेच, जवळपास दोन कोटी रुपये खर्च करून तयार झालेला रस्ता पावसाच्या पाण्यापुढेच टिकत नसेल, तर कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी नेमकी कोणाची? हे आता प्रशासनानेच स्पष्ट करावे.

### सरकारी प्रयोगशाळा सोडून खासगी चाचण्या

करारनाम्यातील अटींनुसार साहित्याच्या आवश्यक चाचण्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना किंवा शासकीय गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेत करणे अपेक्षित होते. मात्र चाचण्या खासगी प्रयोगशाळेतून करण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. कोणत्या साहित्याच्या किती चाचण्या आवश्यक होत्या आणि प्रत्यक्षात किती चाचण्या झाल्या, याचा आवश्यक तक्ता सादर करण्यात आला नसल्याचेही निरीक्षकांनी नमूद केले आहे.




### दोन पुलांचा समावेश, तरी प्राकलनावर प्रश्नचिन्ह

मंजूर कामात दोन पुलांचा समावेश असतानाही कोणतीही ठोस कारणमीमांसा न करता प्राकलनात आवश्यक बाबींचा समावेश करण्यात आला नसल्याचे अहवालात नमूद आहे. शेड्यूल-बीबाहेरील कामे करण्यात आली असून, त्यासाठी जादा आयटमच्या दरांना पूर्वमान्यता घेण्यात आली नसल्याचेही समोर आले आहे.

### मातीच्या दरापासून डांबरीकरणापर्यंत प्रश्न

तक्रारदार अरविंद पाटील यांनी यापूर्वीच अंदाजपत्रकातील दरांबाबत प्रश्न उपस्थित केले होते. शासकीय जमिनीतून मिळणाऱ्या मातीकामासाठी २५५ रुपये प्रतिघनमीटर दर अपेक्षित असताना १ हजार ५६० रुपये प्रतिघनमीटर दर लावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. डांबरीकरणाच्या अटी-शर्तींच्या पालनाबाबतही तक्रारी करण्यात आल्या होत्या.

### 'जनमाध्यम'च्या पाठपुराव्यानंतर आता जबाबदारी निश्चित होणार?

या प्रकरणात उपोषण, तक्रारी, वृत्तमालिका आणि त्यानंतर राज्य गुणवत्ता निरीक्षकांची चौकशी असा घटनाक्रम घडला. आता गुणवत्ता निरीक्षकांच्या अहवालामुळे संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, ३ जूनपासून सुरू झालेल्या वृत्तमालिकेनंतर १० जूनला सुधारित प्राकलनाची मंजुरी आणि त्याच दिवशी कार्योत्तर मंजुरी मिळणे हा योगायोग मानायचा की वृत्तमालिकेच्या दबावानंतर झालेली प्रशासकीय धावपळ? याचे उत्तर प्रशासनाने देणे गरजेचे आहे. पितळ उघडे पडू लागल्यानंतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून आधीच्या त्रुटींवर पडदा टाकण्याचा प्रयत्न झाला असेल, तर तोही गुणवत्ता निरीक्षकांच्या अहवालामुळे निष्फळ ठरल्याचे चित्र आहे. कारण आता केवळ मंजुरीची कागदपत्रे नव्हे, तर प्रत्यक्ष कामाची गुणवत्ता, तांत्रिक निकष, मंजुरीची वेळ आणि आर्थिक व्यवहार यांची सांगड घालून चौकशी करण्याची वेळ आली आहे.

### 'कंत्राटदाराला काळ्या यादीत टाका ; अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करा'

तक्रारीत सादर केलेले अनेक मुद्दे हे चौकशी अहवालातून सत्य झाले आहे. त्यातच भरीस भर म्हणून आणखीन काही नवीन विषय या चौकशी अहवालातून समोर आले असून ही बाब गंभीर आहे. परिणामी संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, तसेच कामाशी संबंधित अभियंत्यांची जबाबदारी निश्चित करून फौजदारी कारवाई करावी. जर दोषींवर कारवाई झाली नाही तर पुन्हा उपोषण करण्यात येईल.

**अरविंद पाटील**
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेल

जाहीर सुचना

दि. १३.८.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, मे. दिव्यम एटरप्राइजेस तर्फे प्रो.प्रा. अनिल नारायणदास केला यांचे मौजे अकोला ता. जि अकोला येथील नझूल शीट नं ६२-डी, नझूल प्लॉट नं १/५, लेआऊट प्लॉट नं ३, बाबतचे हक्कसोड लेख, दि. २७.३.२०१५, दस्त क्र १८५६ व सदर हक्कसोड लेखास केलेला दुरुस्ती लेख दि.६.४.२०१५, दस्त क्र. १९६९, हे मुळ कागदपत्रे हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत रीतसर कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

आपला
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर, स्टेशन रोड, अकोला मो : ९८२३०९१३७७

## अद्वैत संगीत अकादमीत 'संगीत संध्या' संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानीय अद्वैत संगीत अकादमी येथे विशेष 'संगीत संध्या' कार्यक्रम संपन्न झाला.जेष्ठ सहकार नेते स्व गोविंदराव भौरदकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड. राम भौरदकर, सौ. ज्योती भौरदकर,चंद्रकांत भौरदकर, शरद भौरदकर व डॉ. चेतन भौरदकर उपस्थित होते.संगीताच्या सुरेल सादरीकरणाने या सोहळ्यास प्रारंभ झाला.यावेळी संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि आनंदमय झाले.संगीत विद्यार्थी व शिक्षकांनी विविध संगीत सादरीकरणे करून स्व गोविंदराव भौरदकर यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर,शिक्षकवृंद, वादक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे 'संगीत संध्या' जल्लोषात संपन्न झाली. अ‍ॅड. शिवम भौरदकर यांच्यासह गायत्री तिवारी, अंतरा गाद्रे, खुशी तिवारी,वैभव मांडवकर, शुभम नारे, अजिंक्य इनामदार आदी उपस्थित होते.

## माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांच्या उत्तम स्वास्थ्यासाठी संत गजानन महाराजांना साकडे

■ प्रतिनिधी | अकोला ■

माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू गुलाबराव गावंडे यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी आणि त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी कौलखेड चौक येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात कौलखेड रहिवासी मित्र मंडळाच्या वतीने साकडे घालण्यात आले. यावेळी महाआरती व अभिषेकाला हजारो चाहत्यांची उपस्थिती लावली होती.राज्याचे माजी क्रीडामंत्री, ज्येष्ठ लोकनेते तथा राष्ट्रीय कबड्डीपटू गुलाबराव गावंडे यांची प्रकृती सध्या



स्थिर असून, अमरावती येथील रेनबो हॉस्पिटलमधील अतिदक्षता विभागात (घ्ळ) त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होऊन ते पूर्णपणे बरे व्हावेत, यासाठी जिल्ह्यातील त्यांच्या चाहत्यांकडून विविध ठिकाणी प्रार्थना, अभिषेक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने गुरुवारी कौलखेड चौक येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात कौलखेड रहिवासी मित्र मंडळाच्या वतीने गुलाबराव गावंडे यांच्या उत्तम स्वास्थ्यासाठी विशेष प्रार्थना, महाआरती व अभिषेक करण्यात आला. यावेळी हजारो चाहत्यांनी आणि नागरिकांनी उपस्थित राहून श्री संत गजानन महाराजांच्या चरणी साकडे घातले. कार्यक्रमात महिला व पुरुष सदस्यांसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. गावंडे भाऊ लवकरात लवकर पूर्णपणे बरे होऊन पुन्हा आपल्या सर्वांच्या भेटीला यावेत, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.

जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११२७/२०२६ प्रोसेस नं.९१३७/२०२६
चौ.ता. २५/०८/२०२६ दिनांक : १८/०७/२०२६

**अर्जदार :** १. अनिता हरिदेव चंदनशिव, २. हेमंत हरिदेव चंदनशिव, ३. वैष्णवी हरिदेव चंदनशिव, सर्व रा. शंकर नगर, स्टार बेकरी जवळ, आपातापा रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हरिदेव सदाशिव चंदनशिव
**पत्ता :-** रा. शंकर नगर, स्टार बेकरी जवळ, आपातापा रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हरिदेव सदाशिव चंदनशिव यांचे दि. ०५/०२/२०२३ रोजी शंकर नगर, स्टार बेकरी जवळ, आपातापा रोड, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निदींष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# सण-उत्सवासाठी प्रशासनाने सज्ज राहावे

## आ. साजिद खान पठाण यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

### रस्ते, वीज, वाहतूक, स्वच्छता आणि अकोट धारगड यात्रेच्या नियोजनाचा घेतला आढावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी सण-उत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावेत, यासाठी प्रशासनातील सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, अशा सूचना आमदार साजिद खान पठाण यांनी दिल्या. सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आ. पठाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्या उपस्थितीत नियोजन बैठक पार पडली. बैठकीला विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



शहरातील रस्त्यांची दुरवस्था, वीजपुरवठा, मिरवणुकांच्या वेळी वाहतूक व्यवस्था, स्वच्छता तसेच धारगड यात्रेच्या नियोजनासंदर्भात बैठकीत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. उत्सवाच्या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यासाठी संबंधित विभागांनी आतापासूनच उपाययोजना पूर्ण कराव्यात, असे आ. पठाण यांनी स्पष्ट केले.

#### खड्डयांच्या दुरुस्तीसाठी डीपीडीसीत प्रस्ताव

शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांचा प्रश्न गंभीर असून, सण-उत्सवाच्या काळात मिरवणुका आणि नागरिकांची मोठी वर्दळ लक्षात घेता रस्ते सुस्थितीत असणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेने डीपीडीसीमध्ये प्रस्ताव सादर करून निधी उपलब्ध करून घ्यावा आणि खड्डे दुरुस्तीची कामे मार्गी लावावीत, अशी सूचना करण्यात आली.

#### गांधीग्राम - अकोट फाईल मार्गावरील पथदिवे सुरू करण्याचे निर्देश

गांधीग्राम ते अकोट फाईल मार्गावरील पथदिवे बंद असल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित झाला. या मार्गावरील बंद असलेली लाईट व्यवस्था लवकरात लवकर पूर्ववत करण्यात येईल, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

#### शांतता समितीच्या बैठकीनंतर पोलिसांचे नियोजन

सण-उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी पोलिस प्रशासनाची असून, त्यासाठी आवश्यक बंदोबस्ताचे नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. पोलिस प्रशासनाची शांतता समितीची बैठक नुकतीच पार पडली असून, त्यासोबतच आवश्यक त्या अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

#### 'दुरुस्तीच्या नावाखाली दीर्घकाळ वीज बंद नको'

सणाच्या काळात महावितरणकडून अनावश्यक लोडशेडिंग होऊ नये, तसेच दुरुस्तीच्या नावाखाली वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित ठेवू नये, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. आवश्यक दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

#### धारगड यात्रेसाठी स्वतंत्र नियोजन

धारगड यात्रेच्या पार्श्वभूमीवर यात्रा मार्गाची आवश्यक दुरुस्ती करावी, वनविभागाशी समन्वय साधून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, तसेच पार्किंगची व्यवस्था शिस्तबद्ध पद्धतीने करावी, अशा सूचना देण्यात आल्या. भाविकांच्या सोयीसाठी विशेष बससेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच यात्रास्थळी ?म्ब्युलन्स सेवा सज्ज ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले.

#### मिरवणुकीदरम्यान वाहतूक वळविण्याची सक्ती

जुलूस किंवा मिरवणूक निघताना वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी वाहतूक पोलिस विभागावर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली. संबंधित मिरवणूक मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गाने वळवावी आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले.

#### उत्सवापुरती स्वच्छता नको; रोज शहर स्वच्छ ठेवा

शहरातील अस्वच्छतेबाबत आ. पठाण यांनी नाराजी व्यक्त केली. सण-उत्सवाच्या काळापुरती स्वच्छता मोहीम न राबवता शहराची दैनंदिन स्वच्छता कायम राखणे आवश्यक आहे. नागरिकांना अस्वच्छतेबाबत तक्रारी करण्याची वेळ येऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने नियमित स्वच्छतेवर भर द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

#### अकोटच्या जुलूसाच्या वेळेचा मुद्दा ऐरणीवर

अकोट शहरातील ईद निमित्त निघणाऱ्या जुलूसाच्या वेळेचा प्रश्नही बैठकीत चर्चेला आला. जुलूसासाठी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत परवानगी देण्याबाबत योग्य नियोजन करण्याची मागणी करण्यात आली. सण-उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था, वाहतूक आणि नागरिकांच्या सुविधा यांचा समतोल राखून प्रशासनाने नियोजन करावे, असे आ. साजिद खान पठाण यांनी स्पष्ट केले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## आज महसूलमंत्री बावनकुळे वर्धा दौऱ्यावर

**वर्धा/जनमाध्यम**



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज, १४ ऑगस्ट रोजी वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यादरम्यान देवळी येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थिती तसेच वर्धा येथे नागरिकांच्या निवेदनांचा स्वीकार करण्यात येणार आहे.सकाळी ११.३० वाजता नागपूर येथून देवळीच्या दिशेने ते प्रयाण करतील. दुपारी १ वाजता देवळी येथील रामदास तडस इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान व आरोग्य अमृत महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. यानंतर दुपारी ३ ते ५ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा येथे नागरिकांची निवेदने स्वीकारण्यासाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विविध प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांबाबत नागरिकांना थेट महसूलमंत्र्यांसमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे. सायंकाळी ६ वाजता ते वर्धा येथून नागपूरकडे प्रयाण करतील.

# एमपीडीएचा दणका! 'आरडीएक्स'ला येरवडा कारागृहाची हवा

## १६ गंभीर गुन्ह्यांची नोंद; दहशत निर्माण करणाऱ्या कुख्यात गुंडावर जिल्हाधिकाऱ्यांची कठोर कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरगाव (मेघे) परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या कुख्यात गुंड अक्षय ऊर्फ 'आर.डी.एक्स.' दिगांबर पटेल/पटले (वय ३०) याच्यावर अखेर महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, रेती माफिया व जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम (एमपीडीए) १९८१ (सुधारणा २०१५) अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी १२ ऑगस्ट रोजी स्थानबद्ध आदेश जारी केल्यानंतर त्याची येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे रवानगी करण्यात आली.

अक्षय पटेल याच्याविरुद्ध वर्धा शहर तसेच सावंगी (मेघे) पोलीस ठाण्याच्या अभिलेखावर सन २०२२ पासून तब्बल १६ गुन्ह्यांची नोंद आहे.गंभीर दुखापत,प्राणघातक शस्त्र



बाळगणे,धमकी देणे,नुकसान करणे,गैरकायद्याची मंडळी जमविणे,खुनाचा प्रयत्न,दरोडा, हत्यार कायद्याचे उल्लंघन, सार्वजनिक शांतता भंग करणे आदी गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा त्यात समावेश आहे. संबंधित सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**प्रतिबंधक कारवाईलाही जुमानला नाही**

सन २०१४ पासूनच परिसरात दहशत निर्माण केल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्याच्या दहशतीमुळे अनेक नागरिक तक्रार करण्यासही धजावत नसल्याचे पोलिसांच्या कारवाईतून समोर आले. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ५५ व ५६ (१) (अ) (ब) अन्वये हद्दपारीची कारवाई करण्यात आली होती. तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहितेअंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाईही करण्यात आली. मात्र, या कारवायांनंतरही त्याच्या गुन्हेगारी कारवायांना आळा बसला नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वर्धा शहर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एमपीडीएअंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला. प्रस्तावाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी वान्मथी सी.यांनी स्थानबद्ध आदेश जारी केला.

**गुन्हेगारी विश्वात खळबळ**

मागील वर्षभरात पोलीस व महसूल विभागाच्या समन्वयातून एमपीडीएअंतर्गत धडक कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे अवैध दारू विक्रेते, गुंड प्रवृत्तीचे धोकादायक व्यक्ती आणि रेती माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

आगामी सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी अशा प्रवृत्तींविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.सन २०२५ मध्ये जिल्ह्यातील १८ दारू विक्रेते, गुंड प्रवृत्तीचे गुन्हेगार व रेती माफियांवर एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्यात आली. तर २०२६ मधील ही सहावी एमपीडीए कारवाई असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडीक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

पोलीस हवालदार अमोल आत्राम, पोलीस हवालदार आशिष महेशगौरी, पोलीस निरीक्षक नागेशकुमार चतरकर, पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड, महिला पोलीस हवालदार वैशाली करमनकर व महिला पोलीस शिपाई करिश्मा परचाके यांनी कारवाईत सहभाग घेतला. गुन्हेगारीला थारा नाही या भूमिकेतून एमपीडीएचा दणका देत पोलिसांनी कुख्यात 'आरडीएक्स'ला येरवडा कारागृहात धाडल्याने बोरगाव परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# प्रस्थापितांच्या पोटशूळावर विकासाचा बुलडोझर

## सुमित वानखेडेंचा कामाचा धडाका; कुरघोड्यांना विकासातून प्रत्युत्तर

**आर्वी/जनमाध्यम**

राजकारणात आरोप-प्रत्यारोप, श्रेयवाद आणि कुरघोड्यांना महत्त्व आले असताना आर्वी मतदारसंघाचे आ.सुमित वानखेडे यांनी मात्र विकासकामांवर लक्ष केंद्रित केल्याचे चित्र आहे. राजकीय वारसा नसतानाही स्वकर्तृत्वावर पहिल्या पिढीचे नेतृत्व म्हणून पुढे आलेल्या वानखेडे यांनी रस्ते, पाणी, रोजगार आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मतदारसंघातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याला प्राधान्य दिल्याचा दावा त्यांच्या समर्थकांकडून केला जात आहे.

वर्षानुवर्षे रखडलेल्या कामांना गती मिळत असल्याने मतदारसंघातील विकासाचा वेग वाढल्याचे चित्र आहे. विशेषतः स्थानिक तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करणारे प्रकल्प उभारण्याच्या दिशेनेही प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जाते.या विकासकामांमुळे राजकीय विरोधकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याचा आरोप समर्थकांकडून होत आहे.

वैयक्तिक टीका किंवा आरोपांना प्रत्युत्तर देण्याऐवजी प्रत्यक्ष कामातून उत्तर देण्याची भूमिका वानखेडे यांनी स्वीकारल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. मात्र, पक्षांतर्गत कुरघोड्यांमुळे विरोधकांना आयते कोलीत मिळत असल्याची खंतही समर्थक व्यक्त करीत आहेत.

सत्ता आणि पदे क्षणभंगुर असली तरी जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करणारा नेता लोकांच्या स्मरणात राहतो. त्यामुळे विरोधकांच्या आरोपांकडे दुर्लक्ष करून विकासकामांवर लक्ष केंद्रित करणारी आमदार वानखेडे यांची कार्यशैली आर्वीच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरत आहे.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यास मारहाण; तिघांवर गुन्हा

**हिंगणघाट**-येथील शाळेत दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यास शाळा सुटल्यानंतर तिघांनी मारहाण केल्याची घटना १० ऑगस्ट रोजी घडली. या मारहाणीत विद्यार्थी जखमी झाला असून, त्याच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार,संबंधित विद्यार्थी नेहमीप्रमाणे शाळेत गेला होता. मधल्या सुटीदरम्यान काही विद्यार्थ्यांमध्ये वाद सुरू झाला. मोठा आवाज ऐकू आल्याने संबंधित विद्यार्थी बाहेर जाऊन पाहण्यासाठी गेला. वादानंतर काही विद्यार्थी स्कूल बॅग घेऊन शाळेबाहेर निघून गेले. त्यानंतर संबंधित विद्यार्थी वर्गात परत जाऊन बसला.शाळा सुटल्यानंतर काही मुले बाहेर उभी होती. यातील तिघांनी संबंधित विद्यार्थ्यास अडवून मारहाण केली. अचानक झालेल्या मारहाणीत तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेनंतर विद्यार्थ्याने पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून हिंगणघाट पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, घटनेमागील कारणाचा तपास सुरू आहे.

०००० 

### रस्ता बांधकामाचे २७ हजारांचे साहित्य लंपास

**सेलू**-केळझर शिवारात सुरू असलेल्या रस्ता बांधकामासाठी आणून ठेवलेले २७ हजार रुपये किमतीचे लोखंडी चॅनल अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. ही घटना १० ते ११ ऑगस्टदरम्यान उघडकीस आली. याप्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.जयप्रकाश पाल,रा. सुहावली,उत्तर प्रदेश,ह.मु. केळझर हे अभियंता म्हणून रस्ता बांधकामाचे काम पाहत आहेत. बांधकामासाठी त्यांनी लोखंड, सिमेंट, गिट्टी, वाळू यासह आवश्यक साहित्य घटनास्थळी आणून ठेवले होते. दरम्यान, केळझर शिवारातील रस्त्याच्या कामाची पाहणी करण्यासाठी गेले असता त्यांना साहित्यामधील १५ लोखंडी चॅनल आढळून आले नाहीत.परिसरात शोध घेतल्यानंतरही चॅनलचा ठावठिकाणा लागला नाही. अज्ञात व्यक्तींनी रात्रीच्या वेळी रस्ता बांधकामाच्या ठिकाणी ठेवलेले लोखंडी चॅनल चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. चोरी झालेल्या साहित्याची किंमत २७ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पाल यांच्या तक्रारीवरून सेलू पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, चोरट्यांचा शोध सुरू आहे.

०००० 

### वाळूची चोरटी वाहतूक; पाच लाखांचा मुद्देमाल जप्त

**आष्टी**-वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर पोलिसांनी कारवाई करत ट्रॅक्टर-ट्रॉलीसह वाळूसाठा असा पाच लाख आठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई आष्टी मार्गावरील एका ढाब्यासमोर करण्यात आली. याप्रकरणी प्रतिक साहेबराव कडू, रा. भीष्णूर आणि मयंक खेरडे, रा. तळेगाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तळेगाव (श्या.पंत) पोलिसांचे पथक परिसरात गस्त घालत असताना त्यांना आष्टी मार्गावरून वाळूची चोरटी वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी ढाब्यासमोर एमएच ३२ एएक्स ३२९७ क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली थांबवून तपासणी केली.तपासणीदरम्यान ट्रॉलीमध्ये वाळूसाठा आढळून आला. वाळू वाहतुकीसंदर्भातील आवश्यक परवानगी व कागदपत्रांबाबत चौकशी केली असता अवैध वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी ट्रॅक्टर, ट्रॉली आणि वाळूसाठा ताब्यात घेतला. जप्त मुद्देमालाची किंमत पाच लाख आठ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

०००० 

### तळेगावात ३५ शेळया चोरीला

**तळेगाव (श्या.पंत)**-येथील शेळीपालकाच्या गोठ्यातून तब्बल ३५ शेळ्या अज्ञात व्यक्तींनी चोरून नेल्याची घटना १० ऑगस्ट रोजी उघडकीस आली. शेख युनूस शेख इस्माईल,रा. तळेगाव (श्या.पंत) हे शेळीपालनाचा व्यवसाय करतात. १० ऑगस्ट रोजी ते नेहमीप्रमाणे गोठ्याची साफसफाई करण्यासाठी गेले असता त्यांना गोठ्यातील ३५ शेळ्या दिसून आल्या नाहीत. अज्ञात व्यक्तींनी गोठ्यातून शेळ्या चोरून नेल्याचा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

## दोन लाख रुपयांसह चांदीचा ऐवज चोरी

**सिंदी (रेल्वे)**-येथील मातोश्री सिताबाई टालाटुले प्राथमिक शाळेच्या आवारातील वडिलोपार्जित घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी दोन लाख रुपयांच्या रोख रकमेसह चांदीची मूर्ती, चांदीचा सिक्का असा एकूण दोन लाख १२ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना १० ऑगस्ट रोजी उघडकीस आली. याप्रकरणी सिंदी (रेल्वे) पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अतुल टालाटुले (६८), रा. नागपूर, ह.मु. सिंदी (रेल्वे) यांचे शाळेच्या आवारात वडिलोपार्जित घर आहे. घराच्या दुरुस्तीचे काम सुरू असल्याने त्यांनी दोन लाख रुपये घरात आणून ठेवले होते.१० ऑगस्ट रोजी सिंदी येथे येत असताना त्यांना घराच्या दरवाजाचे कुलूप तुटले असल्याची माहिती फोनवरून मिळाली.

त्यांनी तातडीने घरी जाऊन पाहणी केली असता घरातील रोख रक्कम आणि चांदीच्या वस्तू चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी टालाटुले यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी वाढीव प्रवेश प्रक्रीया सुरु

**वर्धा/जनमाध्यम**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२६-२७ करीता दोन वर्ष मराठी माध्यम कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमा करीता प्रवेश प्रक्रिया केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. इच्छुकांनी १९ ऑगस्ट पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या वाढीव प्रवेश प्रकीयेकरीता पात्रता महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १०) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशीलाचा अंतर्भाव असलेली कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (दोन वर्ष मराठी माध्यम) प्रवेश माहिती पुस्तिका http://www.pdkv.ac.in या संकेतस्थळावर आहे. अर्ज भरण्याची शेवटची तारीख १९ ऑगस्ट आहे. उमेदवाराने प्रवेश माहिती पुस्तीकेचे योग्यरीत्या अवलोकन करावे. तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना पासपोर्ट आकाराचे सद्याचे छायाचित्र, स्वतःची स्वाक्षरी व मुळ कागदपत्रे स्कॅन करुन संकेतस्थळावर अपलोड करावी. प्रवेश अर्ज संकेतस्थळावर ऑनलाईन सबमीट करुन प्रवेश अर्ज शुल्क डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड, नेट बँकींग किंवा युपीआय व्दारे ऑनलाईनच भरायचे आहे. प्रवेश अर्ज शुल्क खुल्या प्रवर्गाकरीता ५०० रुपये व आरक्षित प्रवर्गाकरीता २५० रुपये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे. प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे स्वतः, ईतराव्दारे, टपालाने, कुरीयरने कार्यालयाला पाठवु नये. सदर माहिती प्राचार्य, शासकीय कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा जि. वर्धा यांचेतर्फे देण्यात येत आहे. प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा येथे प्रवेश घ्यावयाचा आहे त्या विद्यार्थ्यांनी शासकीय कृषि तंत्र विद्यालय, सेलसुरा विद्यालयाचा सांकेतीक कोड १२०३ हा नमुद करावा, असे शासकीय कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांनी कळविले आहे.

# सेंट जॉन हायस्कूलमध्ये लायब्ररी डे उत्साहात

**पुलगाव/जनमाध्यम**

स्थानिक सेंट जॉन हायस्कूलमध्ये राष्ट्रीय लायब्रियन डे उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांसाठी दोन्ही शिफ्टमध्ये 'बुक रिव्ह्यू कॉम्पिटिशन' घेण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात देवी सरस्वती व डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हायस्कूल गटात ज्ञानदा मेहकरे प्रथम, संस्कृती गिरटकर द्वितीय तर अनन्या इंगोले तृतीय आली. मिडल स्कूल गटात स्वानंदी ढोक प्रथम, विराज नेव्हाल द्वितीय, तर सिद्धी पागोटे व दिपांशी



भारद्वाज तृतीय ठरल्या. आरोही ताकसांडे व साची कुचे यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला. प्राचार्य संतोष यादव यांनी विद्यार्थ्यांनी नियमित वाचनातून ज्ञान समृद्ध करावे, असे आवाहन केले. यावेळी उपप्राचार्या सोनम देवतळे, उपप्राचार्य महेंद्र भोयर, ग्रंथपाल मिलिंद किटे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षण आरती कुरझडकर, मिलिंद किटे व स्वाती इंगळकर यांनी केले.

# वेतन तपशिल नवीन संकेत स्थळावर स्थानांतरीत करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

वेतनाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि सुरक्षित करण्यासाठी १ जुलै पासुन नवीन सेवार्थ प्रणाली लागु करण्यात आली आहे. या नवीन सेवार्थ प्रणालीमध्ये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी २० ऑगस्ट पर्यंत जुन्या सवार्थ प्रणाली मधील सर्व कर्मचाऱ्यांची माहिती व सेवा तपशिल स्थानांतरीत करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी शुभदा चिंचोळकर यांनी केले आहे.

या नवीन सेवार्थ प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जुन्या सेवार्थ प्रणाली मधील सर्व कर्मचारी यांची माहिती आणि सेवा तपशील नवीन पोर्टलवर स्थलांतरित (Data Migration) करण्याची प्रक्रिया सध्या

**अंतिम मुदत २० ऑगस्ट**

कोषागार कार्यालय स्तरावर युद्ध पातळीवर सुरु असून विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना जुन्या सेवार्थ प्रणाली मध्ये कोणतेही नवीन कामकाज किवा बील निर्मिती २० ऑगस्ट नंतर करता येणार नाही.

जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी, कार्यालय प्रमुख आणि कर्मचारी यांनी याची गांभिर्यानी नोंद घ्यावी व Data Migration ची प्रक्रिया आणि नवीन सेवार्थ प्रणाली मध्ये माहे जुलै २०२६ चे वेतन देयक तयार करणे (Pilot Bill Generate) इत्यादी कामकाज २० ऑगस्ट पूर्वी पूर्ण करावे याबाबत कोणालाही मुदतवाढ मिळणार नाही असे संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी निर्देश दिले आहे. तरी सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नवीन सेवार्थ प्रणाली मध्ये Data Migration ke Pilot देयके तयार करण्याबाबत विहीत कालावधीत कामकाज पूर्ण करण्याबाबत कोषागारास सहकार्य करावे.सदर कामकाज विहित कालावधीत पूर्ण करण्याकरिता सर्व कोषागार/उपकोषागार कार्यालय सुटीच्या दिवशी सुरु राहणार आहे, असे उप कोषागार अधिकारी गणेश निमसरकर यांनी कळविले आहे.

# किटकनाशके वापरतांना काळजी घेण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

कोणतेही किटकनाशक हे मनुष्यासह इतर जिविताकरीता अपायकारक प्रसंगी प्राणघातक असते. त्यामुळे पिकांवर किटकनाशकाची फवारणी करतांना काळजी घेणे आवश्यक आहे. किटकनाशकाच्या डब्यासह घडीपत्रिकेमध्ये दुष्परीणामावर करावयाच्या उपाययोजना छापलेल्या असतात. त्यांचे वाचन करुन सावधानी बाळगावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

फवारणी करताना नेहमी पूर्ण बाह्यांचे कपडे, हातमोजे, चेहऱ्यावर मास्क आणि गॉगल वापरावा, फवारणीसाठी योग्य वेळेची निवड करावी, फवारणी नेहमी सकाळी किंवा संध्याकाळी शांत वातावरणात करावी. वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने कधीही फवारणी करू नका, यामुळे विष अंगावर उडू शकते. फवारणी पंपाचे नोझल (नळी) अडकल्यास ते स्वच्छ



करण्यासाठी तोंडानी फुंकर मारू नका. किटकनाशकांचे द्रावण तयार करण्यासाठी हाताऐवजी नेहमी लाकडी काठीचा वापर करावा. फवारणीचे काम सुरू असताना काहीही खाणे, पिणे किंवा धूम्रपान करणे टाळावे. रिकाम्या बाटल्यांची विल्हेवाटः कीटकनाशकांच्या रिकाम्या बाटल्या शेतात फेकू नका; त्या जमिनीत खोल खड्डा करून गाडून टाकाव्यात.

**रासायनिक खते वापरताना घ्यावयाची काळजी**

जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी नेहमी माती परीक्षण करून शिफारसीनुसारच योग्य प्रमाणात खते द्यावीत. कोरड्या हातांनी स्पर्श टाळावा रासायनिक खते (विशेषतः युरिया) हाताळताना हाताला जखम असल्यास थेट स्पर्श करू नये, खते घालताना हातमोजे वापरावेत. खते दिल्यानंतर शेतात जास्त पाणी साचू देऊ नका, यामुळे खते वाहून जाऊन जवळच्या जलस्रोतांचे प्रदूषण होते.

कीटकनाशके आणि खताची गुणवत्ता व दर्जाची हमी देणा-या अधिकृत विक्रेत्याकडूनच नेहमी निवीष्ठा खरेदी करा. बनावट/भेसळयुक्त रासायनिक खते व किटकनाशकांची खरेदी टाळण्यासाठी अधिकृत विक्रेत्याकडून खरेदीचे पक्के बिल घ्या.

खरेदी करत असलेल्या निवीष्ठांचे लेबल वाचावे खरेदी करताना बाटलीवरील एक्सपायरी डेट (अंतिमतारीख) आणि वापराच्या सूचना काळजीपूर्वक वाचावी. ही रसायने लहान मुले, पाळीव प्राणी आणि अन्नधान्यापासून दूर, कुलूपबंद खोलीत ठेवावीत.आपत्कालीन परिस्थिती (विषबाधा झाल्यास) बाधित व्यक्तीला ताबडतोब फवारणीच्या जागेपासून दूर. मोकळ्या व सावलीच्या ठिकाणी न्यावे. त्याचे दूषित कपडे काढून शरीर स्वच्छ पाण्याने धुवावे. अजिबात वेळ न घालवता किटकनाशकाचा डबा सोबत घेऊन तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधावा.

कमी वजनाच्या निवीष्ठा तसेच छापील किंमती पेक्षा जास्त किंमतीने विक्री अथवा इतर तक्रारीसाठी जवळच्या कृषि अधिका-यांशी संपर्क साधावा शेतक-यांनी आपल्या तक्रारी विषयी माहीती लेखी / दुरध्वनी क्रमांक ०७१५२-२५००९९ / टोल फ्री क्रमांक १८००२३३४००/ व्हॉटसअप क्रमांक ९६७३५०७९४९ इत्यादीद्वारे देऊन शासनाच्या गतिमान गुणनियंत्रण अभियानात सहभागी व्हावे, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

## पीकअपची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**पुलगाव** - भरधाव पीकअप वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे जण जखमी झाल्याची घटना कवठा रेल्वे परिसरात घडली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पुलगाव येथील प्रवीण ठाकरे आणि त्यांचा मित्र एमएच ३२ एए ५१३० क्रमांकाच्या दुचाकीने प्रवास करीत होते. दरम्यान, ते कवठा रेल्वे शिवारातून जात असताना समोरून येणाऱ्या एमएच ३२ एजे ५३२७ क्रमांकाच्या पीकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.धडक जोरदार असल्याने दुचाकीवरील प्रवीण ठाकरे यांच्यासह त्यांचा मित्र जखमी झाला.जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.याप्रकरणी जखमींच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अपघात नेमका कशामुळे झाला, वाहनाचा वेग किती होता आणि चालकाची निष्काळजीपणा होता का, याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक २५८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# दर्यापूरातील माहोरे ज्वेलर्स दरोडा प्रकरणातील मुख्य आरोपी गजाआड

## मुद्देमाल व रिकव्हरीचे मोठे आव्हान, चौकशी सुरु

**खल्लार/प्रतिनिधी:-** दर्यापूर शहरातील शिक्षक कॉलनीमधिल माहोरे ज्वेलर्सच्या दुकानात ३१ जुलै रोजी पडलेल्या लाखो रुपयांच्या सशस्त्र दरोडा प्रकरणातील तपासाला आता वेग आला असून, ११ऑगस्टला पोलिसांनी या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधाराला बेड्या ठोकल्या आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील रहिवासी असलेला ३० वर्षीय जितेंद्र हा मुख्य सूत्रधार आहे. त्याला १८ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

३१ जुलै रोजी पाच सशस्त्र दरोडेखोरांनी दर्यापूर येथिल माहोरे ज्वेलर्सवर दरोडा टाकला होता. बंदूक आणि चाकूचा धाक दाखवून दरोडेखोरांनी तब्बल ६५ लाखांचा ऐवज लांबविला होता.

यात ४१२ ग्रॅमचे सोन्याचेदागिने आणि १५ लाख रुपयांच्या चांदीच्या दागिन्यांचा समावेश होता. फिर्यादीला बंदुकीचा धाक दाखवणारा मुख्य सूत्रधार जितेंद्र असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.




### मुद्देमालाचा शोध-

या प्रकरणातील पहिली अटक ७ ऑगस्ट रोजी खामगाव येथिल शुभम चांदूरकर याच्या रूपाने झाली होती, त्याच्या पोलिस कोठडीची मुदत दि.१३ ऑगस्ट रोजी संपत आहे. दरम्यान, मुख्य सूत्रधार जितेंद्रला अटक केल्यानंतर दर्यापूर पोलिसांनी अकोला आणि इतर ठिकाणी रिकव्हरीसह अन्य आरोपींच्या अटकेसाठी धावपळ सुरू केली आहे. घटनेला १२ दिवस उलटून गेले तरी अद्याप चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे ६५ लाखांचा ऐवज जप्त करणे आणि उर्वरित दरोडेखोरांना अटक करणे हे पोलिसांसमोर सर्वात मोठे आव्हान आहे.

# अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांच्या वाढदिवसानिमित्त आज विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

**अचलपूर/प्रतिनिधी:-** अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांच्या वाढदिवसानिमित आज १४ ऑगस्ट रोजी अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सकाळी ७ वाजता प्रसिद्ध श्री सैतूत बाग येथे गौमातेचे पूजन केले जाणार आहे .त्यानंतर सकाळी ९ वाजता अंध विद्यालय धोतरखेडा येथे सदिच्छा भेट दिली जाणार आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना



भोजन वितरण , विसावा वृद्धाश्रम मध्ये वृद्ध मंडळींना भोजन ,परतवाडा शहरात वृक्षारोपण आणि परतवाडा शहरातील अचलपूर नगर परिषद मध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीती म्हणून अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,मेळघाट मतदार संघाचे आमदार केवळराम काळे,माजी आमदार प्रभूदास भिलावेकर,भाजपा पक्षाचे नेते गजानन कोल्हे,भाजपा पक्षाचे जिल्हा महामंत्री सुधीर रसे,मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांची उपस्थितीती राहणार आहे.


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

## टी.सी.हरविली आहे

अनुज महेंद्र राऊत याची टि.सी. मुदलीयार नगर ते मालटेकडी या साईडला हरविली आहे.४थी/७वी/१० वी आणि पॉलिटेक्नीक ची शेवटच्या वर्षाची टि.सी.होती. ज्याला सापडल्यास त्यांनी **मो. ८६००४४०३४७** या नंबरवर संपर्क साधावा.

### TENDER NOTICE
**(Supply and Installation of Weight Bridge 60 MT Including Civil works)**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Jatubaba Gramin Shetkari Producer Company Limited, Dharni, Ta Dharni, Dist. Amravati)** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, www.smart-mh.org, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **24/08/2026 up to 11.00 AM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**(Jatubaba Gramin Shetkari Producer Company Limited, Dharni, Ta Dharni Dist. Amravati,**

### TENDER NOTICE
**Supply and Installation of Weighing Bridge 60 MT Including Civil works**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Teosa Farmer Producer Company Limited Ta Teosa Dist Amravati is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, www.smart-mh.org, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **17/08/2026 up to 6.00 PM.** Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Tender Submission- Mamarpan Niwas Near Shree Ganesh Lakshmi park, Sub District Hospital Daryapur, Greenluck Fpcl Daryapur, Amravati 444803 Pre-bid Meeting & Opening place District Implementation Unit, SMART Project Dist. AMRAVATI**
**DSAO Office Campus, Visava Colony, Old Bypass Road, Amravati 444602**

### जाहीर नोटीस
**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, अमरावती**

क्र.न.भू.-१/अपील अर्ज एस.आर.क्र.२३७६/२०२३ अमरावती दिनांक ११.०८.२०२६

प्रति,
श्री.भानुदास पुंडलिकराव बनकर
रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती — **अपिलार्थी**

-- विरुध्द --

१. उपअधीक्षक भूमि अभिलेख, चांदूर रेल्वे
२. श्री.रामभाऊ जयराम बनकर (मयत)
३. सौ.इंदिरा रामराव बनकर (मयत)
२ व ३अ) ज्योती दिपकराव कपाडे
रा.३४२ए महात्मा गांधी नगर, हुडकेश्वर रोड, हनुमान मंदिर रोड, नागपूर
२ व ३ब) सौ.चंदाताई बाळासाहेब गावंडे
रा.पंचवटी मेन रोड, नेताजी चौक, चांदूर बाजार
२ व ३क) चंद्रकांत रामभाऊ बनकर
रा.चांदोरे नगर, धामणगांव रोड, यवतमाळ
२ व ३ड) महेंद्र रामभाऊ बनकर
रा.मघलाई नगर, पाणी टाकीजवळ, हुडकेश्वर रोड, हनुमान मंदिर रोड,नागपूर
२ व ३इ) सुरेंद्र रामभाऊ बनकर
रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
४. सौ.कुसूम निळकंठराव बनकर (मयत)
४अ) पुष्पाबाई भास्कर पुनसे (बनकर)
रा.केव कॉलनी शेगांव रहाटगांव रोड, गुप्ता सिमेंटच्या मागे, अमरावती
४ब) सौ.अलकाबाई रमेश बंबल
रा.स्वामी समर्थ ध्यान केंद्र, रहाटगांव, अमरावती
४क) सौ.प्रतिभा सिध्दार्थ वानखडे
रा.शिक्षक कर्मचारी वसाहत, शैक्षणिक बोर्ड जवळ टोपे नगर, अमरावती
४ड) मनोज निलकंठराव बनकर
रा.गाडगेबाबा मंदिराच्या मागे, गाडगेनगर, अमरावती
४इ) सुधीर निलकंठराव वानखडे
रा.७४ए चिमोटे लेआऊट जुना बायपास दस्तुर नगर, अमरावती
५. श्री.प्रभाकर हिंमत देशमुख
रा.चारणगांव (देशमुख) ता.बाळापूर, जि.अकोला
६. श्री.चंद्रकांत रामभाऊ बनकर
रा.घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती — **उत्तरार्थी**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे घुईखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील सर्व्हे नं.७८/२ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी नं.२ व ३अ ते ३इ, ४अ ते ४इ आणि ५ व ६ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसल्यामुळे उत्तरार्थी यांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक ०९.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ११.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का
**(महेशकुमार शिंदे)**
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख,अमरावती

प्रो.क्र.७०/२०२६

### वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस
**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक ७०/२०२६ ने.ता.१५.०९.२०२६

**अर्जदार :** १. **देविदास मारोतराव लेवडकर,** वय ७४ वर्षे, व्यवसाय-मजुरी
रा.साउर, ता.भातकुली, जि.अमरावती
२. **पुष्पा ओंकारराव पेढेकर,** वय ६३ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.गोपगव्हाण, अलगांव, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **मारोतराव राजारामजी लेवडकर** हे दि.०५.०३.१९९६ रोजी मयत झाले. आणि **यशोदा मारोतराव लेवडकर हे दि.१४/०६/१९९८ रोजी मयत झाले.** अर्जदार देविदास मारोतराव लेवडकर, वय ७४ वर्षे, व्यवसाय- मजुरी, रा.साउर, ता.भातकुली, जि.अमरावती व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२८.०७.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **मारोतराव राजारामजी लेवडकर आणि यशोदा मारोतराव लेवडकर** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **मारोतराव राजारामजी लेवडकर आणि यशोदा मारोतराव लेवडकर** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ३०.०७.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,भातकुली
दि.३०/०७/२०२६

प्रो.क्र.७०४/२०२६

### वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस
**मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक २६२/२०२६ ने.ता.१५.०९.२०२६

**अर्जदार :** १. **देविदास शालीकराम चव्हाण,** वय ५६ वर्षे, व्यवसाय-मजुरी
२. **भास्कर शालीकराम चव्हाण,** वय ५६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. **पुष्पा दिलीपराव चव्हाण,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
४. **सचिन दिलीपराव चव्हाण,** वय ३५ वर्षे, व्यवसाय - मजुरी
५. **नितिन दिलीपराव चव्हाण,** वय ३२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
अर्जदार क्र.१ ते ५ रा.साउर, ता.भातकुली, जि.अमरावती
६. **प्रभावती सुधाकर चव्हाण,** वय ५९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
७. **सविता संजय सोळंके,** वय ४२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
दोन्ही रा.वार्ड नं.३, मु.पो.धारणी, ता.धारणी, जि.अमरावती
८. **सुनिल सुधाकर चव्हाण,** वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.महात्मा फुले नगर, नवसारी, व्हीएमव्ही, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा **सुलोचना शालिकराम चव्हाण हे दि.१५.०६.२०१९ रोजी मयत झाले.** अर्जदार **देविदास शालीकराम चव्हाण, वय ५६ वर्षे, व्यवसाय-मजुरी,रा.साउर,ता.भातकुली,जि.अमरावती व इतर यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा,१८२७ चे कलम २ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता** या न्यायालयामध्ये दि.**२८.०७.२०२६** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत **सुलोचना शालिकराम चव्हाण** यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत **सुलोचना शालिकराम चव्हाण** यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ३०.०७.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,भातकुली
दि.३०/०७/२०२६

### विद्यमान दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालय,नांदगाव खंडेश्वर

कि.दि.अ.क्र.१८७/२०२६ ने.ता.१६/०९/२०२६

**अर्जदार :-** १. **श्रीमती भामा रामदास मेश्राम (पत्नी)**
वय ७२ वर्षे, व्यवसाय-गृहिणी
रा.मुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **श्री त्रिशरण रामदास मेश्राम (मुलगा),** वय ३९ वर्षे, व्यवसाय- शेतकरी
रा.मुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. **श्री निलेश रामदास मेश्राम (मुलगा),** वय ३९ वर्षे, व्यवसाय- शेतकरी
रा.मुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. **सौ.लिना धवन रामटेके (मुलगी),** वय ४५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
रा.पिंपळगाव डूब्बा, ता.नेर, जि.यवतमाळ
५. **सौ.पद्मा हंसराज चंद्रकापुरे (मुलगी)**
वय ४७ वर्षे, व्यवसाय-गृहिणी
रा.शिवणगाव, ता.तिवसा, जि.अमरावती

विरुध्द

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्याअर्थी वरील नमूद अर्जदारांनी या न्यायालयात मुंबई अधिनियम (८) १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दि.०२.०७.२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रमांक १ यांचे पती व अर्जदार क्रमांक २ ते ६ यांचे वडिल स्व. रामदास फत्तुजी मेश्राम, रा.मुंडवाडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती हे दि.१५.०७.२०२० रोजी मुंडवाडा येथे मरण पावले. तसेच अर्जदारांनी नमुद केल्याप्रमाणे मृतकांच्या पश्चात वरील अर्जदार हेच कायदेशिर वारसदार असून त्यांना वारसप्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. म्हणून, या न्यायालयात जो कोणी व्यक्ती वरील वारस प्रमाणपत्र देण्यास हरकत घेऊ इच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक **१६/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकिलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर जाहीरनामा दिनांक ०७/०८/२०२६ रोजी दिला आहे.

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,**
**नांदगाव खंडेश्वर**

### जाहीर नोटीस
**विद्यमान जिल्हा न्यायाधीश-१,तथा अतिरिक्त सत्र न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १६/२०२६** **ने.ता.२४.०८.२०२६**

**अर्जदार -** १. **अनिता विलासराव तंतरपाळे,** वय ४० वर्षे, धंदा- गृहिणी
२. **आकांशा विलासराव तंतरपाळे,** वय १६,धंदा-शिक्षण
अ.पा.कर्ता आई या नात्याने अर्जदार क्र.२ करीता
अर्जदार क्र.१ अनिता विलासराव तंतरपाळे दोन्ही
ह.मु. रा.विष्णोरा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार -** निरंक

**हिंदू अज्ञानाचा संगोपन कायदा १९५६ चे कलम ८ (२) अंतर्गत अर्जदार क्र.१ अ.पा.क.म्हणून अर्जदार क्र.२ हिच्या सामाईक हिश्यावर येत असलेल्या शेतजमिनीची विक्री करण्यास परवानगी मिळण्याबाबत.**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी नावे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरिता वि.जिल्हा न्यायाधिश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधिश, वरुड यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजा- विष्णोरा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील भूमापन क्र.व उपविभाग क्र.१२६/२, भोगवटदार वर्ग - १,आकार रु. ५.००/- एकुण क्षेत्रफळ ०.८३ हे.आर.असून सदर शेतजमीन तदंगभूतवस्तुंसह, झाडाझुडुपासह व दगडमातीसह असून याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे :-**

पूर्वेस - विष्णोरा ते उदखेड पांदण रस्ता
पश्चिमेस - विष्णोरा ते खेडाफाटा डांबरी रस्ता
उत्तरेस- ज्ञानेश्वर पंजाबराव कडू यांचे शेत
दक्षिणेस - विष्णोरा ते उदखेड पांदण रस्ता

त्या अर्थी कोणास सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, त्यांनी **दिनांक २४-०८-२०२६ रोजी सकाळी १०.३०वाजता वि.जिल्हा न्यायाधिश-१, व अतिरिक्त सत्र न्यायाधिश, वरुड जि.अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलांमार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज **दिनांक १२.०८.२०२६** रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला.

शिक्का
**आदेशानुसार**
**प्र.अधीक्षक,**
**जिल्हा न्यायालय-१,वरुड**

### सायटेशन/जाहीरनामा
**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. /२०२६ ने.ता.

**अर्जदार -** १. **श्रीमती गुंफा अनिल कुरवाडे,** वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
२. **रितेश अनिलराव कुरवाडे,** वय २० वर्षे, धंदा - शिक्षण
३. **कु.समिक्षा अनिल कुरवाडे,** वय २३ वर्षे, धंदा - शिक्षण
सर्व रा.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदार क्र.१ चे पती तर अर्जदार नं.२ व ३ चे वडिल नामे अनिल पंजाबराव कुरवाळे (कुरवाडे) हे दिनांक ०९/१२/२०२५ रोजी P.D.M.C. Hospital, Amravati, Tq. & Dist. Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे.तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक-**

शिक्का
आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार दर्यापूर

**रा.मा.क्र./एम.आर.सी./जन्म-मृत्यू/१०८/२०२६** **दि.०६/०८/२०२६**

#### जाहीरनामा

**अर्जदार :-** **मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ**
रा.दारापुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

विरुध्द

**गैरअर्जदार :-** **निबंधक, ग्रामपंचायत दारापुर, ता.दर्यापूर, जि. अमरावती**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की,**अर्जदार मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ हे दारापूर, ता.दर्यापूर,जि.अमरावती** येथे वास्तव्यास असतात. अर्जदार यांचा जन्म दि.०१/०७/१९५९ रोजी त्यांच्या राहत्या घरी दारापुर, ता.दर्यापूर,जि.अमरावती येथे झाला. **निबंधक जन्म-मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय, दारापुर,ता.दर्यापूर,जि.अमरावती** येथे जन्माची नोंद घेतली गेली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३(३) अन्वये जन्माच्या नोंदीचा आदेश होणेबाबत या न्यायालयात प्रस्ताव/ प्रकरण दाखल झाले आहे.

ज्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार दर्यापूर येथील दाखल प्रस्तावातील/ प्रकरणातील अर्जदार-मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ, दारापुर, ता.दर्यापूर,जि.अमरावती यांच्या जन्म दिनांकास व ठिकाणास आक्षेप किंवा हरकत असल्यास दि.२५/०८/२०२६ पर्यत स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत येवुन आक्षेप किंवा हरकत, न घेतल्यास सदहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोद घेण्याचा आदेश सदर निबंधकाला देण्यात येईल.

आज दि.१०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का
**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार, दर्यापूर**

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.आर.आर.खामतकर,४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६३१/२०२६**
**सतीदर +१४ - वि.- निरंक**
**पुढील ता.०९.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-** १. **सतिंदर मनजित सिंग,** वय ७८ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.१६२/१,आशियाना, मस्जिद लेन, अश्वथ नगर, बंगलोर (उत्तर) बंगलौर, कनार्टक
२. **परमजीत कौर,** वय ७४ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.फ्लॅट नं.१३०५, टेक्ट्रा ब्लॉक, एम.जे.आर. वॉटरमार्क अपार्टमेंट शुभ एनक्लेव्ह, हरलूर रोड, अंबालीपुरा, बंगलोर, कर्नाटक
३. **मनधीरसिंह हरबन्ससिंह नंदा,** वय ७२ वर्षे, व्यवसाय-व्यापार
रा.बडनेरा रोड, साईनगर परिसर, साई नगर, अमरावती
४. **रिता धाम,** वय ६८ वर्षे, व्यवसाय-घरकाम
रा.१-२-३३३/सी.सी.१ ला मजला, स्ट्रीट नं.६, डोमालगुडा, हैद्रांबाद, हिमायतनगर, हैद्राबाद, आंध्रप्रदेश
५. **हरीन्दरपाल सिंह हरबन्ससिंह नंदा,** वय ७२ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.मोहिनी हॉटेल, बडनेरा रोड, नेमाणी गोडाऊन जवळ, साई नग, अमरावती
६. **दिवाण विगमजित सिंग हरबन्ससिंग नंदा,** वय ६९ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.मोहिनी हॉटेल, बडनेरा रोड, ६७८, नेमाणी गोडाऊन जवळ, साई नगर, अमरावती
७. **राजेंन्द्रपाल हरबन्स सिंग नंदा,** वय ६६ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.बडनेरा रोड, नेमाणी गोडाऊन जवळ, मोहीनी गार्डन रेस्टॉरन्ट, साई नगर, अमरावती
८. **आतमजीत कौर स्वरनजीत सिंग आनंद,** वय ६३ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा. पार्क आयव्हरी, फ्लॅट ई -५०३, पार्क स्ट्रीट, काळेवाडी फाटा जवळ, वाकड, पुणे
९. **इंद्रजीत कौर प्रदीप जीवन,** वय ६२ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा. तळमजला, दर्शनाम अपार्टमेंट, स्वामीनारायण मंदिर जवळ, दादरा ॲड नगर हवेली, सिलवासा
१०. **बलजीत कौर,** वय ५९ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.३७/४ए, डबल स्थोरी, अशोक नगर, तिलक नगर, वेस्ट दिल्ली, दिल्ली
११. **रणबीर कौर अमरज्योती सिंग ओबेरॉय,** वय ५७ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.शिवाजी चौक, जुना बस स्टॅन्ड, वाशिम
१२. **गुरमिन्दर सिंग नंदा,** वय ५७ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.जीएफ-०२, शेगाव नाका, विनस पार्क, अमरावती
१३. **रामिन्दर सिंह हरबन्ससिंग नंदा,**वय ५६ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.बडनेरा रोड, नेमाणी गोडाउन जवळ, मोहीनी गार्डन रेस्टॉरन्ट, साई नगर, अमरावती
१४. **महिंद्रपाल सिंग हरबन्ससिंग नंदा,** वय ५५ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.हॉटेल मोहिनी, निंभोरा रोड, बडनेरा रोड, नेमाणी गोडाउन जवळ, साईनगर, अमरावती
१५. **सुरेंद्रपालसिंग हरबन्ससिंग नंदा,** वय ५४ वर्षे, व्यवसाय- व्यापार
रा.बडनेरा रोड, हॉटेल मोहिनी, नेमाणी गोडाउन, साई नगर, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत हरबन्स सिंह सोहनसिंग नंदा** हे दिनांक **१३.०७.२०१०** रोजी **अमरावती** येथे मयत झाले व **सतवंत कौर हरबन्स सिंह नंदा** हया दि. १७.०७.१९९१ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. **अर्जदार सतिंदर मनजित सिंग +१४** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सतिंदर मनजित सिंग +१४** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

### जाहीर नोटीस
**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी. क्रमांक २४०/२०२५ ने.ता.०९.०९.२०२६

**अर्जदार - रेखा अशोक नेताम**

-- विरुध्द --

**गैरअर्जदार - शेख जुनेद शेख हुसामुद्दीन व ईतर**

**गैरअर्जदार -** १. मुमताज खान अहेमद खान, रा.हबीबपुरा, चांदणी चौक, अमरावती
२ मोहम्मद असरार शेख कलीम, रा.हैदरपुरा. बाबा चौक, अमरावती
३. अस्मिता अशोक नेताम, रा.पुष्पराज कॉलनी,
सातुर्णा साईनगर, अमरावती

**Application U/Sec.166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **रेखा अशोक नेताम** यांनी जिल्हा व सत्र न्यायालय-०१, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.१ **मुमताज खान अहेमद खान, २. मोहम्मद असरार शेख कलीम, ३. अस्मिता अशोक नेताम** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **०९.०९.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०३.०८२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक ०३.०८.२०२६

शिक्का
आदेशान्वये,
प्र.सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार दर्यापूर

**रा.मा.क्र./एम.आर.सी./जन्म-मृत्यू/११०/२०२६** **दि.०६/०८/२०२६**

#### जाहीरनामा

**अर्जदार :-** **मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ**
रा.दारापुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

विरुध्द

**गैरअर्जदार :-** **निबंधक, ग्रामपंचायत दारापुर, ता.दर्यापूर, जि. अमरावती**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की,**अर्जदार मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ हे दारापूर,ता.दर्यापूर,जि.अमरावती** येथील रहिवासी असून दारापुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे वास्तव्यास असतात. अर्जदार यांच्या वडिलांचा मृत्यू दि.१८/०२/१९९० रोजी त्यांच्या राहत्या घरी दारापुर, ता.दर्यापूर,जि.अमरावती येथे झाला. **निबंधक जन्म-मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय, दारापुर,ता.दर्यापूर,जि.अमरावती** येथे मृत्यूची नोंद घेतली गेली नाही. अर्जदाराला उपरोक्त मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३(३) अन्वये जन्माच्या नोंदीचा आदेश होणेबाबत या न्यायालयात प्रस्ताव/ प्रकरण दाखल झाले आहे.

ज्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार दर्यापूर येथील दाखल प्रस्तावातील/ प्रकरणातील अर्जदार-मोहम्मद शफी मोहम्मद युसुफ, दारापुर, ता.दर्यापूर,जि.अमरावती यांच्या वडिलांच्या मृत्यू दिनांकास व ठिकाणास आक्षेप किंवा हरकत असल्यास दि.२५/०८/२०२६ पर्यत स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत येवुन आक्षेप किंवा हरकत, न घेतल्यास सदहू अर्जदार यांची साक्ष घेवून जन्म नोद घेण्याचा आदेश सदर निबंधकाला देण्यात येईल.

आज दि.१०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

शिक्का
**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार, दर्यापूर**

मजलिस ए मदरसा ए सैफिया संस्था (F-17) अमरावती द्वारा

### उर्दु प्रायमरी सैफिया स्कूल,

पॅराडाईज कॉलनी वलगांव रोड, अमरावती
(अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त १०० टक्के अनुदानित प्राथमिक शाळा)

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक व्यावसायिक पात्रता | संवर्ग | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण सेवक (प्राथमिक) वर्ग १ ते ४ | ०१ | HSC/D.Ed. TET/CTET उत्तीर्ण | खुला | शासन नियमानुसार |

वरील रिक्त पदांसाठी ईच्छुक उमेदवारांनी दिनांक २९.०८.२०२६ रोजी शैक्षणिक अर्हता प्रमाणे सर्व कागदपत्राचे झेरॉक्स आणि मूळ प्रमाणपत्र व अर्जासह स्वखर्चाने उर्दु प्रायमरी सैफिया स्कूल, पॅराडाईज कॉलनी, अमरावती शाळेच्या कार्यालयात दुपारी ०३.०० वाजता मुलाखतीकरीता उपस्थित रहावे.

अध्यक्ष / सचिव
मजलिस ए मदरसा ए सैफिया संस्था, वलगांव रोड, अमरावती

मुख्याध्यापक,
उर्दू प्रायमरी सैफिया स्कूल
अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 95/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **जीविन चॅरिटेबल ट्रस्ट आनंद नगर, अमरावती ता.जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.विनीत सचिन याऊल**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**(डी.बी.गायकवाड)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती


जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### पीडीएमसीमध्ये 'जागतिक अवयवदान दिन' उत्साहात

**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे 'जागतिक अवयवदान दिन' कार्यक्रमाचे आयोजन शरीररचना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय अवयवदान नोंदणीमध्ये नोंदणी करून अवयवदानाची प्रतिज्ञा करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अवयवदानामुळे अवयव निकामी झालेल्या तसेच दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना जीवनाची एक नवी संधी मिळू शकते. मृत्यूनंतर अवयवदानाचा निर्णय घेतल्यास अनेक गरजू रुग्णांचे जीवन वाचविण्यास मोलाची मदत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.अवयवदाता म्हणून नोंदणी करून प्रत्येक व्यक्ती समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देऊ शकते आणि गरजू रुग्णांना जीवनाची नवी भेट देऊ शकते. त्यामुळे अवयवदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे,डॉ. अनंत काळबांडे, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परिचारिका आणि विद्यार्थी उपस्थित होते.



### डॉ.विक्रम साराभाई जयंतीनिमित्त अभिवादन

**मोशी-** पीपल्स एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित सरस्वती विद्यानिकेतन खानापूर येथे अनु संसाधन सशक्त बनविण्याचे प्रेरणास्थान असलेले डॉ. विक्रम साराभाई यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक प्रवीण राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी विद्यालयामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी डॉ. विक्रम साराभाई यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. ज्या पद्धतीने स्वतःच्या घरीच प्रयोगशाळा तयार करून इस्रोला नवी दिशा दाखवली त्यांच्या पावलावर पाऊल टाकून भारतामधील अनेक शास्त्रज्ञांनी जगाच्या भारताची अनुक्षेत्रात ओळख निर्माण करून देण्याकरिता प्रेरणास्त्रोत ठरले त्यांच्या जन्मदिनी अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनावरती प्रकाश टाकला विज्ञान शिक्षक गजानन कडू यांनी डॉ. विक्रम साराभाई यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला,त्यावेळी शाळेतील शिक्षक मोहन मानकर, अर्चना घोंगडे,गजानन कडू, श्याम पाचपोर, अतुल वाकोडे निलेश वानखडे, वैभव खाडे, पन्नालाल सूर्यवंशी, कविता पाटील, वैशाली पवार,प्राची राऊत, राधिका भडांगे सह सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



### अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी साजरी

**धामणगाव रेल्वे-** स्व. रामभाऊ गुल्हाने माध्यमिक विद्यालय, निंबोली (भोंगे) येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यातून न्याय,समता,लोककल्याण,स्त्रीशक्ती आणि समाजसेवेचा आदर्श निर्माण केला.सर्वसामान्यांच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.या प्रसंगी उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अहिल्यादेवींच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.



### पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'Safe Student, Strong Future' उपक्रम

अमरावती - विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करून त्यांना आत्मविश्वासाने आणि जबाबदारीने वावरण्यास सक्षम करण्याच्या उद्देशाने पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'Safe Student, Strong Future' या विशेष जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वैयक्तिक सुरक्षितता,शरीरासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहे. याचे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.'आरोग्य सुरक्षित राहिल्याने भविष्याची पायाभरणी होते' हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यां देण्यात आला.या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे,उपप्राचार्या सोनल निस्ताने तसेच शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नीलिमा केनी व सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अंजनगाव सूर्जीच्या नगरसेवकांचा गोंधळ उघड

# सभागृहात प्रश्न मांडण्याऐवजी आढावा बैठकीत प्रश्नांची खैरात

## प्रशिक्षणाअभावी नगरसेवकांचे पितळ उघडे

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी शहरातील नागरिकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी आमदार गजानन लवटे यांनी १२ ऑगस्ट रोजी अंजनगाव नगरपरिषदेत विशेष आढावा बैठकीचे आयोजन केले होते. नागरिकांचे प्रश्न प्रशासनाकडून मार्गी लागावेत हा या बैठकीमागचा उद्देश होता. मात्र प्रत्यक्षात या बैठकीत नागरिकांचे प्रश्न सुटण्याऐवजी नगरसेवकांनीच आपले वैयक्तिक आणि सभागृहातील प्रश्न आमदारांसमोर मांडण्यास सुरुवात केल्याने बैठकीचा नूरच पालटला. यामुळे सध्या अंजनगाव सुर्जी शहरात जोरदार चर्चा रंगली आहे.

नागरिकांनी आपापल्या प्रभागातील रस्ते, पाणी, स्वच्छता, दिवाबत्ती यासारखे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी विश्वासाने नगरसेवकांना नगरपरिषद सभागृहात पाठविले आहे. मग नगरसेवकांचे स्वतःचेच प्रश्न सुटत नाहीत का? असा सवाल आता सामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. आमदारांच्या आढावा बैठकीत काही नगरसेवकांनी दांडी मारली तर काही नगरसेवक या सभेत उपस्थित होते त्यापैकी काही नगरसेवकांनी जे प्रश्न सभागृहात उपस्थित करायला पाहिजे ते प्रश्न आढावा बैठकीत उपस्थित केले. या घडलेल्या प्रकारामुळे नवनिर्वाचित नगरसेवकांच्या अभ्यासाचा अभाव चव्हाट्यावर आला आहे. महाराष्ट्र



नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ नुसार नगरपरिषदेचे कामकाज चालते. सभागृहात प्रश्न मांडण्याची एक निश्चित आणि अधिकृत प्रक्रिया आहे.

तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न,अल्पसूचना प्रश्न ,लक्षवेधी सूचना असे प्रकार असून कोणताही प्रश्न सर्वसाधारण सभेत मांडण्यापूर्वी ७ ते ८ दिवस अगोदर लेखी स्वरूपात नगरपरिषद प्रशासनाकडे दाखल करणे बंधनकारक आहे. प्रश्न मांडतानाही त्याला काही मर्यादा असतात आणि प्रश्न नाकारण्याचे सर्व अधिकार सभागृहाच्या अध्यक्षांना असतात. याच नियमानुसार कामकाज चालवून शहराच्या विकासाचे विषय मार्गी लावले जातात. मात्र, नवनिर्वाचित नगरसेवकांना अद्याप या कामकाज पद्धतीचे कोणतेही अधिकृत प्रशिक्षण मिळालेले नाही. त्यामुळे प्रभावी पद्धतीने अभ्यासपूर्वक मुद्दे सभागृहात मांडून ते सोडवून घेण्यात अनेक नगरसेवक कमी पडत आहेत. याच कारणामुळे काही नगरसेवकांना आढावा बैठकीत आमदार लवटे यांच्याकडे थेट आपले प्रश्न मांडण्याची वेळ आली, असे बोलले जात आहे.तज्ज्ञांच्या मते, नवनिर्वाचित नगरसेवकांसाठी तातडीने अभ्यास दौरा आणि सभागृह कामकाजाचे सखोल प्रशिक्षण आयोजित करणे अत्यंत गरजेचे आहे. नगरसेवकांनी कायद्याचा अभ्यास करून नागरिकांच्या हिताचे प्रश्न सभागृहात लावून धरल्यासच शहराचा विकास साध्य होईल.

दरम्यान, १२ ऑगस्टच्या आढावा बैठकीचा मूळ उद्देश बाजूला राहून आता शहरात नागरिकांच्या प्रश्नांऐवजी नगरसेवकांच्या प्रश्नांचीच जास्त चर्चा होताना दिसत आहे.

### प्रा.आनंद घुगे यांना आचार्य पदवी प्रदान

**दर्यापूर -** ग्रामीण भागातील नामांकीत काशीबाई अग्रवाल विद्यालय व भाऊसाहेब देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, येवदा येथे गेल्या २१ वर्षापासून कार्यरत असलेले भूगोल, राज्यशास्त्र, पर्यावरण विषयाचे गाढे अभ्यासक उच्च विद्याविभूषित प्रा. आनंद बाबुराव घुगे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड द्वारा भूगोल विषयात आचार्य पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'मेळघाटातील कुपोषण व शासकीय आरोग्य सुविधांचा भौगोलिक अभ्यास' या विषयावर प्रा. डॉ. प्रकाश मोरखंडे जि.लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन कार्य पूर्ण केले. त्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मानवविज्ञान शाखेतील भूगोल विषयात आचार्य पदवी घोषित केली.तसेच विषयतज्ञ म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष



डॉ. आप्पाराव काळगापुरे, माजी प्राचार्य डॉ. बी जी. वेळापूरकर डॉ. माळी, माजी सह संचालक (नांदेड )डॉ बी पी लहाने, प्राचार्य डॉ. गोणे डॉ. अनिल शिंदे,डॉ केंद्रे डॉ बावलगावे यांच्यासह भूगोल अभ्यासक प्राध्यापक, विध्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. जिल्ह्यातील मेळघाट मधील ज्वलंत समस्येशी निगडित विषयावर संशोधन कार्य केल्यामुळे त्यांचे शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांसह येवदा शिक्षण संस्था, येवदा चे अध्यक्ष मधुसूदन ठाकूर,सचिव हर्षराज देशमुख, कोषाध्यक्ष प्रदीप देशमुख, सर्व संचालक, प्राचार्य प्रदीप नि. देशमुख,उप प्राचार्य मोहम्मद अतहर, पर्यवेक्षक प्रा. किशोर थोटे, सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह अनेकांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

## सैयद आतिब अमनचे जेईई मेनमध्ये घवघवीत यश

### अंजनगाव तालुक्यात पहिलाच मान

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी येथील विद्यार्थी सैयद आतिब अमन याने देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या (जेईई मेन) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याने ९६.२२ पर्सेंटाईल गुण मिळवत या यशाच्या जोरावर देशातील प्रतिष्ठित राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (NIT), श्रीनगर येथे प्रवेश मिळवला आहे.



जेईई मेन ही भारतातील IIT, NIT आणि इतर नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा आहे. ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (NTA) मार्फत घेतली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेत सहभागी होतात.आतिबच्या या यशामुळे अंजनगाव सुर्जी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सैयद आतिब अमन हा अंजनगाव सुर्जी येथील प्रसिद्ध राबिया क्लिनिकचे संचालक डॉ. सैयद आतिक यांचा सुपुत्र आहे. या यशाचे श्रेय त्याने आपले आई-वडील, शाळेतील शिक्षक आणि मार्गदर्शकांना दिले आहे.

डॉ. सैयद आतिक यांच्यासह संपूर्ण कुटुंबावर आणि अंजनगाव सुर्जीकरांवर सध्या सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागात सुविधा कमी असतानाही जिद्द आणि मेहनत असेल तर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवता येते, हे आतिबने दाखवून दिले आहे.

### चंदनशेष महाराज मंदिरात नागपंचमी उत्सवास प्रारंभ

**अंजनगाव बारी-** परिसरातील प्रमुख नागमंदिर म्हणून प्रसिद्ध असलेल्या चंदनशेष महाराज मंदिरात नागपंचमी



महोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून नागपंचमी उत्सवानिमित्त उत्सवापूर्वीच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.चंदनशेष महाराजांचे पुरातन मंदिर अंजनगाव बारी येथील स्व. भारतसिंग परिहार यांच्या घराच्या परिसरात होते.

परिहार कुटुंबीयांकडून पिढ्यानपिढ्या चंदनशेष महाराजांची सेवा केली जात असल्याचे सांगितले जाते. नागपंचमीच्या पर्वावर मंदिर परिसराची रंगरंगोटी करून तोरणे व पताका लावण्यात येतात. भजन-कीर्तनामुळे परिसरातील वातावरण भक्तिमय होते. सूर्योदयापूर्वी उत्सवाच्या वेळी देवतेची भव्य आरती करण्यात येते. यावेळी दही, दूध, लाह्या, नारळ आदी प्रसादाचे वाटप केले जाते.मंदिर परिसरातील वारुळांची पूजा करण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. गेल्या सुमारे पाचशे वर्षांपासून अंजनगाव बारी परिसरात 'बाऱ्या' म्हणण्याची प्रथा असल्याचे सांगितले जाते. या बाऱ्यांमध्ये गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होतात.नागपंचमी उत्सवाची सांगता भव्य महाप्रसादाच्या आयोजनाने करण्यात येते. या उत्सवानिमित्त परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होऊन चंदनशेष महाराजांचे दर्शन घेतात.

## भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात पद्मश्री डॉ.एस.आर.रंगनाथन जयंती उत्साहात



**अमरावती/का.प्र.**

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या परतवाडा ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांची १३४ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सतीश भागवत, तर ग्रंथपाल डॉ. प्रफुल कडू यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर ग्रंथपाल डॉ. प्रफुल कडू यांनी प्रास्ताविकातून डॉ. रंगनाथन यांनी मांडलेल्या 'ग्रंथालयशास्त्राच्या पंचसूत्रांची' (Five Laws of Library Science) माहिती दिली.

प्रमुख वक्ते डॉ. सतीश भागवत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचनाची सवय ही व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी 'संत आपले गुरु आणि ग्रंथही आपले गुरु' या विचाराचे महत्त्व अधोरेखित केले. पुस्तके ही केवळ ज्ञानप्राप्तीची साधने नसून ती व्यक्तीला संस्कार, विचार आणि जीवनदृष्टी देणारी मार्गदर्शक असतात.असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रा.डॉ. रवींद्र खंडेराव, प्रा.डॉ. प्रमोद गारुडे, प्रा.डॉ. नंदकुमार धोंडगे,प्रा.डॉ. दयाश्री कोकाटे, तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, तासिका तत्त्वावरील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार राजेश शर्मा यांनी केले.उत्साहपूर्ण आणि ज्ञानवर्धक वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागामध्ये सहअभ्यासक्रम सुरू

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत पदवी अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहअभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये आरोग्य, योगशिक्षण, क्रीडा व शारीरिक तंदुरुस्ती, सांस्कृतिक उपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना तसेच ललित, उपयोजित, दृश्यकला व प्रयोगशील कला असे विविध पर्याय उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना निवडलेल्या सहअभ्यासक्रमाच्या माध्यमातून नियमित शिक्षणासोबत आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि जीवनकौशल्यांशी संबंधित ज्ञान व अनुभव मिळतो. बी.एस.सी.डेटा सायन्सच्या विद्यार्थ्यांनी योगशिक्षण हा सहअभ्यासक्रम निवडल्याने त्यांना योगशास्त्रविषयाच्या सैध्दांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष योगाभ्यासाचे मार्गदर्शन आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील एम.ए योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्राध्यापकांकडून दिले जात आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांची प्रेरणा आणि एमसीए विभागाचे संचालक डॉ.मो.अतिक अहमद यांच्या सहकार्याने हे वर्ग घेण्यात येत आहेत. प्रा.स्वप्निल मोरे, प्रा. प्रफुल्ल गांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना योगासने,




प्राणायाम,ध्यान, शिथिलीकरण तंत्रे, तणाव व्यवस्थापन आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबत सैध्दांतिक तसेच प्रात्यक्षिक मार्गदर्शन दिले जात आहे.

योग शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीला पूरक असून विविध कौशल्ये आत्मसात करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रभावी शिक्षण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी योग शिक्षण हा अभ्यासक्रम आवर्जून घ्यावा. विद्यापीठातील इतर विभागांना सहअभ्यासक्रम अंतर्गत योग शिक्षण हा विषय सुरू करावयाचा असल्यास, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाशी संपर्क साधावा व या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.

# हरिनामाच्या गजरात वृक्षसंवर्धनाचा संदेश; वृक्ष दिंडी उत्साहात

## गो. सी. टोम्पे महाविद्यालयाच्या महिला समिती व राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

**चांदूर बाजार/वार्ताहर**

संत शिरोमणी श्री. नामदेव महाराज यांच्या ६७६ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार येथील महिला समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातून वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले. पालखी, भजन मंडळी, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहभागाने काढण्यात आलेल्या या दिंडीत ताल-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष करीत 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा' हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात आला.

गो. सी. टोम्पे पब्लिक ट्रस्टचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे व प्रा. डॉ. विजय टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके आणि उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर गव्हाळे, डॉ. सुमित इंगळे यांच्या सहकार्याने हा उपक्रम उत्साहात पार पडला.यावेळी मुख्य अतिथी म्हणून संपूर्ण भारत भ्रमण सायकल द्वारे करून सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारे सुशिल बोबडे (पुणे ) यांची विशेष उपस्थिती लाभली.त्याप्रसंगी संस्थेद्वारे भास्करदादा टोम्पे यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात



आला.त्यानंतर दिंडी पोलीस स्टेशन, जयस्तंभ मार्गे बेलोरा चौक या मार्गाने चांदूर बाजार शहरातून काढण्यात आली.

दिंडीमध्ये सहभागी विद्यार्थी व स्वयंसेवकांनी हातात 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा', 'झाडे आहेत तर जीवन आहे', 'पर्यावरण वाचवा, जीवन वाचवा', 'वृक्षसंवर्धन हीच काळाची गरज' अशा संदेशांचे फलक घेतले होते.संत शिरोमणी श्री. नामदेव महाराज हे भारतीय संतपरंपरेतील महान संत असून त्यांनी भक्ती, समता, बंधुभाव, मानवता आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश समाजाला दिला. आजच्या काळात वाढते प्रदूषण, वृक्षतोड, हवामानातील बदल आणि पर्यावरणाचा वाढता ऱ्हास या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड व संवर्धनाची गरज अधिक तीव्र झाली आहे.

या वृक्ष दिंडीच्या आयोजनात राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल सरोदे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. उमेश कनेरकर आणि महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मंजुषा पवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच महिला समितीच्या प्रा.डॉ. युगंधरा गुल्हाणे, प्रा.डॉ. पार्वती शिर्के तसेच नियोजन, समन्वय आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाच्या माध्यमातून दिंडी यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

यावेळी स्व. संजय टोम्पे शिक्षण व अध्यापक महाविद्यालय तसेच गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.संत नामदेव महाराजांच्या मानवतावादी विचारांचे स्मरण आणि पर्यावरण संवर्धनाची प्रत्यक्ष कृती यांचा सुरेख मिलाफ साधणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी,पर्यावरणीय जाणीव आणि भारतीय संतपरंपरेविषयी अभिमान निर्माण करणारा ठरला. 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि भावी पिढीचे जीवन सुरक्षित करा' हा संदेश देत वृक्ष दिंडी उत्साहात झाली.

# तळेगाव-चांदूर रेल्वे मार्गावर भीषण अपघात
# एकाचा जागीच मृत्यू, दोघे जखमी





**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तळेगाव ते चांदूर रेल्वे मार्गावर बुधवारी रात्री साडेअकराच्या सुमारास भीषण अपघात झाला. पाच युवकांना घेऊन जाणारे चारचाकी अचानक पलटी झाल्याने या दुर्घटनेत प्रतीक सेवाने यांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले आहेत. सुदैवाने यश जैन हे पूर्णपणे सुखरूप असून, त्यांना कोणतीही दुखापत झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पाच युवक चारचाकी वाहनाने तळेगाव येथून चांदूर रेल्वेकडे येत होते. तळेगाव परिसरातील शेडुरंजना खुर्द जवळ चारचाकी रस्त्यावर पलटी झाली. अपघाताची तीव्रता एवढी होती की, प्रतीक सेवाने यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

या अपघातात धीरज कलावटे, शिवा मोटवानी आणि आदित्य गणेडीवाल हे तिघे जखमी झाले. अपघातानंतर जखमींना तातडीने अमरावती येथे उपचारासाठी हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, यश जैन यांना ☞(पान २ वर)

# जिवंत काडतूस प्रकरणात चौथा आरोपी जेरबंद
## -१७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरात जिवंत काडतुसे टाकून संबंधित व्यक्तीला खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा कट रचल्याच्या प्रकरणात पोलिसांनी आता चौथ्या आरोपीला अटक केली आहे. अभिजित बबनराव मात्रे (रा. सिंधी बु., ता. अचलपूर, जि. अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १७ ऑगस्ट २०२६पर्यंत पोलिस कोठडी (पीसीआर) मंजूर केली आहे.



फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका घरात जिवंत काडतुसे टाकून संबंधित व्यक्तीला खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा कट रचण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणी उज्ज्वला विनोदराव मेटे यांच्या तक्रारीवरून ☞(पान २ वर)

# मुथूट फिनकॉर्प अपहार प्रकरणात नवा ट्विस्ट
# एमपीआयडी कलम ३ वाढविले, आरोपींना सात दिवसांचा पीसीआर
## ४ कोटींचे २ किलो ८५० ग्रॅम सोने तारण

**अमरावती/प्रतिनिधीः-** विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्प शाखेतील कथित अपहार प्रकरणाच्या तपासाला आता आणखी वेग आला असून, पोलिसांनी गुन्ह्यात महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम (एमपीआयडी) कलम ३ ची वाढ केली आहे. आरोपींची यापूर्वीची पोलिस कोठडी संपत असल्याने त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सात दिवसांचा पोलिस कोठडी रिमांड (पीसीआर) मंजूर केला. त्यामुळे या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, गहाण ठेवलेले सोने, ग्राहकांकडून घेतलेल्या रकमा आणि सिस्टीममधील व्यवहारांचा तपास आता अधिक सखोल होणार आहे.



शहर कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विमको टॉवर येथील मुथूट फिनकॉर्प शाखेत ग्राहकांनी सोने तारण ठेवून कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड केल्यानंतरही काही ग्राहकांना त्यांचे सोने परत मिळाले ☞(पान २ वर)

# दिवसा घरफोडी करणारे दोघे जेरबंद
## ७७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात दिवसा घरफोडी करून सोन्याचे दागिने व मोबाईल लंपास करणाऱ्या दोन आरोपींना अमरावती शहर गुन्हे शाखेने जेरबंद केले असून, त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण ७७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. खोलापुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मालू लेआउट, रिंग रोड आकोली येथील प्रविण संकल्प परिसरात राहणाऱ्या निलीमा राकेश आकरे (४२) यांच्या घरी दिवसा घरफोडी झाली होती. चोरट्यांनी घरातून दोन मोबाईल, सोन्याचे दागिने व इतर मुद्देमाल लंपास केला होता. या प्रकरणी खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवित घटनास्थळासह परिसरातील विविध सीसीटीव्ही फुटेज तपासले. तसेच गुप्त बातमीदारांचे जाळे सक्रिय करण्यात आले. दरम्यान, १२ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे चेतन संतोष वहीले (रा. जुनी वस्ती, बडनेरा) ☞(पान २ वर)

# डोमा आदिवासी आश्रम शाळेत भूत असल्याची अफवा
## तीनशे विद्यार्थ्यांनी भीतीपोटी गाठले घर




**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील डोमा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत 'भूत' असल्याच्या अफवेमुळे ३०० विद्यार्थ्यांनी भीतीपोटी शाळा सोडून घर गाठल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. या प्रकारानंतर विद्यार्थ्यांमधील भीती दूर करून त्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'च्या सदस्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. ☞(पान २ वर)

### डॉक्टरांनी सांगितले मास हिस्टेरिया-

डोमा येथील आश्रमशाळेत २६३ मुले आणि ३४५ मुली निवासी शिक्षण घेतात. काही दिवसांपूर्वी एका विद्यार्थिनीने अकारण ओरडणे, अचानक रडणे, शांत बसून राहणे आणि मोठ्याने हसणे अशी लक्षणे दाखवण्यास सुरुवात केली. पाहता पाहता हीच लक्षणे इतर मुलींमध्येही पसरली. अमरावतीवरून आलेल्या विशेष समुपदेशन पथकाला या वर्तनामागील मूळ शोधण्यात यश आले नाही. हा प्रकार 'मास हिस्टेरिया' म्हणजेच तीव्र मानसिक तणावाशी संबंधित असण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. दरम्यान, काही दिवसांपुर्वी एका विद्यार्थिनीचे नातेवाईक तिला थेट वसतिगृहात घेऊन आले आणि तिथे 'भूमका'कडून पूजा-अर्चा केली होती. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती पसरली आहे.

# राम मंदिरातील चोरीचा छडा
## चोरट्याला जेरबंद करून मुद्देमाल केला हस्तगत

**अमरावती/प्रतिनिधीः-** रामलक्ष्मण संकुल, रामपुरी कॅम्प येथील राम मंदिरात झालेल्या चोरीचा गाडगेनगर पोलिसांच्या डी.बी. पथकाने छडा लावत आरोपीला जेरबंद केले आहे. आरोपीकडून मंदिरातून चोरीला गेलेला पितळी साहित्याचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, धार्मिक स्थळातील चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. गजानन अरुण आत्राम (४५, रा. अशोक नगर, अमरावती) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. रामलक्ष्मण संकुल येथील राम मंदिरातील पुजारी २८ जुलै रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास मंदिर बंद करून घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी २९ जुलै रोजी सकाळी



सात वाजता मंदिर उघडण्यासाठी आले असता मंदिराच्या लोखंडी गेटचे कुलूप तुटलेले दिसून आले. मंदिरात पाहणी केली असता शिवपिंडीवरील पितळी मोठा नाग, दोन सिंहासन, पितळी दिवा, दोन पितळी ताट, पितळी पंचारती तसेच दानपेटीचे कुलूप तोडून त्यातील अंदाजे तीन हजार रुपये रोख असा एकूण सुमारे २२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे आढळून आले. या प्रकरणी पुजाऱ्याच्या तक्रारीवरून गाडगेनगर ☞(पान २ वर)





